**सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**वरिष्ठ श्रेणीसाठी अर्हताकारी सेवा मोजतांना व्यावसायिक अभ्यासक्रमाकडील अधिक दोन स्तरावरील शिजज ां□ा भेदभावपूर्ज वाजजूज .**

**(१) * २५४० श्री. वसंतराव खोटरे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अैनापूरे , प्रा. शरद पाटील :** सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा □ुलासा करतील काय :-

(१) दिनांक २५ मार्च,१९९४ च्या पूर्ण वेळ शिक्षकांच्या वेतनश्रेणीच्या शासननिर्णयातील "वरिष्ठ श्रेणीसाठी प्रशिक्षण अर्हतेसह १२ वर्षांची अर्हताकारी सेवा" ही अट शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक २२ जानेवारी १९९३ च्या शुध्दीपत्रकाप्रमाणे तंत्रशिक्षण विभागाने दिनांक १२ डिसेंबर,१९९४ रोजी शुध्दीपत्रक काढून वगळण्यात आली परंतु दिनांक १ जानेवारी २००० च्या शासननिर्णयात मात्र ती अट न वगळण्याचा हा दोष राहून गेल्यामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमाकडील अधिक दोन स्तरावरील शिक्षकांना भेदभावपूर्ण वागणूक दिली जात आहे अशी तक्रार करणारे एक निवेदन महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाने मा.उच्च व तंत्र शिक्षणमंत्री यांना दिनांक १६ डिसेंबर,२००४ रोजी किंवा त्या दरम्यान सादर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १३ मे,१९९९ च्या शासननिर्णयाप्रमाणे शालेय शिक्षण विभागातील अधिक दो-ा स्तरावरील शिक्षकांना वरिष्ठ श्रेणीसाठी "नेमणूकीच्या दिनांकापासून १२ वर्षाची सेवा" व त्याच स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रम शिक्षकांना दिनांक १ जानेवारी २००० च्या तंत्रशिक्षण विभागाच्या शास-ानिर्जया-ने "प्रशिक्षण अर्हतेसह १२ वर्षाची सेवा" अशी भेदभावपूर्ण वागणूक देणारी व्यवस्था आज कार्यरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त तक्रारीच्या निवारणार्थ शासनाने काय उपाययोजना केलेली आहे,

(४) अद्याप कोणतीच उपाययोजना केलेली नसल्यास याबाबत होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ? .

श्री.सुरेश शेट्टी, श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता: (१) होय.

(२) -ाही.

अशासकीय अनुदानीत संस्थेतील +२ स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रम शिकविणा-या शिजजांना दिनांक २५ मार्च,१९९४ च्या शासन निर्णयान्वये द्विस्तरीय वेतन श्रेणी लागू करण्यात आलेली आहे तसेच या शासन निर्णयास अनुसरुन निर्गमित केलेल्या दिनांक १२ डिसेंबर,१९९४ च्या शुध्दपत्रकान्वये वरिष्ठ वेतन श्रेणीसाठी प्रशिक्षण अर्हतेसह बारा वर्षाची अर्हताकारी सेवा (उच्च माध्यमिज स्तरावर ) या अटी ऐवजी उच्च माध्यमिक स्तरावर नेमणूकीच्या दिनांकापासून पूर्ण १२ वर्षे झालेली सेवा विचारात घ्यावी असे आदेशीत करण्यात आले आहे.

(३) व (४) दिनांक १ जानेवारी,२००० च्या शासन निर्णयामध्ये वरील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

२...

NTK/ SBT/ MHM/

ता.प्र.क्र.2540....

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मी प्रश्न विचारला होता की, दिनांक 25 मार्च, 1994 च्या पूर्ण वेळ शिक्षकांच्या वेतनश्रेणीच्या शासन निर्णयातील "वरिष्ठ श्रेणीसाठी प्रशिक्षण अर्हतेसह 12 वर्षांची अर्हताकारी सेवा" ही अट शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक 22 जानेवारी, 1993 च्या शुध्दीपत्रकाप्रमाणे तंत्रशिक्षण विभागाने दिनांक 12 डिसेंबर, 1994 रोजी शुध्दीपत्रक काढून वगळण्यात आली. माझा प्रश्न असा आहे की, कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षकाप्रमाणे या शिक्षकांना त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून 12 वर्षानंतर देण्यात आली. त्याप्रमाणे व्यावसायिक अभ्यासक्रमाकडील अधिक दोन स्तरावरील शिक्षकांना 12 डिसेंबर, 1994 च्या शुध्दीपत्रकानुसार देण्यात येईल काय, यामध्ये शासनाने उत्तर दिले आहे परंतु ते ठोस उत्तर नाही. त्यासंबंधीचे आदेश केव्हा काढणार आहात ?

श्री.सुरेश शेट्टी : या विषयासंबंधी दोन दिवसापूर्वीच या सदनामध्ये चर्चा झाली होती त्यावेळी मी आश्वासन दिले होते की, हे अधिवेशन संपल्यानंतर इमिजिएट याच्यावर निर्णय करु. हे आश्वासन रेकॉर्डवर आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : अधिवेधन संपल्यानंतर कार्यवाही करु असे म्हणण्याची आवश्यकता नाही. आज हा पहिला प्रश्न आहे. यामध्ये धडधडीत असत्य उत्तर देण्यात आलेले आहे. आम्ही प्रश्न क्र.2 मध्ये असे विचारले होते की, दिनांक 13 मे, 1999 च्या शासन निर्णयाप्रमाणे शालेय शिक्षण विभागातील अधिक दोन स्तरावरील शिक्षकांना वरिष्ठ श्रेणीसाठी "नेमणूकीच्या दिनांकापासून 12 वर्षाची सेवा" व त्याच स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रम शिक्षकांना दिनांक 1 जानेवारी, 2000 च्या तंत्रशिक्षण विभागाच्या शासन निर्णयाने "प्रशिक्षण अर्हतेसह 12 वर्षाची सेवा" अशी भेदभावपूर्ण वागणूक देणारी व्यवस्था आज कार्यरत आहे, ही गोष्ट खरी आहे काय, याला नाही असे उत्तर दिलेले आहे. तेव्हा हे उत्तर दुरुस्त करण्याची आवश्यकता आहे असे आपल्याला वाटत नाही का ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, जे लेखी उत्तर दिले आहे ते ठीक आहे. मा.सदस्यांनी जी मागणी केलेली आहे त्याबाबत मी आश्वासन देऊ इच्छितो की, यासंबंधी आम्ही पॉझिटिव्ह निर्णय घेणार आहोत.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/

ता.प्र.क्र.2540...

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मा.मंत्रिमहोदय दिलेले उत्तर ठीक आहे असे म्हणत आहेत. वास्तविक मी त्यांना उत्तर दुरुस्त करण्याची संधी देऊनही ते त्याच उत्तरावर ठाम आहेत म्हणून मी आता पुढील प्रश्न विचारतो. दिनांक 12 डिसेंबर, 1994 च्या शुध्दीपत्रकाप्रमाणे जी दुरुस्ती केली ती दिनांक 1.1.2000 मध्ये केली नाही हे खरे आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : हे खरे आहे. या जी.आर.मध्ये थोडीशी दुरुस्ती करण्याचे राहिले आहे. त्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. त्यामुळे यावर आणखी चर्चा कशासाठी करावयाची ? यासंबंधी आम्ही पॉझिटिव्ह निर्णय घेणार आहोत हे मी मघाशीच सांगितले आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : चर्चा करण्याची आवश्यकता आहे. येत्या 8 दिवसामध्ये, 10-15 दिवसामध्ये यासंबंधीचा आदेश निघणार आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : अधिवेशन संपल्यानंतर इमिजिएट हे आम्ही करु.

प्रा.बी.टी.देशमुख : अधिवेशन संपल्यानंतर 8 दिवसात 10, 15 दिवसामध्ये दुरुस्ती करणारा शासन निर्णय निघेल काय ?

श्री.सुरेश शेट्टी : ठीक आहे, 7 दिवसामध्ये आम्ही करु.

नंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 2540 पुढे सुरु...)

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : या शिक्षकांच्या संदर्भात अधिवेशन संपल्यानंतर 8 दिवसात शासननिर्णय निर्गमित होईल असे मा.राज्यमंत्री महोदयांनी सांगितले. माझा पूरक प्रश्न असा आहे की, याच विभागामध्ये ह्या शिक्षकांच्या बरोबरीने काम करणारे निदेशक आहेत. शिक्षक आणि निदेशक हे एका विभागामध्ये आणि एका युनिटमध्ये काम करतात. त्यांना मात्र ही वेतनश्रेणी दिली गेली नाही. प्रत्येक प्रश्नासाठी सातत्याने याठिकाणी येता येत नाही. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, या शिक्षकांच्या निर्णयासोबतच निदेशकांच्या बाबतीतही 12 वर्षाच्या संदर्भातील निर्णय घेतला जाईल काय ?

श्री. सुरेश शेट्टी : होय.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/

**रत्नागिरी जिल्ह्यातील १२ प्रादेशिक पाणी योजनाबाबत**

**(२) * ४६७६ डॉ. दिपक सावंत , श्री. अनंत तरे , श्री. अनिल परब , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. विलास अवचट :** सन्माननीय पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील देखभाल व दुरुस्तीसाठी शासनाकडून निधि उपलब्ध होत नसल्याने रत्नागिरी जिल्ह्यातील १२ प्रादेशिक नळपाणी योजनांच्या कक्षेत येणा-या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या उभी राहिली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नळपाणी योजना देखभालीपाई नादुरुस्त झाल्या आहेत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, गेल्या तीन चार वर्षात शासनाने सदर नळपाणी योजनांना अनुदान देण्याचे बंद केले आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन पूर्वी देत असलेले अनुदान आता बंद करण्याची कारणे काय आहेत ?

श्री. रणजित कांबळे, श्री. अजित पवार यांच्याकरिता : (१) -ााही.

(२) -ााही.

(३) अनुदान टप्प्याटप्प्याने कमी करण्यात येत आहे. तथापि ते अनुदान देण्याचे पूर्णतः बंद केलेले -ााही.

(४) प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेची असल्याने जिल्हा परिषदेने आवश्यक ती पाणीपट्टी आकारुन व स्वउत्पन्नातून किमान २० % निधी वर्ग करुन त्या योजनाची देखभाल व दुरुस्ती करावयाची आहे. शासनाने योजनांचा भांडवली खर्च ९०% देण्याचे तर देखभाल व दुरुस्ती संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने १००% करण्याचे धोरण असल्याने देखभाल व दुरुस्तीसाठी देण्यात येणारे अनुदान टप्प्याटप्प्याने कमी करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

----------

डॉ. दीपक सावंत : मे महिना तोंडावर आलेला आहे. रत्नागिरी जिल्हयामध्ये पाण्याची टंचाई भीषण प्रमाणात जाणवायला लागलेली आहे. गेल्या 15 वर्षापासून ही नळपाणी योजना कार्यरत होती. या योजनेवर शासनाने 55 ते 60 कोटी रु. खर्च केलेले आहेत. आज ही नळपाणी योजना दुरुस्ती अभावी बंद पडलेली आहे. दुरुस्तीसाठी 55 ते 60 लाख रु. अपेक्षित आहेत. तेव्हा 55 ते 60लाख रु. देऊन शासन ही नळपाणी योजना दुरुस्त करणार आहे काय ? शासनाने टप्प्याटप्प्याने अनुदान बंद करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या निर्णयाचा शासन फेरविचार करणार आहे काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.4676...)

श्री. अजित पवार : मागील काळामध्ये किमान गरजा कार्यकामांतर्गत राज्यातील प्रत्येक जिल्हयाला 15टक्के रक्कम देखभाल व दुरुस्तीसाठी दिली जात होती. त्यामध्ये एक गोष्ट लक्षात आली की, काही जिल्ह्यांमध्ये भौगोलिक परिस्थिती वेगळी असल्यामुळे देखभाल दुरुसतीसाठी 15टक्के रक्कम कमी पडते आणि काही जिल्ह्यामध्ये ती रक्कम जास्त होते. म्हणून शासनाने अशी भूमिका घेतली की, राज्यातील 15 टक्के रक्कम एकत्र करावयाची आणि आणि जेथे भौगोलिक परिस्थिती वेगळी असेल आणि अधिक रक्कम लागत असेल तर ती द्यावयाची. कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगड या जिल्ह्यांमध्ये भौगोलिक परिस्थिती डोंगराळ आहे. त्या जिल्ह्यासाठी किमान गरजा कार्यक्रमांतर्गत कधी 2 लाख तर कधी अडीच लाख मिळायचे. परंतु प्रत्यक्षात त्या भागामध्ये देखभाल दुरुस्तीसाठी जास्त खर्च करावा लागतो. आज 12 प्रादेशिक नळपाणी योजनेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. जरी टप्याटप्याने हा देखभाल दुरुस्तीचा खर्च कमी करण्याचा, अनुदान कमी करण्याचा निर्णय घेतला असला तरी इतर भागाला न्याय देण्याच्यादृष्टीने हा निर्णय फायदेशीर आहे. त्यामुळे कोठे अडचण येणार नाही. येथे जरी अनुदान कमी झाले तरी एका फंडातून ती रक्कम खर्च करण्यात येईल आणि ती योजना कार्यान्वीत करण्यात येईल. लोकप्रतिनिधींनी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, पिण्याच्या पाण्याच्या योजना व्यवस्थित चालण्याकरिता एका गावाची कमीत कमी 350 ते 360 रु. एवढी पाणीपट्टी दिली पाहिजे. परंतु घरामागे एक रुपया एवढी देखील पाणीपट्टी दिली जात नाही. काही ठिकाणी सव्वा रुपया एवढी पाणीपट्टी असते. तेव्हा या योजना व्यवस्थित चालण्यासाठी त्या भागातील पाणीपट्टीचा जो दर असेल त्या दराने पाणीपट्टी वसूल करण्याकरिता स्थानिक लोकांनी सहकार्य करायला पाहिजे. स्थानिक लोकांचे सहकार्य असेल तर योजना अडचणीत येणार नाहीत, त्या व्यवस्थित चालतील आणि वसुली होऊन अधिकचा खर्च करावा लागला तरी तो करण्याची शासनाची तयारी आहे.

...नंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MHM/ SBT/ प्रथम श्री.शिगम 12:10

ता.प्र.क्र.4676...

श्री.अजित पवार..

12 योजनांची माहिती घेण्याचा प्रयत्न केला तर पालघड आणि धामणी मिरा-पालघड या दोन योजना त्या ठिकाणचे सोंडे धरण फुटल्यामुळे तेथील सोर्स अडचणीत आला. बाकीच्या ठिकाणी मात्र तसे काही झालेले नाही. सोंडे धरण फुटल्यामुळे त्या योजनाचा उदभव कोरडा पडलेला आहे.जलसंपदा विभाग माझ्याकडे आहे. सोंडे धरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याकरिता निधी मी उपलब्ध करुन देतो. या धरणाचे काम दोन वर्षात पूर्ण झाल्यानंतर या दोन योजनांचा पाण्याचा सोर्स व्यवस्थितपणे होईल. हा सोर्स कोरडा पडल्यामुळे तेथे काय करावयाचे अशी भिती होती. परंतु तेथे एक डोह आहे. या डोहातील पाणी उचलून या दोन्ही योजना चालू करण्याचे काम आम्ही करतो आहे.

डॉ.दीपक सावंत : या योजनांचा दुरुस्तीचा खर्च 55 ते 60 लाख रुपये आहे त्यासाठी काय करणार आहात ?

श्री. अजित पवार : नादुरुस्त योजना दुरुस्त करण्यासाठी वेगळा फंड तयार करतो आहे.निर्माण करतो आहे. किमान गरजा कार्यक्रमामध्ये पहिल्यांदा त्या त्या जिल्हयांना देखभाल दुरुस्तीसाठी 15 टक्के रक्कम दिली जात होती. ती रक्कम काही ठिकाणी पुरावयाची. काही ठिकाणी ती पुरावयाची नाही. काही ठिकाणी ती रक्कम सरप्लस व्हावयाची. म्हणून एकच फंड तयार करुन ती रक्कम वितरीत करण्याचा आमचा विचार आहे. या ठिकाणची भौगोलिक परिस्थिती डोंगरी विभागाची असल्यामुळे तेथे अधिकचा निधी उपलब्ध करुन देण्याचा आमचा प्रयत्न राहील.

श्री. विलास अवचट : ग्रामीण भागाला नळ पाणीपुरवठा योजनेच्या माध्यमातून पाणी पुरवठा करणे हे राज्य शासनाला बंधनकारक आहे. योजना पूर्ण झाल्यानंतर ती जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत केल्यानंतर त्या योजनेची देखभाल दुरुस्तीची जबाबदारी जिल्हा परिषदेची असते हे मला मान्य आहे. रत्नागिरी जिल्हयातील हरचढी,नाचणे,शिवार,आंबोरे आणि जयगड या पाच नळ पाणी पुरवठा योजनांची कामे रखडलेली आहेत.या योजना निधी अभावी रखडलेल्या आहेत काय ? हरचढी गावातील नळ पाणीपुरवठा योजनचे जवळ जवळ 100 टक्के काम पूर्ण झालेले आहे.नापे या ठिकाणच्या योजनेचे काम 90 टक्के पूर्ण झालेले आहे. ही कामे देखील निधी अभावी रखडलेली आहेत काय याची माननीय मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4676...

श्री.अजित पवार : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, यामध्ये काही योजना हया फार जुन्या झालेल्या आहेत. त्या योजना जुन्या झालेल्या असल्यामुळे त्या योजनांचा देखभाल दुरुस्तीचा खर्च हा वाढलेला आहे. तेथील खर्च करीत असताना जिल्हा परिषदेने देखील लक्ष देण्याची गरज आहे. तेथील स्थानिक लोकांकडून पाणी पट्टीची वसुली व्यवस्थितपणे करुन लोकांना एक चांगली सवय लावून देण्याची गरज आहे. ज्या योजनेला जास्त काळा झालेला आहे. जयगड प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना ही 1990 पासून जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत केलेली आहे. या योजनेला जवळपास 3 कोटी 66 लाख रुपये दुरुस्तीसाठीचा खर्च अधीकचा लागतो आहे.अशाच प्रकारे वेगवेगळया योजनांसाठी कुठे 10 लाख, कुठे 15 लाख खर्च होणार आहे.एकूण विचार केला तर या 12 प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना 59 गावे आणि 425 वाडयांसाठी आहे. वर्षाचा दुरुस्ती आणि व्यवस्थापनाचा खर्च 81 लाख 24 हजार रुपये इतका अपेक्षीत आहे. एका जुन्या योजनांची दुरुस्ती करण्यासाठी 5 कोटी 35 लाख रुपये खर्च लागतो आहे. यापुढे योजनांवर मोठा खर्च करावयाचा म्हटला तर स्थानीक लोकांकडून 10 टक्के लोकवर्गणी लोकांनी भरली पाहिजे.हा मेजर खर्च करण्याकरिता लोकवर्गणीची आवश्यकता आहे. ज्या गावातील योजना असतील, तेथील लोक 10 टक्के लोकवर्गणी भरणार असतील व ग्रामसभा तसा ठराव करणार असतील तर बाकीची रक्कम उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी राज्य शासन निश्चितपणे उचलेल. त्यात कुठलीही अडचण येऊ देणार नाही.

श्री. अरविंद सावंत : कोकणाच्या संदर्भात आपण लक्षात घेतले पाहिजे की, कोकणातील गावांचे क्षेत्रफळ फार मोठे असते. 12 ते 15 वाडया मिळून एक गाव होते. दोन वाडयामधील अंतर दोन-दोन कि.मी. एवढे असते. 10 ते 15 कि.मी. अंतराच्या मध्यवर्ती ठिकाणी ही नळपाणी पुरवठा योजना असते. नळ योजना आणि आणि वाडया यांच्यात अंतर जास्त असल्यामुळे कोकणातील गावांना पाणी मिळत नाही ही खरी मुळात अडचण आहे. नळ पाणी पुरवठा व्हावी, दुरुस्त व्हावी यासाठी लोक 10 टक्के लोकवर्गणी भरतील.

यानंतर श्री. उपरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.अरविंद सावंत)

पण कालांतराने टप्प्या-टप्प्याने तुम्ही अनुदान बंद करीत जाता तेव्हा त्याचा दुरुस्तीचा खर्च वाढत जातो. 15 वर्षानंतर पुन्हा 10 टक्के निधी उभा करावयाचा आहे. आपण पाण्याची पाईप टाईन टाकतो त्याचा खर्च बराच येतो आणि कोकणामध्ये उत्पन्नाची साधने फार कमी आहेत. त्या ठिकाणचे कित्येक लोक अत्यंत गरीब आहेत. म्हणून माझे म्हणणे असे आहे की, सरकारने यासंदर्भात जे निकष तयार केले आहेत ते कोकणाच्या संदर्भात शिथील करण्याची गरज आहे. तरी कोकण हा डोंगराळ भाग आहे याचा विचार करून आदिवासी भागामध्ये निकषांमध्ये जी शिथीलता आपण देता ती कोकणाच्या बाबतीत द्याल काय ?

श्री.अजित पवार : मी सुरुवातीलाच सांगितले की, किमान गरजा कार्यक्रमामध्ये दर जिल्ह्याला मिळणा-या रकमेतील 15 टक्के रक्कम ही आपण देखभाल दुरुस्तीच्या खर्चामध्ये देत होतो. त्यावेळेस ज्या ठिकाणची नैसर्गिक परिस्थिती थोडीशी वेगळी आहे त्या ठिकाणी जास्त खर्च व्हायचा आणि देखभाल दुरुस्तीच्या खर्चातून ते भागायचे नाही. म्हणूनच मी आपल्याला सांगितले की, तो एकच फंड राज्याच्या स्थरावर करून याच्यातून कोकणासारखे भाग किंवा आदिवासी भाग, डोंगरी भाग असतील अशा ठिकाणी थोडेसे अधिकचे देण्याच्या दृष्टीकोनातून संपूर्ण राज्याचा म्हणजे सर्व जिल्ह्यांचा निधी क्लब करून.....

श्री.अरविंद सावंत : कोकण हा काही आदिवासी भाग नाही.

श्री.अजित पवार: जसे आदिवासी भागाला आपल्याला द्यावे लागते तसे या डोंगरी भागाला देण्यासाठी त्या निधीचा आपल्याला उपयोग करून घेता येईल. म्हणून मी सुरूवातीलाच सांगितले की, किमान गरजा कार्यक्रमाच्या अंतर्गत दुरुस्ती आणि देखभालीचा खर्च आम्ही टप्प्याटप्प्याने जिल्हावार कमी करणार असलो तरी राज्याचा निधी एकत्र करणार आहोत आणि त्यावेळेस जेथे आदिवासी जिल्हे असतील तेथे आदिवासी जिल्ह्यांना आणि जेथे डोंगरी जिल्हे असतील तेथे डोंगरी जिल्ह्यांना मग सह्याद्रीचे पठार असेल किंवा तुमचे सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड या तीन जिल्ह्यांमध्ये हा मेजर प्रश्न निर्माण होतो तो ब-याच अंशी आपल्याला सोडविता येईल आणि तशा प्रकारे आमचे नियोजन आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी 12 पाणी पुरवठा योजनांच्या बाबतीत डॉ.दीपक सावंत यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. यामधल्या दोन योजनांच्या ठिकाणी पाण्याचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SDU/ MHM/ SBT

ता.प्र.क्र. 4676....

(श्री.जयंत प्र.पाटील)

सोर्स आहे असे मंत्री महोदयांनी सांगितले. तरी बाकीच्या 10 ठिकाणच्या योजनांच्या सोर्सपैकी एम.आय.डी.सी.चा सोर्स किती योजनांना आहे ? ज्याप्रमाणे सार्वजनिक बांधकाम खात्याने आता नवीन नियम केलेले आहेत की, रस्ते केल्यानंतर तीन वर्षे त्यांचा मेंटेनन्स केला पाहिजेत. तरी नवीन योजना ज्या होतील त्यांचा दोन किंवा तीन वर्षांपर्यंत त्या कॉन्ट्रॅक्टरने मेंटेनन्स केला पाहिजे. तो केल्यानंतरच त्याचे फायनल बिल दिले जाईल हे धोरण शासन स्वीकारणार आहे काय ?

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, नवीन धोरण करीत असताना आता सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी जी सूचना केली ती चांगली आहे त्यामुळे त्या सूचनेचा जरूर विचार केला जाईल. एम.आय.डी.सी.च्या संदर्भात प्रश्न विचारला. एम.आय.डी.सी.मध्ये त्यांचे वेगवेगळे सोर्स आहेत. पण या योजनांमध्ये एम.आय.डी.सी.चा कोणताही संबंध येत नाही.

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदय, अतिशय महत्वाचा मुद्दा मी या ठिकाणी सांगणार आहे. या प्रादेशिक योजना 10-12 गावांसाठी असतात आणि एका विशिष्ट गावचा माणूस त्या ठिकाणी पाणी सोडायला असतो आणि ग्रामपंचायत त्याला पगार देत नाही म्हणून तो माणूस पाणी सोडत नाही. पाणी उद्‌भवात असते, टाकीत असते, सगळी यंत्रणा असते.परंतु त्या माणसाला पगार न दिल्यामुळे तो पाणी सोडत नाही. म्हणून एवढ्या मोठया योजना करूनही आपल्याला त्याचा लाभ घेता येत नाही. तरी त्या माणसाला पगार देण्याची व्यवस्था ग्रामपंचायतीकडे न ठेवता पंचायत समिती मार्फत किंवा एखाद्या वेगळ्या यंत्रणेच्या मार्फत करण्यात येईल काय ?

श्री.अजित पवार: सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आता प्रश्न विचारला आहे. पण अलिकडच्या काळामध्ये त्या गावानीच सोर्स निवडायचा, त्या गावानीच त्या योजना कशा पध्दतीने करावयाच्या ते ठरवावयाचे, त्या योजनेचे प्लॅन एस्टीमेटस् तयार करावयाची आणि त्या गावानेच ती योजना तेथे ग्रामसभा घेऊन एक मंडळ स्थापन करून चालवावयाची आहे. पाणीपुरवठा योजनेच्या संदर्भात वेगवेगळ्या अडचणी आपल्याला मागील अनेक वर्षापासून आलेल्या आहेत. ब-याचदा नागरीकांची किंवा जनतेची अशी भावना असते की, ही योजना शासनानेच करावी. पण आता तसे करून चालणार नाही. प्रादेशिक योजनेच्या संदर्भामध्ये सन्माननीय सदस्यांनी मुद्दा मांडला आहे.

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4676 श्री.अजित पवार ...

खरे म्हणजे प्रादेशिक नळ योजना जीवन प्राधिकरणाने पूर्ण केल्यानंतर ती जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात येते. तेव्हा जिल्हा परिषदेने ही योजना हस्तांतरित करुन घेत असतांना ती योजना व्यवस्थितपणे चालू आहे काय ? सगळीकडे पुरेशा दाबाने पाणी मिळते काय ?या बाबी जिल्हा परिषदेने पहावयाच्या असतात. एकदा योजना हस्तांतरित करुन घेतल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्था या नात्याने जिल्हा परिषदांनी त्या योजनेचा मेन्टेनन्स आणि बाकीचा सगळा खर्च केला पाहिजे. तशा प्रकारे जिल्हा परिषद खर्च करीत असते.हा खर्च करीत असतांना नागरिकांकडून तसेच ग्रामस्थांकडून पाणीपट्टीचे पैसे त्यांनी वसूल केले पाहिजे . या योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण स्वत:चे अधिकारी देऊन चालविणार नाहीत. या योजना त्या गावांना तसेच जिल्हा परिषदांना चालवाव्या लागतील.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघाचे (महानंद) वादग्रस्त कार्यकारी संचालक यानी करोडो रुपयांचा केलेला भ्रष्टाचार**

**(३) * १७८७ मेजर सुधीर सावंत , श्री. संजय दत्त , श्री. रामनाथ मोते , श्री. नातिकोद्दीन खतिब :**
सन्माननीय दुग्धविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघाचे (महा नंद) वादग्रस्त कार्यकारी संचालक यानी करोडो रुपयांचा कथित भ्रष्टाचार केल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अनेक छापे मारुन दिनांक १७-१-२००५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आणले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आळढून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

##श्री.हसन्र मुश्रीफ,श्री. अनिस अहमद यांच्याकरिता: (१) नाही. लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने संबंधितांच्या अपसंपदे संदर्भात सदर छापे घातले आहेत.
(२) व (३) याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडून तपशीलवार चौकशी सुरु आहे. तथापि, या संदर्भात संबंधित कार्यकारी संचालकांविरुध्द शिस्त भंग कारवाई करण्यात येत असून, त्यांना निलंबित करण्यात आले आहे.

----------

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, श्री.तळेकर यांच्या महानंदातील कारभाराबाबत तेथील वरिष्ठ अधिका-यांनी तक्रारी केल्या होत्या, त्याचबरोबर नंदलाल समितीने त्यांच्या भ्रष्ट कारभाराबाबत शासनाकडे अहवाल सादर केला होता हे खरे आहे काय ?असल्यास त्या सदर्भात कोणती कारवाई करण्यात आली आहे?त्याचप्रमाणे श्री.तळेकर यांच्या बरोबर आणखी किती जणांचा त्यात समावेश आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हा प्रश्न लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने घातलेल्या छाप्याच्या संदर्भात आहे.श्री.तळेकर यांच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्यासाठी त्यांना वेगळा प्रश्न विचारावा लागेल.श्री.तळेकर यांच्याविरुध्द कारवाई करण्यात आलेली आहे. त्यांना सस्पेन्ड करण्यात आलेले आहे. त्याचबरोबर त्यांच्या पदावरुन त्यांना पदावनत करण्यात आलेले आहे. त्यांच्या कारवाईच्या सदर्भात जनहित याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली आहे.लाचलुचलपत प्रतिबंधक खात्याने जे छापे घातले होते त्यासंबंधीची माहिती माझ्याकडे आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, महानंदचा कारभार पारदर्शीपणाने चालावा यासाठी सरकार कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहेत ? 3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : या महासंघामध्ये पहिल्या पासून आय.ए.एस दर्जाचे मॅनेजिंग डायरेक्टर होते .1996 साली त्यांना एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर म्हणून प्रमोशन देण्यात आले होते. हा महासंघ पाच ते सहा कोटी रुपये नफा मिळवणारा असून राज्यातील ती एक अग्रेसर संस्था आहे .महाराष्ट्र शासनसुध्दा मुंबईतील योजना महासंघाकडे वर्ग करीत आहे. या महासंघाची निवडणूक घेण्याची प्रक्रिया सुरु आहे.दिनांक 2 एप्रिल 2005 रोजी अंतिम मतदार यादी तयार होणार असून 30 मे 2005 च्या आत नवीन निवडून आलेल्या संचालकाचे संचालक मंडळ तेथे येणार आहे.

श्री.वसंतराव काळे :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न आणि माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेले उत्तर याची सुसंगती लागत नाही.पहिल्या प्रश्नाच्या उत्तरात असे म्हटलेले आहे की, " नाही. लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने संबंधिताच्या अपसंपदे संदर्भात सदर छापे घातले आहेत. " तेव्हा कार्यकारी संचालकांनी लाचलुचपत केली नाही भ्रष्टाचार केला नाही असा त्याचा अर्थ होतो काय ? लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने जे छापे घातलेले होते ते कोणत्या तक्रारीवरुन घातले होते ? छापे घातल्यानंतर त्यातून काय निष्पन्न झाले? किती कोटीची संपत्ती त्यातून बाहेर आली ? या संपत्तीचे सरकारने काय केले आहे ? ही संपत्ती सरकारने त्यांना परत दिली की जप्त केली ?या बाबतीत त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे काय ? एवढी मोठी सपत्ती एका शासकीय अधिका-याकडे सापडली याबद्दल शासनाने कोणती भूमिका घेतली आहे ?

श्री.हसन मुश्रीफ :लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडे तक्रारी प्राप्त झाल्यामुळे त्यांनी त्यांच्यावर कारवाई केली व त्यांच्या घरावर आणि कार्यालयावर छापे घातले.

श्री.वसंतराव काळे : उत्तरामध्ये " नाही " असे म्हटलेले आहे तेव्हा असे उत्तर का देण्यात आले ?

श्री.हसन मश्रीफ : लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडे तक्रार प्राप्त झाल्यानंतर त्यांनी छापे घातले होते. त्यांच्या उत्पन्ना पेक्षा 134 टक्के जास्त संपत्ती त्यांच्याकडे असल्याचे या छाप्यात आढळून आले होते..

श्री.अरविदं सावंत : उत्तरामध्ये " नाही " असे का म्हटले आहे ?

( उत्तर दिले नाही )

नंतर श्री.सुंबरे

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1787 ...

श्री. वसंत काळे : अध्यक्ष महाराज, मी या ठिकाणी नेमका प्रश्न विचारला आहे की, या उत्तरामध्ये अगदी सुरूवातीसच 'नाही' असे जे म्हटलेले आहे त्याचा अर्थ काय ? 'नाही' हे या ठिकाणी कशाला उद्देशून म्हटलेले आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महाराज, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने जे छापे मारलेले आहे त्यासंबंधात या उत्तरात सांगितलेले आहे की, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघाचे वादग्रस्त कार्यकारी संचालक असलेले श्री.शिवाजी तळेकर यांनी करोडो रुपयांचा कथित भ्रष्टाचार केल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अनेक छापे मारून दिनांक 17.1.2005 रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आणले हे खरे आहे काय ? तेव्हा हे 'नाही' यासाठी म्हटलेले आहे की, लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने यामध्ये भ्रष्टाचार झाला आहे की नाही हे बघितलेले नाही. तर त्यांनी छापे घातले. लाचलुचपत प्रतिबंधक खात्याचे ते काम आहे की त्याची जी मालमत्ता आहे त्यापेक्षा किती जास्त मालमत्ता त्याने गोळा केलेली आहे हे पाहणे आणि छापे मारल्यानंतर त्यांच्या असे निदर्शनास आले की, त्यांचा मढ आयलंड येथे असलेला असलेला बंगला, तसेच त्यांचे नावावर असलेली 3 प्लॉटस्, स्विमिंग पूल आहे. आणि बाजारभावाप्रमाणे त्या प्लॉटस्ची किंमत आहे सुमारे 1 कोटी 11 लाख 60 हजार 810 रुपये. त्यांनी तेथे जी इमारत बांधली आहे त्याची बाजारभावाने किंमत 40 लाख रुपये आहे. अशी त्या सर्वांची किंमत आहे 1 कोटी 51 लाख 60 हजार 810 रुपये. बऱ्हाणपूर-पालघरला त्यांनी 26.5 एकर जमीन 28 लाख 77 हजार 660 अशी बाजारभावाने किंमत आहे .. त्यामध्ये चिकूची बाग आहे. त्यानंतर पुणे येथे न्हावी, तालुका भोर येथे 22 एकर 6 आर इतकी जमीन आहे की जिची बाजारभावाने किंमत 5 लाख रुपये आहे. या शिवाय मुंबईमध्ये त्यांचे तीन फ्लॅटस् आहेत. पैकी सनराईज अपार्टमेंटमधील फ्लॅटची किंमत आहे 23 लाख 23 हजार 985 रुपये असून तो त्यांच्या पत्नी मंगलाबाई यांच्या नावाने आहे. मीरा रोड येथे एक फ्लॅट आहे तो 1 कोटी 41 लाख 120 रुपयांचा श्री.शिवाजीराव तळेकरांच्या नावाने आहे आणि नालासोपारा येथील 4 लाख 58 हजाराचा फ्लॅट आहे तो त्यांच्या मुलाच्या नावाने आहे. असे एकूण तीन फ्लॅटस् त्यांच्या नावे आहेत. अध्यक्ष महाराज, या तळेकरांना युतीच्या काळातच हे प्रमोशन मिळालेले होते.

...... एफ 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1787 ...

श्री. बी.टी.देशमुख : अध्यक्ष महाराज, भ्रष्टाचाराशिवाय ही इतकी संपत्ती त्या कार्यकारी संचालकांनी गोळा केली आहे याची खात्री शासनाने करून घेतली आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महाराज, एवढी संपत्ती त्यांचेकडे येऊ शकत नाही. त्यामुळेच त्यांचेवर डिपार्टमेंटली एन्क्वायरी चालू आहे आणि ही एन्क्वायरी तेथे एमडी असलेले श्री.राजीव,आयएएस हे करीत आहेत. त्यामुळे लौकरच त्यांचा त्याबाबतचा अहवाल येईल. अध्यक्ष महाराज, या ठिकाणी संचालक मंडळ ही खरेदी करीत होते आणि त्यांनी 1996 साली 10 लाखा पर्यंतची खरेदी करण्याचा अधिकार दिलेला आहे त्यामुळेच हा भ्रष्टाचार उघडकीस आलेला आहे. त्याबाबतची पूर्णपणे चौकशी निःसंशयपणे केली जाईल आणि महिना दोन महिन्यात त्याबाबतचा अहवाल येईल. त्याची नोटीस त्यांना दिलेली आहे, शिवाय त्यांचेविरूद्ध डिपार्टमेंटल एन्क्वायरी चालू आहे, त्याबरोबरच कोर्टामध्ये त्यांच्या विरोधात जनहित याचिका देखील दाखल आहे.

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महाराज, या ठिकाणी लेखी उत्तरात मंत्री महोदयांनी म्हटलेले आहे की, याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडून तपशीलवार चौकशी सुरू आहे. त्यापुढे त्यांनी म्हटलेले आहे की, या संदर्भात संबंधित कार्यकारी संचालकाविरूद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत असून त्यांना निलंबित करण्यात आलेले आहे. अध्यक्ष महाराज, या कार्यकारी संचालकांच्या अँटीचेंबरमध्ये दोन कंडोम्स सापडल्याची बातमी वर्तमानपत्रातून आलेली होती. तर शिस्तभंगाच्या कारवाईमध्ये त्याचा देखील समावेश आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महाराज, मी कालच या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या अधिकाऱ्यांबरोबर बोललो आहे. परंतु यासंबंधी काही मी त्यांना ब्रिफिंगमध्ये विचारलेले नाही.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : अध्यक्ष महाराज, संबंधित कार्यकारी संचालकावर आपण शिस्तभंगाची कारवाई करीत आहात. तर या संचालक मंडळामध्ये आणखी कोणकोण पदाधिकारी आहेत ? त्यांची नावे काय आहेत ? आणि इतर जे दोन त्यांचेबरोबर सापडलेले आहेत म्हणून, पण जे कोणी त्यांचेबरोबर सापडलेले नाहीत त्यांची सुद्धा चौकशी केली जाईल काय ?

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महाराज, यांचेबरोबर एक श्री. दीपक थोके म्हणून शाखा व्यवस्थापक, महानंद डेअरी,नागपूर यांचे विरूद्ध देखील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने छापे

.... एफ 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुश्रीम (पुढे चालू...) ता.प्र.क्र.1787

घातलेले आहेत, मात्र त्यांचे विरोधात अजून केस दाखल झालेली नाही. काल ती दाखल होणार होती. या शिवाय त्यांच्या संचालक मंडळामध्ये माजी मंत्री श्री.आनंदराव देवकते हे अध्यक्ष आहेत आणि राज्यमंत्री उपाध्यक्ष असून प्रधान सचिव हे एक सदस्य म्हणून आहेत. एनडीडीबीचेही एक सदस्य होते आणि आता सध्या ते नाहीत ...

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महाराज, आता जे उत्तर दिले आहे त्यानुसार माजी मंत्री असलेले श्री.आनंदराव देवकते हे त्यावर अध्यक्ष आहेत आणि प्रधान सचिवांचे देखील नाव त्यांनी सांगितले आहे. .....

( यानंतर श्री. जागडे ..... जी 1 ...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....1787.......

श्री. दिवाकर रावते.....

श्री. तळेकर यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबतचा सतत दबाव असतानाही श्री. देवकाते आणि सचिवांच्या उपस्थिती कारवाई झाली नाही. परंतु श्री. देवकाते आणि सचिव गैरहजर राहिल्यानंतर श्री. तळेकर यांच्याविरुध्द निलंबनाची कारवाई करण्यात आली. त्यामुळे श्री. देवकाते यांच्या हजेरीचे आणि गैरहजेरीचे रहस्य काय आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, संचालक मंडळ 30 टक्के खरेदी करीत असते. 1996 साली म्हणजे युतीच्या काळात त्यांना 10 लाखापर्यन्तच्या खरेदीचे अधिकार दिल्यामुळे या भ्रष्टाचाराला वाव मिळाला आहे. संचालक मंडळाने जी 30 टक्के खरेदी केली, ती वर्तमानपत्रात जाहिरात देऊन आणि निविदा मागवून केली आहे. त्याचा या भ्रष्टाचा-याशी दुरान्वयाने समन्वय नाही. युतीच्या काळात 10 लाखाच्या खरेदीचे अधिकार दिल्यामुळे हे घडले आहे. नाहीतर हा भ्रष्टाचार झालाच नसता.

डॉ. नीलम गो-हे : युतीच्या काळात जर भ्रष्टाचार झाला असेल तर 2001 सालापासून आपण झोपला होता काय ? तसे नसेल तर युतीच्या काळात हा भ्रष्टाचार घडला आहे, असे जे वाक्य इतिवृत्तात आले आहे, ते काढून टाकण्यात यावे.

( गोंधळ )

**उपसभापती** : माननीय सदस्यांनी एकमेकांवर आरोप करु नये. माननीय सदस्यांनी मुळ प्रश्नावर यावे.

श्री. हसन मुश्रीफ : युतीच्या काळात भ्रष्टाचार झाला आहे, असे मी म्हंटले नाही. युतीच्या काळात म्हणजेच 1996 साली 10 लाखापर्यन्तच्या खरेदीचे अधिकार दिले आहेत. तसेच संचालक मंडळाने भ्रष्टाचार केला आहे, असे मी म्हटले नाही. 10 लाखापर्यन्त खरेदी अधिकार देण्यात आले आहे, हे बरोबर नाही.

( गोंधळ )

डॉ. नीलम गो-हे : युतीच्या काळात भ्रष्टाचार झाला आहे, असे माननीय मंत्रिमहोदयांनी म्हंटले आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 10 लाखापर्यन्तच्या खरेदीचे अधिकार दिले आहेत, त्यामुळे भ्रष्टाचार झाला आहे. तेव्हापासून हा भ्रष्टाचार झाला आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( गोंधळ )

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी भ्रष्टाचार झाला आहे, हे माननीय मंत्रिमहोदयांनी मान्य केले आहे. आता हा भ्रष्टाचार युतीच्या काळात झाला आहे, असे ते म्हणत नाहीत. मग अध्यक्ष श्री. देवकाते आणि त्यांच्या संचालक मंडळाने हा भ्रष्टाचार केला आहे, असे माननीय मंत्रिमहोदयांना म्हणावयाचे आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : 10 लाखापर्यन्त खरेदीचे अधिकार युतीच्या काळात दिल्यामुळे हा गैरप्रकार झाला आहे. या ठिकाणी चूक झाली आहे. त्यामुळे याला कोणी खतपाणी घालावयाची गरज नाही. या ठिकाणी जो घोटाळा झाला आहे, त्या बाबतची पुढील चौकशी करण्यात येत आहे. या ठिकाणी लाचलूचपत विभागामार्फत छापे टाकले जात आहेत.

श्री. बी. टी. देशमुख : जी चूक झाली आहे, ती आता तरी दुरुस्त केली आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : आता या सर्व गोष्टी बोर्डासमोर आणण्याची आवश्यकता आहे. तसा ठरावही करण्यात आला आहे.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, या बाबतची चौकशी होण्यासाठी वेळ लागेल. तोपर्यन्त श्री. तळेकर हे साक्षीदारांवर दडपण आणू शकतील. वेगवेगळ्या मार्गाने साक्षीदारांवर दबाव टाकला जाईल. त्यामुळे या ठिकाणी सर्व संबंधीतांवर कोणते गुन्हे दाखल करण्यात आले आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, कलम 13 (1) (ई), 13 (2) तसेच लाचलूचपत प्रतिबंधक कायदा कलम 109 अन्वये कारवाई करण्यात आली आहे. श्री. तळेकर यांना 14 दिवस पोलीस कोठडी मिळाली होती. आता 35 दिवस त्यांना मॅजिस्ट्रीयल कोठडी मिळाली आहे. त्याप्रमाणे या ठिकाणी कारवाई सुरु आहे.

श्री. वसंतराव काळे : सभापती महोदय, संबंधीतांची प्रॉपटी सरकारने जप्त केली आहे काय? त्यांची प्रॉपर्टी अजूनही जप्त केली नसेल तर सरकार काय करणार आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या सर्व बाबी कोर्टात ठरणार आहेत. तोपर्यन्त आपण काहीच जप्त करु शकत नाही. छापे घालून मालमत्ता पकडण्यात आली आहे. आता या बाबी कोर्टात जातील. श्री. तळेकर याबाबत त्यांना काय सांगावयाचे आहे ते कोर्टात सांगतील.

( यानंतर श्री.सरफरे...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1787....

श्री. हसन मुश्रीफ...

ज्यावेळी कोर्ट आदेश देईल त्यावेळी मालमत्ता जप्त करण्यात येईल.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : मंत्रिमहोदयांनी सांगितल्याप्रमाणे 1996 मध्ये या अधिकाऱ्याला विशेष हक्क व अधिकार देण्यात आले. आणि त्यानंतर एका मागोमाग एक भ्रष्टाचाराचे प्रकार सुरु झाले. माझा प्रश्न असा आहे की, कुडाळ येथील पशुखाद्य कारखाना हा तळेकरच्या मेहेरबानीने सुरु झाला. तो केव्हा सुरु झाला, तो कारखाना आणण्यासाठी कुणी प्रयत्न केले?

श्री. हसन मुश्रीफ : त्या साठी वेगळा प्रश्न विचारावा लागेल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी कुडाळकडे बोट दाखवितांना बाकीची चार बोटे त्यांच्याकडे आहेत. लातूरसह चार ठिकाणी पशुखाद्य कारखाने काढण्यात आले आहेत. त्या साठी महामंडळाने खर्च केला आहे. कॉट्रॅक्टरला दिलेल्या कर्जाचा परतावा घेतला नाही. या संदर्भात तेथील कामगारांनी माननीय मुख्यमंत्री व माननीय दुग्ध विकास मंत्री यांना म्हणजे आपणास अर्ज दिले आहेत. आतापर्यंत आपल्याकडे असे किती अर्ज प्राप्त झाले? त्या अर्जाच्या संदर्भात आपण कोणती कारवाई केली. आपण भ्रष्टाचार नाही असे उत्तरात म्हटले आहे. ज्या निवेदनांवर कामगारांच्या सहया घेण्यात आल्या आहेत अशी किती निवेदने, अर्ज आले आहेत? लातूर, नागपूर, कुडाळ याठिकाणी पशुखाद्य कारखाने सुरु झाले त्यासाठी कुणी भांडवल खर्च केले?

श्री. हसन मुश्रीफ : अँटी करप्शन ब्युरोने भ्रष्टाचार शोधून काढला का, असा प्रश्न विचारला असता त्याला "नाही" असे उत्तर दिले आहे...

श्री. वसंतराव काळे : सभापती महोदय, मला आपले संरक्षण पाहिजे....

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, आपण संरक्षणाबाबत निदेश दिल्यास मी तात्काळ संरक्षण देतो...

श्री. वसंतराव काळे : सभापती महोदय, मला या करिता संरक्षण पाहिजे की, मंत्रिमहोदय मूळ प्रश्नाला उत्तर देत नाहीत. आता त्यांनी म्हटले आहे की, जप्त केलेल्या संपत्तीच्या संदर्भात कोर्टामध्ये निर्णय होईल. या ठिकाणी पहिल्या प्रश्नाला उत्तर देतांना भ्रष्टाचार केला नाही असे सरकारने मान्य केले आहे. तेव्हा "नाही" हा शब्द कोर्टामध्ये पुरावा होऊ शकतो. तेव्हा या प्रश्नाचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

1787....

श्री. वसंतराव काळे...

उत्तर मंत्रिमहोदयांनी दुरुस्त केले पाहिजे. मंत्रिमहोदय याठिकाणी विसंगत उत्तर देत आहेत. याचा अर्थ भ्रष्टाचार केलेला नाही असा होतो, व तो सरकारने मान्य केल्यासारखे आहे...

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही....

(गोंधळ)

श्री. मधुकर सरपोतदार : हा भ्रष्टाचार आहे की नाही हे आपण प्रथम सांगा...

श्री. हसन मुश्रीफ : चौकशी चालू आहे....

(गोंधळ)

श्री. मधुकर सरपोतदार : आपण उत्तरामध्ये "नाही" कसे म्हणता?...

(गोंधळ)

श्री. हसन मुश्रीफ : आपण तो प्रश्न समजून घ्या....

(गोंधळ)

श्री. मधुकर सरपोतदार : आपण "नाही" हा शब्द प्रथम या उत्तरामधून वगळला पाहिजे...

श्री. वसंतराव काळे : सभापती महोदय, "नाही" या शब्दाला आमचा आक्षेप आहे...

(दोन्ही बाजूकडील मा. सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलू लागतात.)

श्री. दिवाकर रावते : "नाही" हा शब्द आपण वगळता की नाही ते सांगा?...

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, भ्रष्टाचाराची चौकशी चालू आहे असे मी म्हटले आहे. 1996 साली तुमच्या काळात त्याला अधिकार दिले आहेत...

(गोंधळ)

श्री. दिवाकर रावते : "नाही" हा शब्द आपण वगळता की नाही ते सांगा?...

श्री. मधुकर सरपोतदार : तुम्ही "नाही" असा उल्लेख करुन कोर्टामध्ये तळेकरला संरक्षण देत आहात...

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सौ.रणदिवे पूर्वी श्री.सरफरे . . . . 12.40

ता.प्र.क्र.1787 . . . .

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन मी येथील उत्तर दुरुस्त करु इच्छितो. याठिकाणी पहिल्या प्रश्नामध्ये म्हटलेले आहे की, " महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघाचे (महानंद) वादग्रस्त कार्यकारी संचालक यांनी करोडो रुपयांचा कथित भ्रष्टाचार केल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अनेक छापे मारुन दिनांत 17-1-2005 रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आणले हे खरे आहे काय ? तर लाचलुचपत खात्याचे काम भ्रष्टाचार काढण्याचे नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, लाचलुचपतचा अर्थ काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, लाचलुचपत याचा अर्थ स्वत:च्या मालमत्तेपेक्षा किती जागा मालमत्ता केली आहे . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

अजून ते सिध्द व्हावयाचे आहे. मी याठिकाणी पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये "नाही" असे जे म्हटलेले आहे, ते दुरुस्त करतो. तेव्हा प्रश्नाच्या पहिल्या उत्तरामध्ये "नाही" ऐवजी "भ्रष्टाचाराची चौकशी सुरु आहे" अशी मी दुरुस्ती करतो.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, भ्रष्टाचार आहे हे मान्य करा.

श्री.हसन मुश्रीफ(खाली बसून) : मान्य केलेला आहे.

श्री.प्रमोद नवलकर(खाली बसूर) : उभे राहून बोलावे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, खरे म्हणजे हा प्रश्न गृह विभागाकडे वर्ग झ ाला असता तर अधिक चांगले झाले असते. कारण याबाबतीत ॲन्टी करप्शन ब्युरोमार्फत ही कारवाई सुरु आहे. त्यामुळे याचे डिटेल्स् या विभागाकडून मिळाले असते. मी पूर्णपणे तयारीने आलेलो नाही. पण माझी जी प्राथमिक माहिती आहे, त्यानुसार ज्यावेळी अनेकांकडून तक्रारी आल्या, कामगारांनी तक्रारी केल्या, कोर्टामध्ये रिट दाखल झाले. वरपासून खालपर्यंत सर्वांकडे तक्रारी आल्यानंतर मग ॲन्टी करप्शन ब्युरोने धाड टाकण्याचा निर्णय घेतला. मी या सदनाच्या विनम्रपणे लक्षात आणून देऊ इच्छितो. मी यापूर्वीच सांगितलेले आहे की, आम्ही या राज्यातील ॲन्टी करप्शन ब्युरो सक्षम करु. याबाबतीत खूप मोठया तक्रारी आल्या होत्या. यातील एक अर्ज

. . . .आय-2

असुधारीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

दि.24-3-2005 (असुधारीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही) आय-2

ता.प्र.क्र.1787 . . . .

श्री.आर.आर.पाटील . . . .

असा होता की, गोरगरीब शेतक-यांनी डोंगरामध्ये, वनामध्ये जाऊन गाई-म्हशी राखावयाच्या, तसेच आपल्या मुलांच्या तोंडचे दूध काढून ते महानंदाकडे पाठवावयाचे आणि येथे मलई खाणारे मात्र दुसरेच बसलेले आहेत. हे खूप गांभीर्याने घेतले गेले. मग अतिशय बारकाईने ॲन्टी करप्शन ब्युरोने धाडी टाकल्या आणि लाखो रुपयांची अपसंपदा आतापर्यंत उघडकीस आली आहे. एखाद्याने भ्रष्टाचार केल्याशिवाय एवढया मोठया प्रमाणात मालमत्ता असू शकत नाही. त्यांनी पैसा कशा मार्गाने मिळविला, कुठे-कुठे भ्रष्टाचार केला, अवाजवी दराने कुठे-कुठे खरेदी केली आणि हे सर्व करण्यासाठी कोणी-कोणी सहकार्य केले या सर्व गोष्टींचा तपास केला जाईल. असे चोर अधिकारी, त्या इन्स्टीटयुटमधीलच नव्हेतर अवघ्या महाराष्ट्राचे शत्रु आहेत. त्यांच्यावर कारवाई करण्याची शासनाची ठाम भूमिका आहे. या भ्रष्टाचाराच्या बाबतीत कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. कोणताही दबाव येऊ शकत नाही. अतिशय चांगल्या पध्दतीने चौकशी चालू आहे. चौकशी पूर्ण झ ााल्यानंतर जी कारवाई करावी लागेल, मग कोणत्या खरेदीमध्ये अवैध प्रकार झालेले आहेत, कुठे दुधात पाणी मिसळलेले आहे, जे काही असेल ते आणि त्यातून निर्माण झालेल्या पैशातून, जी संपत्ती निर्माण केली असेल त्याचे पुरावे गोळा केले जातील आणि या संपत्ती भविष्यात जप्त करण्याच्या दृष्टीने कठोर कारवाई केली जाईल. भ्रष्टाचार करुन अशी संपत्ती मिळविल्यावर कुठेतरी जाब द्यावा लागतो ही एक जरब निर्माण केली जाईल. म्हणून अशा भ्रष्टाचारी अधिका-यांवर कारवाई करण्यास सरकार कचरणार नाही. आज चौकशी चालू आहे, चौकशी पूर्ण झाल्यावर कायद्याप्रमाणे आवश्यक असलेली सर्व कारवाई पूर्ण केली जाईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, याठिकाणी पहिल्या प्रश्नाच्या उत्तरात "नाही" असे म्हटलेले आहे. तर तेथे "होय" असे तरी म्हणावे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मघाशी सन्माननीय राज्यमंत्री श्री.हसन मुश्रीफसाहेब यांनी उत्तरात बदल करतो असे सांगितले आहे आणि मघाशीच त्यांनी बदल केला आहे. परंतु तरी सुध्दा यात भ्रष्टाचार आहे असे मान्य केल्यावर हा विषयच संपतो. त्यांनीही दुरुस्ती केली आहे.

**उप सभापती** : आता माननीय उप मुख्यमंत्री व माननीय गृहमंत्र्यांनी त्यांचे स्पष्टीकरण

. . . .आय-3



असुधारीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**उप सभापती** . . . .

अतिशय सुस्पष्टपणे आणि योग्यनपणे केलेले आहे. त्यांनी अशा प्रकारच्या अधिका-यांवर जरब बसविण्यासाठी शासन काय करु इच्छिते हे सांगितले. तसेच अशा प्रकारचा भ्रष्टाचार उघडकीस आणणारे जे अधिकारी तेथे काम करीत आहेत, खास करुन तेथे एम.डी.असलेले श्री.राजीव साहेबांचा मघाशी चर्चेमध्ये उल्लेख करण्यात आला होता. तर त्यांचे देखील अभिनंदन करणे गरजेचे आहे. कारण अशा वेळी न डगमगता, न कचरता या अधिका-यांनी भ्रष्टाचाराला वाचा फोडली. तेव्हा प्रशासनात असे जे कर्तबगार अधिकारी आहेत, त्यांच्याबाबतीत देखील ॲप्रीसिएशन व्हावयास पाहिजे होते.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1787 (पुढे चालू....

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभागृहाचे नेते, या राज्याचे उप मुख्यमंत्री मा.आर.आर.पाटील साहेबांनी भ्रष्टाचार निर्मूलनाच्या संदर्भात अत्यंत सडेतोड आणि कठोर भूमिका शासन घेत असल्याचे सांगितले, त्याबद्दल त्यांचे अंत:करणापासून अभिनंदन करतो. त्यांचे अभिनंदन करत असतांना भ्रष्टाचार निर्मूलनाच्या संदर्भात कठोर कारवाई करण्याचे त्यांनी वचन दिले. परंतु या प्रश्नामधील पहिल्या उत्तराचा खुलासा झालेला नाही. 'नाही' या शब्दाचा अर्थ काय, याबाबतचे स्पष्टीकरण झ ाालेले नाही.

अनेक सन्माननीय सदस्य : बदल केलेला आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : ' नाही ' हा शब्द त्यांनी काढून टाकलेला आहे काय ?

अनेक सन्माननीय सदस्य : ती त्यांनी दुरुस्ती केलेली आहे.

श्री.अनंत तरे : या कार्यकारी संचालकांबरोबर आणखी कोणते अधिकारी गुंतलले आहेत काय ? या गैरप्रकारातून त्यांनी प्रचंड संपत्ती मिळविली, त्याबद्दल आयकर विभागाला कळविलेले आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : आयकर विभागाला कळविलेले आहे. आयकर आयुक्तांकडून त्याबाबतची माहिती अेसीपींनी घेतलेली आहे. ते तपासामध्ये आलेले आहे.

श्री.अनंत तरे : या चौकशीमध्ये दुसरे कोणी अधिकारी सापडलेले आहेत काय ?

श्री.हसन मुश्रीफ : श्री.फुके म्हणून अधिकारी आहेत, त्यांच्या नागपूरच्या निवासस्थानी ॲन्टी करप्शनने धाड घातलेली आहे. त्यानंतर अंतर्गत दोन-तीन अधिकारी आहेत, त्यांची व्यवस्थापकीय संचालक चौकशी करीत आहेत.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

**बहुसंची प्रश्नपत्रिका योजना रद्द करणे**

**(4) * 4414 श्री. व्ही. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे , श्री. भाऊसाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. ऐनापूरे** : सन्माननीय शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्य शिक्षण मंडळाने एस.एस.सी. व एच.एस.सी. परीक्षा 2005 साठी प्रायोगिक तत्वावर बहुसंची प्रश्नपत्रिका योजना लागू केली आहे हे खरे आहे काय,

(2) बहुसंची प्रश्नपत्रिका योजना रद्द करावी याबाबत दिनांक 17 जानेवारी 2005 रोजी अध्यक्ष, राज्य शिक्षण मंडळ, पुणे यांचेशी शिक्षक महामंडळाचे पदाधिकारी व शिक्षक प्रतिनिधी यांनी चर्चा केली हेही खरे आहे काय,

(3) असल्यास, याबाबत निर्माण होणाऱ्या संभाव्य अडचणी दूर करण्यासाठी शासनाने काय उपाययोजना केली आहे,

(4) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ प्रा..वसंत पुरके यांचेकरिता** : (1) उच्च माध्यमिक (इयत्ता 12 वी) परीक्षेसाठी इंग्रजी व माध्यमिक (इयत्ता 10 वी) परीक्षेसाठी इंग्रजी (द्वितीय/तृतीय) व गणित विषयांमध्ये बहुसंची प्रश्नपत्रिका योजना लागू करण्यात आली आहे.

(2) होय.

(3) (1) प्रश्नपत्रिका आराखड्यानुसार प्रश्नक्रमांक कायम ठेवण्यात आले आहेत.

(2) प्रश्नपत्रिकेची काठिण्य पातळी, एकूण गुण, घटकनिहाय गुण व भारांश प्रश्नांची एकूण संख्या, प्रश्नांचे प्रकार यामध्ये कोणताही बदल केलेला नाही. मात्र 30% प्रश्नांच्या आशयामध्ये बदल असेल.

(3) याबाबतची माहिती विद्यार्थी, प्रचार्य / मुख्याध्यापक केंद्र संचालक, पर्यवेक्षक यांना विभागीय मंडळामार्फत परीक्षापूर्वी देण्यात आली आहे.

(4) परीक्षक व नियामक यांना मुल्यांकनासाठी एकच संचाच्या उत्तरपत्रिका पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(5) विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेवर प्रश्नसंच कोड लिहिणे बंधनकारक आहेत. परंतु एखाद्याने संच कोड लिहिला नाही तर गैरप्रकार नाही याची खात्री करुन उत्तरपत्रिका तपासण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(6) विद्यार्थ्या□ उत्तरपत्रि□मध्ये प्रश्□ांचे □मां□ लिहि□ □हमीच बंध□□र□ असते. तथापि प्रश्□ांचे / उपप्रश्□ांचे □मां□ लिहिले □सतील तर संचाची □ात्री □रु□ उत्तरपत्रि□ तपास□याच्या सूच□ा दिलेल्या आहेत.

(7) शि□□ तसेच विद्यार्थ्यां□ा अडच□ / अडच□ी आल्यास मंडळा□डू□ □िश्चत मा□र्दर्श□ □र□यात येईल.

(4) प्रश्□ उद्भवत □ाही.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, बहुसंची प्रश्नपत्रिका योजना ही मुख्याध्यापक, मॅनेजमेंट आणि पालकांनासुध्दा गैरसोईची आहे, असे अनेक वर्तमानपत्रामध्ये अनेक दिवसापासून प्रसिध्द झालेले आहे. याला आमच्या महामंडळाने देखील विरोध केलेला आहे. या ठिकाणी विद्यार्थ्यांना वेठीस धरलेले आहे. उत्तराच्या दोनमधील पाच क्रमांकामध्ये म्हटलेले आहे की, "विद्यार्थ्याने उत्तरपत्रिकेवर प्रश्नसंच कोड लिहिणे बंधनकारक आहे. परंतु नजरचुकीने संच कोड लिहिला नाही तर गैरप्रकार नाही याची खात्री करुन उत्तरपत्रिका तपासण्याच्या सूचना दिलेल्या आहेत." उत्तरपत्रिका तपासणा-यानी त्याच्या मनात काय होते, हे शोधायचे आहे. उत्तर पत्रिका तपासण्याचे काम बाजूलाच राहिले. पण हा कोड लिहिला की नाही, याची पहिल्यांना उत्तरपत्रिका तपासणाऱ्या शिक्षकाला तपासणी करायची आहे. सहाव्या उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, "विद्यार्थ्यांने उत्तरपत्रिकेमध्ये प्रश्नांचे क्रमांक लिहिणे नेहमीच बंधकारक असते. तथापि प्रश्नांचे/उपप्रश्नांचे क्रमांक लिहिले नसतील तर संचाची खात्री करुन उत्तरपत्रिका करुन उत्तर पत्रिका तपासण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. " म्हणजे उत्तर पत्रिका तपासण्याची खात्री करत बसायचे आहे काय ? यांची खात्री ती यामध्ये आहे,की, 20 सप्टेंबर 2004 ला शासनाने पत्रक काढलेले आहे. स्टेट बोर्डाने त्यामध्ये स्पष्टपणे विद्यार्थ्यांना कसे वेठीस धरलेले आहे, ते सांगतो. यांनी आठव्या मुद्यामध्ये स्पष्ट म्हटलेले आहे की, प्रश्नपत्रिका संचाचे अक्षर म्हणजे सेट कोड न लिहिल्यास, चुकीचे लिहिल्यास ती उत्तरपत्रिका तपासलीच जाणार नाही. एकीकडे तपासा म्हणजे अंतज्ञानी व्हा. आणि दुसरीकडे स्पष्ट लेखी सूचना दिलेल्या आहेत की, " जर त्यांनी प्रश्नपत्रिका संचाचे अक्षर लिहिले नसेल तर ती उत्तरपत्रिका तपासायची नाही," म्हणजे मुलांचा यामध्ये खत्मा करायचा काय ? सभापती महोदय, 9 मध्ये असे म्हटलेले आहे की, प्रश्नांचा क्रमांक, उपप्रश्न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

ता.प्र.क्र.4414 ......

श्री. व्ही.यू. डायगव्हाणे (पुढे चालू...

क्रमांक अचूकपणे समासामध्ये लिहिणे अनिवार्य आहे. प्राप्त संचामधील प्रश्न क्रमांक, उपप्रश्न क्रमांक न लिहिल्यास, त्या विद्यार्थ्याला त्या उपप्रश्नास शून्य गुण दिले जातील. मायनर चुकीसाठी एवढी शिक्षा देण्याचा अधिकार आपल्याला कोणी दिलेला आहे ? म्हणून माझे म्हणणे आहे की, मुलांना वेठीस धरु नका, सर्वांकडून याबाबत विरोध झालेला आहे. सोपा प्रश्नाकडून कठीणकडे प्रश्न सोडवण्याची पध्दत आहे पण येथे सोपे काय आहे...म्हणून माझा प्रश्न असा आहे की,कोणालाही विश्वासात न घेता, ही योजना लागू केली आहे. अशाप्रकारची किती योजना लादता, सगळा बट्टयाबोळ केलेला आहे. म्हणून ही योजना सर्वांना, सर्व संघटनांच्या प्रतिनिधींना विश्वासात घेऊन केली पाहिजे. कारण ही योजना सध्या प्रायोगिक तत्वावर आहे.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MHM/ SBT/ प्रथम श्री. किल्लेदार... 12:50

ता.प्र.क्र.4414..

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे..

सर्व संघटनेच्या पदाधिका-यांना, प्रतिनिधींना विश्वासात घेण्यात यावे. सध्या हे प्रायोगिक बेसिसवर सुरु आहे. म्हणून पुढील वर्षी सर्वांना विश्वासात घेऊन ही योजना लागू कराल काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, लेखन-वाचना संबंधीचा प्रश्न या सभागृहात चर्चेला आला होता. आता बहुसंची प्रश्न पत्रिकांचा प्रश्न चर्चेला आला आहे. इयत्ता बारावीची परीक्षा सुरु झाल्यानंतर आपण टी.व्ही. वर काय बघितले? टी.व्ही. लावल्यानंतर त्यावर पालक, शिक्षक, विद्यार्थ्यांचे मित्र कॉपी खिडकीतून टाकत आहेत आणि त्यांच्या मागे पोलीस लागलेला आहे असे भयानक चित्र पहावयास मिळाले. म्हणून एस.एस.सी. च्या परीक्षा बोर्डाला यामध्ये काही सुधाराणा करावी असे वाटले. सभापती महोदय, ही केवळ महाराष्ट्रात आणलेली नाही तर ओरिसा, कर्नाटक आणि केंद्रामध्ये ही पध्दती आणलेली आहे. सभापती महोदय,बहुसंची प्रश्न पत्रिकेचा प्रयोग करावयाला काय हरकत आहे? हा प्रयोग आहे. श्री. डायगव्हाणे साहेबांनी सूचना केली आहे की, सगळया संघटनांना विश्वासत घ्या. शासन निश्चितपणे इयत्ता 10 वी आणि 12 वी च्या सगळया विषयांना बहुसंची प्रश्न पत्रिका आणणार आहोत त्याच्यापूर्वी तुमच्या संघटनांशी चर्चा करुन ही पध्दत अवलंबू असा विश्वास मी तुम्हाला या निमित्तने देतो.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, या पत्रकामध्ये ज्या अटी आहेत त्याबाबती शिक्षकांनी अंतरज्ञानी होऊन पेपर तपासावे काय? त्या अटी संबंधीच्या लेखी सूचना पेपर तपासणा-यां शिक्षकांना दिलेल्या आहेत काय?

श्री. हसन मुश्रीफ : दिनांक 29 जानेवारी,2005 ला त्या परिपत्रकात दुरुस्ती केलेली आहे. तथा त्या परिपत्रकाची कॉपी मी श्री. डायगव्हाणे साहेबांना देईन. कोडनंबर घातलेले नसतील तर त्याबद्दल सूचना दिलेली आहे.सभापती महोदय, मी अशी विनंती केली की, हा नवीन प्रयोग आहे. कॉपीला आळा घालावयाचा आहे. विद्यार्थ्यांचा दर्जा खालावत चाललेला आहे.तो सुधारण्याच्या दृष्टीने आम्हाला थोडेसे सहकार्य करा.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, या संपूर्ण राज्यात मार्च 2004 मध्ये असे गैर प्रकार किती झाले आणि 2005 मध्ये किती झाले? दोन्ही वर्षातील गैरप्रकारामध्ये काही तफावत आहे काय?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4414....

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, इयत्ता 12 वीच्या परीक्षेला गेल्या वर्षी 3800 विद्यार्थी कॉपी करतांना सापडले होते आणि यावर्षी 2600 विद्यार्थी सापडले आहेत. अजून इयत्ता 10 वी ची परीक्षा दिनांक 15 मार्च ते 29 मार्च पर्यंत सुरु आहे. त्याची आकडेवारी उपलब्ध झालेली नाही. परंतु या कॉपी प्रकारला यामुळे आळा बसलेला आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या प्रश्नातून जे प्रतिध्वनीत होते ते वेगळे वाटते म्हणून मी या ठिकाणी प्रश्न विचारण्यासाठी उभा आहे. ही योजना उत्कृष्ठ आहे. महाराष्ट्राचे कॉपी प्रकरणाचे धिंडवडे निघालेले आहेत. गेले 15 दिवस आम्ही पाहात आहोत की, त्यामध्ये शिक्षक सामील आहेत. पोलीस सामील आहेत,पालक सामील आहेत आणि मुख्याध्यापकही सामील आहेत. सभापती महोदय, ज्या शिक्षकांसाठी या सभागृहात जास्तीत जास्त वेळ खर्च केला जातो ते यामध्ये सामील आहेत.

( काही सदस्य एकाचवेळी उभे राहून बोलत असतात )

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, शिक्षकांवर हा हेत्वारोप करणे योग्य नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या परीक्षा पध्दतीमध्ये ए,बी,सी,डी असे चार पेपर निघणार आहेत, त्यामुळे कॉपी बंद होईल. त्यामुळे हा चांगला निर्णय आहे. चांगली योजना आहे. हा प्रयोग असेल तर त्यामध्ये सुधारणा करता येईल. परंतु या चांगल्या योजनेला बहुसंख्य लोकांचा विरोध आहे असे मांडले जात असेल तर ते बरोबर नाही.

श्री. वसंतराव काळे : सभापती महोदय, या प्रश्नावर चर्चा करण्याचा अधिकार आहे पण येथे उभे राहून दुस-या विषयी अपशब्द वापरण्याचा अधिकार सन्माननीय सदस्यांना नाही. ..

श्री. हसन मुश्रीफ : सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब काही शिक्षक असे म्हणाले..

( काही सदस्य एकाचवेळी उभे राहून बोलत असतात )

**उपसभापती** : रेकॉर्डवर काहीही घेऊ नये.

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. बरवड...

RDB/ KGS/ SBT/ MHM/ MAP प्रथम कु. थोरात 12:55 वा.

ता. प्र. क्र. 4414 .....

( अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करीत असतात )

श्री. हसन मुश्रीफ : सन्माननीय सदस्यांनी "काही शिक्षक" असा उल्लेख केला.

श्री. वसंतराव काळे : सभापती महोदय, यामध्ये अंतर्भूत असलेल्या सर्व घटकांना एकत्र करुन पर्यायी उपाययोजना करण्यासाठी...

( अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करीत असतात )

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. या गोंधळामध्ये जी वक्तव्ये झाली ती कामकाजातून काढून टाकण्यात येतील. यानंतर पुढचा प्रश्न घेण्यात येईल.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अनुदान वितरणातील विलंबामुळे सहा महिने वेतन न होणे**

**(५) * १७९६ प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते , प्रा. शरद पाटील :** सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक ४ सप्टेबर १९९९ च्या शासननिर्णयातील परिच्छेद ४ नुसार अनुदान वितरणाची जबाबदारी तंत्रशिक्षण संचालनालयाने पार न पाडल्यामुळे, डॉ. पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे माहे ऑगस्ट, २००४ पासूनचे वेतन अजूनही अदा करण्यात आलेले नाही, अशी तक्रार करणारे एक निवेदन या तंत्रनिकेतन मधील शिक्षक संघटनेने दिनांक १५ जोनवारी २००५ रोजी किंवा त्या दरम्यान सहसंचालक, तंत्रशिक्षण अमरावती यांचेमार्फत मा.संचालक तंत्रशिक्षण यांना सादर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तक्रारीच्या निवारणार्थ शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुरेश शेट्टी, श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता : (१) होय.

(२) डॉ.पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन, अमरावती या संस्थेतील कर्मचा-यांना माहे डिसेंबर,२००४ पर्यंतचे वेतन अदा करण्यात आलेले आहे. संस्थेच्या पुढील तीन महिन्याच्या वेतन अनुदानाचे देयक फेब्रुवारी,२००५ मध्ये अधिदान व लेखा कार्यालय,मुंबई यांना सादर करण्यात आले असून देयक पारित झाल्यावर सदर रक्कम कर्मचा-यांचे वेतन अदा करण्यासाठी संस्थेस वितरीत करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी जे उत्तर दिलेले आहे त्यामध्ये त्यांनी ही गोष्ट मान्य केलेली आहे. या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, " दि. 28.10.2004 म्हणजेच दिवाळीपूर्वी सुध्दा सर्व कर्मचाऱ्यांनी अत्यंत तातडीने आपणास पत्र पाठवून दिवाळीपूर्वी आमचे पगार करण्याची विनंती केली होती परंतु या पत्रव्यवहाराची आपणाकडून आतापर्यन्त कोणतीही दखल घेतली गेली नाही. त्यामुळे आजच्या घडीला आमचे ऑगस्ट, 2004 पासूनचे म्हणजेच पाच महिन्यांचे पगार थकीत आहेत." हा जो विलंब झाला त्याचे कारण काय ? मी मुद्दाम यासाठी विचारतो की, हे पुन्हा त्या श्री. तळेकर सारखा प्रकार आहे काय ? शासन निर्णयाच्या विरुध्द जाऊन ...

**उपसभापती** : आता श्री. तळेकर हे आयडॉलच्या भूमिकेत जाणार काय ?

प्रा. बी. टी. देशमुख : ते जाऊ द्या. श्री. तळेकर यांचा उल्लेख काढून टाकावा. माझे असे म्हणणे आहे की, हा विलंब का झाला ? याचे कारण मला पाहिजे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ SBT/ MHM/ MAP

ता.प्र.क्र. 1796 .....

श्री. सुरेश शेट्टी : फेब्रुवारी पर्यन्तचे सर्व वेतन दिले गेले आहे. आता आम्ही एकूण 99.6 लाख रुपये या संस्थेला रिलीज केले आहेत. फेब्रुवारी पर्यन्तचे पूर्ण वेतन दिले गेले आहे. फक्त पे अँड अकाऊंट्समध्ये आणि आमच्या खात्यामध्ये थोडे कोऑर्डीनेशन ठीक नाही म्हणून हे झाले होते. या अगोदर सुध्दा या बाबत आपण सदनात आश्वासन दिले होते की, याबाबतीत बसून आमच्या डिपार्टमेंटमध्ये ही प्रोसेस सिम्प्लीफाय करण्यासाठी आणि एफिशिएंट करण्यासाठी आम्ही..

प्रा. बी. टी. देशमुख : मी माननीय मंत्रिमहोदयांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, प्रोसेस करेक्ट आहे. प्रोसेसमध्ये काहीही बदल करण्याची आवश्यकता नाही. दि. 4 सप्टेंबर, 1999 चा शासन निर्णय आहे त्यातील परिच्छेद 4(2) मध्ये अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित केलेली आहे पण त्यांच्या टेबलावरचे कागद हलतच नाहीत हा खरा त्रास आहे. म्हणून मी मुद्दाम विचारले होते की, शासन निर्णय असताना हे लोक सहा महिने विलंब करतात याची तुम्ही चौकशी केली आहे काय ? त्याचे उत्तर दिले नाही. आता मी ते विचारत नाही. दि. 4 सप्टेंबर, 1999 च्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केली पाहिजे आणि त्या त्या तिमाहीचे आगाऊ अनुदान दिले पाहिजे, 1 तारखेला ते झाले पाहिजे अशी तरतूद आहे. त्याप्रमाणे सक्त कार्यवाही करण्याचे आदेश आपण आपल्या अधिकाऱ्यांना द्याल काय ? नाही तर त्यांना त्याबाबतीत जबाबदार धरणार काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, आदेश देऊ.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : यामध्ये सॅलरी आणि नॉन सॅलरी हे अनुदान एकत्र दिले जाते. अनेक मॅनेजमेंट नॉन सॅलरीसाठी हे अनुदान वापरतात. वर्धा येथील कॉलेजमध्ये जवळजवळ 25 लाख रुपये त्यांनी इमारत बांधण्यासाठी पगारातून वापरले. सॅलरी अनुदान आणि नॉन सॅलरी अनुदान वेगवेगळे करुन सॅलरी अनुदानातून कोणताही पैसा इकडे वापरता येणार नाही अशा सक्त सूचना दिल्या जातील काय ?

श्री. सुरेश शेट्टी : नियम असा आहे की, सॅलरी अनुदान हे सॅलरीसाठीच वापरले पाहिजे. परंतु असे होत नाही हे खरे आहे. महाराष्ट्रामध्ये अनेक संस्था अशा आहेत की ते सॅलरीचे अनुदान घेऊन दुसरीकडे वापरतात. अशा बाबी पुढे आल्या तर त्यांच्यावर ॲक्शन घेऊ.

**उपसभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला.

-----

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानपरिषदेच्या सन 2003 च्या तिस-या अधिवेशनातील विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र.39573 च्या संदर्भात देण्यात आलेल्या आश्वासन क्रमांक 155 च्या पूर्ततेबाबतच्या कार्यवाहीची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

----

श्री.हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "नियुक्त शिक्षकेतर कर्मचा-यांचे मासिक वेतन बंद करणे" या विषयावरील सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे व इतर वि.प.स.यांनी उपस्थित केलेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचनेबाबत दिनांक 14 डिसेंबर, 2001 रोजी केलेल्या निवेदनावरील अनुपूरक प्रश्नोत्तरांचे वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

----

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. दिनांक 23.3.2005 रोजी चेंबूर येथील आरसीएफ कॉलनीतील लॉरेटो कॉन्व्हेंट शाळेतील कु.सुरजीत कौर व तिच्या दोन मैत्रिणींवर ॲसिड फेकल्याची घटना घडली आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, हा लक्षवेधीचा विषय असल्यामुळे तो औचित्याचा मुद्दा कसा काय होऊ शकतो ?

**उप सभापती** : या विषयासंबंधीची नियम 93 ची सूचना माझ्याकडे आलेली आहे.

श्री.संजय दत्त : मी देखील यासंबंधी नियम 93 ची सूचना दिलेली आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ MHM/ KGS/ SBT/

## नियम 93 च्या सूचना

**उप सभापती** : आज नियम 93 अन्वये काही सूचना आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनी "जागतिक बँकेचे सभासद व मॅगेसेसे अॅवॉर्ड विजेते श्री.अरपुथम जोकिन यांनी स्पार्क या सेवाभावी संस्थेमार्फत झोपडीधारकांच्या संदर्भात तुर्भे व मानखुर्द येथील संक्रमण शिबिरात केलेली बेकायदेशीर कामे व भ्रष्टाचार, त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची होत असलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. हा नियम 93 चा विषय नाही. याबाबत शासनाने निवेदन करावे. सबब, सूचनेस मी अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे, श्रीमती नीलम गो-हे व इतर वि.प.स.यांनी "दिनांक 23.3.2005 रोजी चेंबूर येथील आरसीएफ कॉलनीतील लॉरेटो कॉन्व्हेंट शाळेतील कु.सुरजीत कौर व तिच्या दोन मैत्रिणींवर अॅसिड फेकण्याची घडलेली घटना" या विषयावर नियम 93 ची सूचना दिलेली आहे. हा नियम 93 चा विषय नाही. याबाबत शासनाने निवेदन करावे. सबब, सूचनेस मी अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवाणी यांनी "सांगली बस स्थानकाच्या अत्यल्प जागेमुळे तसेच वाढत्या गर्दीमुळे दोन गाडयांमध्ये चेंगरुन एका वृध्द महिलेचा दिनांक 21 मार्च, 2005 रोजी झालेला दुर्दैवी मृत्यू, तसेच या बसस्थानकावर गेल्या 3 महिन्यात 10 प्रवाशांना प्राण गमवावा लागणे" या विषयावर नियम 93 ची सूचना दिलेली आहे. हा नियम 93 चा विषय नाही. शासनाने याबाबत निवेदन करावे, सबब, सूचनेस मी अनुमती नाकारीत आहे. इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

आता नियम 93 च्या सूचनांवरील निवेदने घेण्यात येतील. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, एकेका निवेदनावर एकच प्रश्न विचारण्यात यावा. या सभागृहामध्ये प्रश्न विचारण्यास आपण परवानगी देतो, खालच्या सभागृहामध्ये एकही प्रश्न विचारला जात नाही. मा.सदस्यांनी एका निवेदनावर एकच प्रश्न विचारावा.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : सिंधी कॉलनी, नंदुरबार येथील श्रीमती ज्योती निर्मलकुमार दुसेजा यांच्या घरी नंदुरबार नगरपरिषदेच्या 8-9 कर्मचा-यांनी जबरदस्तीने प्रवेश करणे.

**मु.शी.** : सिंधी कॉलनी, नंदुरबार येथील श्रीमती ज्योती निर्मलकुमार दुसेजा यांच्या घरी नंदुरबार नगरपरिषदेच्या 8-9 कर्मचा-यांनी जबरदस्तीने प्रवेश करणे यासंबंधी सर्वश्री गुरुमुख जागवानी, नितीन गडकरी, कन्हैयालाल गिडवानी, विनोद तावडे, अशोक मोडक, श्रीकांत जोशी,वि.प.स. यांनी दिलेली 93 अन्वये सूचना.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री गुरुमुख जागवानी, नितीन गडकरी, कन्हैयालाल गिडवानी, विनोद तावडे, अशोक मोडक, श्रीकांत जोशी यांनी "नंदुरबार येथील श्रीमती ज्योती निर्मलकुमार दुसेजा यांच्या घरी नंदुरबार नगरपरिषदेच्या 8-9 कर्मचा-यांनी जबरदस्तीने प्रवेश करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती मा.सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ MHM/ KGS/ SBT/

श्री. गुरुमुख जागवानी : सभापति महोदय, 15 मार्च 2005 को नंदूरबार नगरपालिका के कर्मचारियों ने घरपट्टी वसूल करने के लिए एक सिंधी महिला के ऊपर अत्याचार किया, उसके साथ मार-पीट की गई और जब वह इस बात की शिकायत करने के लिए पुलिस स्टेशन में गई तो वहां पर उसकी शिकायत भी नहीं लिखी गयी. उसको दोपहर 11.00 बजे से शाम के 7.00 बजे तक रोका गया. इसलिए मेरा प्रश्न यह है कि नंदूरबार नगरपालिका का कितना कर कितने लोगों पर बाकी है और उनसे यह कर वसूलने के लिए नगरपालिका की तरफ से क्या कार्रवाई की गई है ?

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, घरपट्टी हा विषय नगरविकास विभागाच्या अंतर्गत येतो. त्यामुळे गृह राज्यमंत्री यावर कसे काय उत्तर देत आहेत ?

श्री. गुरुमुख जागवानी : सभापति महोदय, यह नंदूरबार नगरपालिका की घरपट्टी वसूल करने का सवाल है, लेकिन लोगों के ऊपर पुलिस केस किए जा रहे हैं और उनको पुलिस की तरफ से धमकी दी जा रही है.

. . . यानंतर शिगम.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : नंदूरबार नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री. शिंदे यांच्या विरुध्द श्रीमती ज्योती दुसेजा यांनी फिर्याद दिल्यावरुन नंदूरबारचे सीइओ विरुध्द 451,509,504 आणि 506 अन्वये गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : फक्त 4 हजार रु.च्या वसुलीसाठी 63 कुटुंबांना जेलमध्ये टाकलेले आहे. नगरपरिषदेच्या अधिकारी आणि कर्मचा-यांवर देखील गुन्हे दाखल झालेले आहेत. ज्यांच्याकडून वसुली झाली त्यांच्यावरही गुन्हे दाखल झालेले आहेत. 1995नंतरच्या झोपड्या जे रेग्युलराईज करतात त्यांच्याबाबतीत आपण काही कारवाई करीत नाही. माझा प्रश्न असा आहे की, या प्रकरणी शासन ज्युडिशियल इन्क्वचायरी करणार आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हत्रे : जेव्हा श्रीमती ज्योती दुसेजा यांनी मुख्याधिका-यांविरुध्द तक्रार केली त्यावेळी मुख्याधिका-यांनीही श्रीमती दुसेजा आणि त्यांच्या इतर सहाका-यांविरध्द तक्रार केली. त्यावेळी बाहेर 500-600 लोकांचा जमाव जमला होता. त्यांचे म्हणणे असे होते की, मुख्याधिका-यांना अटक करा. त्यावेळी सिंधी समाजाचे नेते आणि काही प्रतिष्ठित लोकांनी तेथे येऊन जमावाला शांत करण्याचा, समजविण्याचा प्रयत्न केला. ते लोक तेथून निघून गेल्यानंतर जमावाने तेथील मोटार-सायकलींची जाळपोळ केली, दंगल केली. या संदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला. वसुलीसाठी गुन्हा दाखल केलेला नाही.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/

**पृ.शी.** : रत्नागिरी जिल्हयातील मौजे चांदोर येथे गुरख्याची, त्याच्या पत्नीची व दोन मुलांची झालेली हत्या

**मु.शी** : रत्नागिरी जिल्हयातील मौजे चांदोर येथे गुरख्याची, त्याच्या पत्नीची व दोन मुलाची झालेली हत्या याबाबत सर्वश्री अनंत तरे व अरविंद सांवत यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृहराज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री अनंत तरे व अरविंद सांवत यांनी "रत्नागिरी जिल्हयातील मौजे चांदोर येथे गुरख्याची, त्याच्या पत्नीची व दोन मुलांची झालेली हत्या"या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस : येथेसोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3..

MSS/ KGS/ MAP/

श्री. अनंत तरे : परवा वसईमध्ये अशाच प्रकारची घटना घडली. एका इसमाला, त्याच्या पत्नीला आणि दोन मुलांना मारण्यात आले. त्या प्रकरणी तीन आरोपींना पकडण्यात आले. नंतर त्यांना सोडून दुस-या आरोपींना पकडले. या एका प्रकरणी एक इसम, त्याची पत्नी आणि दोन मुलांची हत्या करण्यात आली. अशाच प्रकारची घटना दीड वर्षापूर्वी घडली होती. अशा घटना घडत असताना त्या घटनांचा तपास करुन आरोपींना पकडा. माझा प्रश्न असा आहे की, या संपूर्ण गुन्ह्याची तपासणी पोलीस महासंचालकाकडून करणार काय ?

श्री. सिध्दाराम म्हत्रे : गुरखा लोकांची हत्या झालेली आहे. मागे दोन-तीन वर्षापूर्वी अशाच प्रकारे हत्या झाली होती. त्यावेळी एका गुरख्याने दुस-या गुरख्याची हत्या केली होती. त्या प्रकरणातील आरोपी नेपाळमध्ये पळून गेला होता. नेपाळमधून पकडून आणण्यासाठी आपल्या पोलिसांनी परवानगी मागितली होती. परंतु शासनाने ती परवानगी दिली नाही. कारण नेपाळ सरकारचे म्हणणे असे आहे की, ते सर्व प्रकरण आमच्याकडे पाठवा, आम्ही त्यांच्यावर केस चालवतो.

श्री. अरविंद सावंत : मा. सदस्यांच्या प्रश्नाला उत्तर मिळालेले नाही. या प्रकरणी पोलीस महासंचालकांमार्फत चौकशी केली जाईल काय ? गुरखा म्हणजे नेपाळी असा अन्वयार्थ लावून जी चौकशी केली जाते ते गैर आहे. हे गुरख्याचे प्रकरण आहे म्हणून माझी शासनाला सूचना आहे की, जी कोणी मंडळी गुरख्यांना कामाला ठेवतील त्यांनी त्याची सर्व माहिती तेथील पोलीस स्टेशनला द्यावी अशा प्रकारच्या सूचना पोलिसांना आणि नागरिकांना द्याव्यात. सगळे गुरखे हे नेपाळ मधीलच आहेत असे समजण्याचे कारण नाही. इशान्येकडील जेवढी राज्ये आहेत तेथील माणसे ही गुरख्यासारखीच दिसतात. म्हणून जो कोणी नोगरिक गुरख्याला नोकरीला ठेवील त्याने त्या गुरख्यासंबंधीची सर्व माहिती पोलिसांना देण्यासंबंधीच्या सूचना देण्याबाबतची कार्यवाही शासन करील काय ?

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम 13:10

श्री. सिध्दराम म्हत्रे : सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्या प्रमाणे महासंचालकांकडून या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी सूचविले की, जे गुरखे मुंबई शहरात कामासाठी येतात त्यांची पूर्ण चौकशी करुन नंतरच त्यांना कामे द्यावीत अशा सूचना गृह विभागाकडून दिल्या जाव्यात. सन्माननीय सदस्यांनी सुचविल्या प्रमाणे संबंधिताना गृह विभागाच्या माध्यमातून सूचना देण्यात येतील.

------------------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : महाराष्ट्रातील माध्यमिक शाळेतील शिक्षकेतर कर्मचा-यांच्या भरतीवर शासनाने आणलेली बंदी.

**मु. शी.** : महाराष्ट्रातील माध्यमिक शाळेतील शिक्षकेतर कर्मचा-यांच्या भरतीवर शासनाने आणलेली बंदी याबाबत सन्माननीय सदस्य श्रीमती संजीवनी रायकर,श्री.रामनाथ मोते,श्री.प्रतापराव सोनावणे यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.वसंत पुरके ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्रीमती संजीवनी रायकर,सर्वश्री.रामनाथ मोते,प्रतापराव सोनावणे यांनी "महाराष्ट्रातील माध्यमिक शाळेतील शिक्षेकेतर कर्मचा-यांच्या भरतीवर शासनाने आणलेली बंदी " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------------------

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम 13:10

श्रीमती संजीवनी रायकर : माजी संचालक चिपळूणकर यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षकेतर कर्मचा-यांचा कार्यभार किती आहे व किती पदे निर्माण केली पाहिजेत या दृष्टीने एक समिती नेमण्यात आली होती. त्या समितीने शासनास अहवाल सादर केलेला आहे. त्यांनी काही शिफारशी अहवालात दिलेल्या आहेत. त्या शिफारशींची कोणत्याही प्रकारची अंमलबजावणी केली गेलेली नाही. या अहवालाला काटकसरीच्या नावाखाली शासनाने केराची टोपली दाखविण्याचे काम केलेले आहे. शासनाने 21.2.2003 रोजी काढलेल्या जी.आर.ला सगळया वर्गातून विरोध करण्यात आला. या जी.आर.ला विधान परिषदेमध्ये सुध्दा विरोध झाला त्यानंतर तो जी.आर.शासनाकडून रद्द करण्यात आला. निवेदन वाचल्यानंतर सगळयांच्या लक्षात येईल की, शासनाने चंचल वृत्ती दाखविलेली आहे. किती तरी धरसोडपणा शासनाने केलेला आहे. दहा वेळेस वेगवेगळे शासनादेश निघालेले आहेत. केवळ शासनाचा हेतू काटकसर करणे हाच आहे. मला एकच प्रश्न विचारण्याची संधी दिली असल्यामुळे मला सगळी पार्श्वभूमी मंत्री महोदयांना सांगणे भाग आहे. शिक्षकेतर कर्मचा-यांना ब-याच प्रकारची कामे देण्यात येतात...

**उप सभापती** : आपण स्पेसिफीक प्रश्न विचारा.

श्रीमती संजीवनी रायकर : एका शाळेत जवळपास चार पेक्षा जास्त वर्ग असतात. या वर्गात बरेच विद्यार्थी असतात. 75 ते 80 विद्यार्थ्यांचे काम एक शिक्षकेतर कर्मचारी कसा काय करु शकेल ? एक शिपाई ते काम करु शकेल काय ? सर्व वर्ग झाडावयाचे, इतर शिक्षकांची शाळेतील कामे करावयाची. सर्व कामे करणे त्यास अशक्य होते. निवेदनात म्हटले आहे की, उच्चस्तरीय समितीची नियुक्ती केली आहे. उच्चस्तरीय समितीची कधी बैठकच होत नाही. त्यामुळे या संबंधीची सगळी प्रकरणे प्रलंबीत रहातात. याच्यासाठी हा संबंध जी.आर.बदलून जो चिपळूणकर समितीचा अहवाल आहे. त्या अनुषंगाने आपण पुन्हा शिक्षकेतर कर्मचा-यांचा नेमणूका करणार आहात काय ?

श्री. वसंत पुरके : सभापती महोदय, चिपळूणकर समिती,कोकणे समिती या दोन्ही समित्यांच्या संदर्भात हा मुद्दा अतिशय गांभीर्याने घेतलेला आहे आणि शिक्षकेतर पदांच्या निर्मिती बाबत संबंधीत विभागाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे.

श्रीमती संजीवनी रायकर : यासंबंधी कधी पर्यन्त निर्णय घेण्यात येणार आहे ?

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंत पुरके :लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल. शिक्षकेतर कर्मचा-यांवर अन्यायकारक भूमिका निश्चितपणे असणार नाही. अत्यावश्यक पदे निर्माण केली जातील.

श्री.रामनाथ मोते : सन्माननीय मंत्र्यांकडून अतिशय मुलभूत प्रश्नाचे उत्तर घेऊ इच्छितो. शिक्षकेत्तर कर्मचारी भरण्यावर शासनाने बंदी घातली. शिक्षकेतर कर्मचा-यांना लागू असलेली अनुकंपाची योजना देखील बंदी घालण्यात आलेली आहे. एखाद्या शिक्षकेतर कर्मचा-याचे निधन झ ाले तर त्याच्या मुलास किंवा त्याच्या पत्नीस तातडीने सेवेत घेतले जात होते. निधन पावलेल्या शिक्षकेतर कर्मचा-यांच्या कुटुंबियास शैक्षणिक पात्रतेनुसार शिक्षकेत्तर पद मिळत दिले गेले पाहिजे. परंतु शासनाने त्यावर देखील बंदी आणलेली आहे. तीन-तीन, चार-चार वर्षे शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नेमणूका झालेल्या नाहीत. अनुकंपा तत्वावरच्या नेमणूका करण्यासबंधी शासन तातडीने मान्यता देईल काय ? आता आपण नवीन आराखडा आणलेला आहे या नवीन आराखडयाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे ?

श्री. वसंतराव पुरके : आराखडा हा निश्चितच अन्यायकारक असणार नाही याची आम्ही दखल घेऊ.

--------------

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

24-03-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) O-5

ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम 13:10

**पृ. शी.** : सातारा जिल्हयात ग्रामीण व शहरी भागात दरोडेखोरांनी केलेली लूटालूट.

**मु. शी.** : सातारा जिल्हयात ग्रामीण व शहरी भागात दरोडेखोरांनी केलेली लूटालूट याबाबत सन्माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवानी यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवाणी यांनी " सातारा जिल्हयात ग्रामीण व शहरी भागात दरोडेखोरांनी केलेली लूटालूट" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------------------

यानंतर श्री. उपरे..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(निवेदनानंतर)

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, सातारा जिल्ह्यामध्ये गेल्या 15 दिवसांमध्ये अनेक गुन्हे घडले आहेत. तरी गेल्या 15 दिवसांमध्ये त्या ठिकाणी दरोडे,जबरी चोरी, घरफोंडी अशा प्रकारचे किती गुन्हे घडले आहेत ? गुन्हे उघडकीस येण्याच्या दृष्टीने खास तपास पथके निर्माण करण्यात आलेली आहेत. तरी या खास तपास पथकातील अधिका-यांची नावे आणि हुद्दे काय आहेत ? अधिकारी दुर्लक्ष करीत असल्यामुळे अशा प्रकारच्या घटना घडत असल्यामुळे त्यांची बदली आपण करणार आहात काय ?

श्री.सिध्दराम म्हेत्रे : खास तपास पथकातील अधिका-यांची नावे माझ्याकडे आता नाहीत. तरी ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी :सभापती महोदय, मंत्री महोदयांकडे ही नावे नसतील तर आपण हे निवेदन राखून ठेवावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

**उप सभापती** : नियम 93 चे निवेदन राखून ठेवण्याची पध्दत नाही.

श्री.सिध्दराम म्हेत्रे : या खास पोलीस पथकाचे प्रमुख श्री.भोसले-पाटील हे आहेत.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : पोलिसांच्या संगनमताने असे प्रकार घडत असल्याने त्यांच्यावर कारवाई केली जाईल काय ?

श्री.सिध्दराम म्हेत्रे : त्यांचे संगनमत यामध्ये आहे काय ? याची चौकशी केली जाईल आणि तसे आढळून आले तर त्यांच्याविरुध्द निश्चितपणे कारवाई केली जाईल.

------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पुणे येथील धनकवाडी येथे शाळेत जाणा-या अल्पवयीन मुलीवर सामुहिक बलात्कार होणे.

**पृ.शी.**: पुणे येथील धनकवाडी येथे शाळेत जाणा-या अल्पवयीन मुलीवर सामुहिक बलात्कार होण्याबाबत डॉ.नीलम गो-हे यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिध्दराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री ): अध्यक्ष महोदय, डॉ.नीलम गो-हे यांनी "पुणे येथील धनकवाडी येथे शाळेत जाणा-या अल्पवयीन मुलीवर सामुहिक बलात्कार होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(निवेदना नंतर)

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, संतोष कांबळे नावाचा आरोपी आहे तो सराईत गुन्हेगार आहे. या प्रकरणातील काही आरोपी अजूनही फरार आहेत. ते पकडले गेले नाहीत. ती मुलगी अजूनही रुग्णालयामध्ये आहे. तरी या प्रकरणातील आरोपींवर कोणत्या कलमाखाली गुन्हे दाखल झाले आहेत ? जे आरोपी फरार आहेत त्यांना पकडण्याच्या दृष्टीकोनातून काय कारवाई चालू आहे ?

श्री.सिध्दराम म्हेत्रे : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये चार आरोपी असून त्या सर्वांना अटक करण्यात आली आहे आणि त्यांना दिनांक 26.3.2005 पर्यंत पोलीस कस्टडी मिळाली आहे. त्यांच्याविरुध्द भा.द.वि.कलम 363, 366, 376, 323 आणि 506 प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

डॉ.नीलम गो-हे : कोणता आरोपी फरार आहे ?

श्री.सिध्दराम म्हेत्रे : एकही आरोपी फरार नाही.

डॉ.नीलम गो-हे : ती मुलगी अजून रुग्णालयात आहे काय ?

श्री.सिध्दराम म्हेत्रे : ती रुग्णालयात नसून तिच्या घरी गेली आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याच्या मुद्याबाबत.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, उद्या होळी हा आनंदोत्सव आहे. हा सण साजरा करीत असताना धूळवड असते त्यावेळी महिला आणि मुलींवर पाण्याने भरलेले फुगे मारले जातात. डोळ्यावर पाण्याने भरलेला फुगा मारल्याने एका महिलेचा डोळा गेल्याची घटना मागे घडली आहे. महिलांवर पाण्याने भरलेले फुगे मारणे, त्यांची छेडछाड करणे असे प्रकार घडतात. त्यामुळे आमची अनेक वर्षाची अशी मागणी आहे की, ज्या ठिकाणी असे प्रकार दिसतील त्या ठिकाणी पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाई करावी. तसेच महिलांची किंवा मुलींची कोणी छेडछाड करताना दिसले तर पोलीसांनी त्यांना समज दिली पाहिजे. काही ठिकाणी चुकीच्या गोष्टीही घडतात. होळीच्या दिवशी फुगे मारण्याचे प्रकार मुंबई शहरामध्ये घडतात.

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे....

त्याबद्दल प्रतिबंधात्मक कारवाई करावी तसेच महाराष्ट्रातील इतर भागात सुध्दा निष्पाप मुलीना संरक्षण देण्याच्या बाबतीत पोलिसांनी काय दक्षता घेतलेली आहे या बाबतीत सभागृहाला माहिती मिळावी म्हणून मी औचित्याच्या मुद्दाव्दारे सभागृहाचे लक्ष वेधत आहे.तेव्हा मुंबई शहरातील आणि राज्याच्या इतर भागातील मुलींना संरक्षण आणि सुरक्षितता देण्यात यावी अशी मंत्रिमहोदयांना माझी विनंती आहे.

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्दाला माझा पाठिंबा आहे. त्याबाबतीत मला एक दुरुस्ती करावयाची आहे की, मुलेच मुलींची छेड काढतात असे नाही तर आता मुलीसुध्दा मुलांची छेड काढतात व दोघेही एकमेकांना फुगे फेकून मारतात. तेव्हा बंदी फक्त मुलांवर घालता कामा नये तर फुगे विक्रीला बंदी घालण्यात यावी. गृह खात्याला असे आदेश दिले गेले पाहिजेत की, आज आणि उद्या ज्या ज्या ठिकाणी फुग्यांची विक्री चालू असेल त्या ठिकाणच्या फुग्यांची विक्री थांबविण्यात यावी व ते फुगे जप्त .करण्यात यावेत.

डॉ नीलम गोऱ्हे :सभापती महोदय,एका महिलेच्या अंगावर फुगा फेकल्यामुळे तिला डोळा गमवावा लागला आहे.काही महिलासुध्दा पुरुषांची टिंगल करीत असतील. टिंगल करणारे पुरुष असतील तर त्यांची टिंगल केलीच पाहिजे असे माझे ठाम मत आहे. .अशी टिंगल केल्यामुळे किती पुरुषांना शारीरिक इजा पोहोचली हे आपण पहावे.लैगिंक अत्याचाराच्या पलिकडे हा विषय चालला असल्यामुळे त्याकडे आपण गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे.

श्री.सिध्दराम म्हेत्रे : सभापती महोदय, फुगे मारण्यावर बंदी घालण्यात येईल.

------

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. राज्यात दुचाकी वाहनधारकांना हेल्मेटची केलेली सक्ती

मु.शी : राज्यात दुचाकी वाहनधारकांना हेल्मेटची केलेल्या सक्तीसंबंधी सर्वश्री जितेन्द्र आव्हाड,सदाशिवराव पोळ,डॉ.वसंत पवार,प्रा. जोगेन्द्र कवाडे,सर्वश्री जगन्नाथराव शेवाळे,राजेन्द्र जैन,वसंतराव चव्हाण,सागर मेघे,नितीन गडकरी,जगदीश गुप्ता,पांडुरंग फुंडकर यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.जितेन्द्र आव्हाड (नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय परिवहन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

" राज्यात दुचाकीस्वारांना सद्य:स्थितीत करण्यात येत असलेली हेल्मेटची सक्ती,लक्षावधी दुचाकी वाहनधारकांना हेल्मेटची असलेली गरज, उत्पादनाच्या प्रमाणात मागणी जास्त असल्याने हेल्मेटचा भासत असलेला प्रचंड तुटवडा,स्वस्तात मिळणारे हेल्मेट अनेक पटीने दर लावून दुकानदार वाहन चालकांची करत असलेली आर्थिक पिळवणूक,हेल्मेट नस-ल्याने वाहन चालकांकडून वसूल केलेला रुपयांचा दंड,महामार्ग व शहरामधील रस्त्यांची पाहणी केल्यास शहरांमध्ये हेल्मेटची आवश्यकता नसल्याने शहरी भागातील वाहन चालकांसाठी असलेली हेल्मेटची सक्ती मागे घ्यावी यासाठी शहर परिसरातील स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच नागरीकांनी शासनाकडे वेळोवेळी केलेली मागणी,याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील लाखो वाहन चालकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व संताप तसेच चिडीची भावना याबाबत तीव्र आंदोलन करण्याचा दिनांक 2 मार्च 205 रोजी वा त्या सुमारास दिलेला इशारा,हेल्मेट विक्रेते, पोलीस आणि वाहन चालकांमध्ये याबाबत होत असलेले वाद - विवाद, वारंवार होत असलेल्या वाद- विवादामुळे कायदा व सुव्यवस्था बिघडण्याची निर्माण झालेली परिस्थिती व याबाबत तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया "

श्री.धर्मरावबाबा आत्राम (परिवहन राज्यमंत्री) :सभापती महोदय,लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

-निवेदना नतर -

श्री.जितेन्द्र आव्हाड : सभापती महोदय, या सार्वभौम सभागृहाच्या माध्यमातून मी अत्यंत महत्वाच्या विषयाकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.हेल्मेटची सक्ती सर्वत्र करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले असून आता पोलीससुध्दा अत्यंत कडक कारवाई करीत आहेत.हेल्मेट कशासाठी घालावयाचे व का घालावयाचे याचे शास्त्रोक्त कारण जर आपण पाहिलेतर आपल्याला असे दिसून येईल की,मुख्यत: जो हायवेचा परिसर आहे जे द्रुतगती मार्ग आहेत त्या ठिकाणी अपघाताला प्रतिबंध व्हावा म्हणून हेल्मेट घालण्याची सक्ती करणे आवश्यक आहे अशा भागात जर सक्ती केली तर ती चुकीची ठरेल असे मला वाटत नाही.मुंबई,ठाणे,पुणे,नाशिक,सोलापूर या शहरामध्ये राहणारे मध्यमवर्गीय लोक आहेत ते दूर अंतरावर राहतात.गिरगाव मधील एक खोली विकून काही लोकांनी आता ठाण्यात घोडबंदर रोडवर घर घेतलेले असते..खोली विकून आलेल्या पैशातून ते एक स्कूटर विकत घेतात आणि त्या स्कूटरवरुन नवरा बायको ठाणा स्टेशनवर येऊन तेथून ते मुंबईकडे रवाना होत असतात.ठाणा स्टेशनवर स्कूटर पार्किग करण्यासाठी जागा नसते त्यामुळे ती तेथेच अडगळीत पडलेली असते.हेल्मेट वापरणे सक्तीचे करण्यात आल्यामुळे हे हेल्मेट त्या स्कूटरमध्ये ठेवावे लागते.हेल्मेटचा भार त्या स्कूटरवर पडलेला असतो. हे हेल्मेट घेऊन रेल्वेतून प्रवास करणे शक्य नाही.

श्री.दिवाकर रावते :सभापती महोदय, खरे म्हणजे शासनाने या लक्षवेधी सूचनेला का उत्तर दिले हेच मला कळत नाही.हेल्मेटच्या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले होते.संपूर्ण महाराष्ट्रात हा प्रश्न उपस्थित झाला होता आणि तो प्रश्न बरोबर आहे. माननीय मुख्यमंत्र्यांचे म्हणणे सुध्दा बरोबर आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी असे सागितले होते की,.हेल्मेटची सक्ती करण्यात आल्यानंतर आपली बाजू राज्य शासनाने सगळया ठिकाणी मांडली होती.जनतेच्या सूचना मांडल्या परंतु यासबंधीचा निर्णय सुप्रीम कोर्टाने दिलेला आहे आणि केन्द्र सरकारने या बाबतीत निर्णय घेतलेला असल्यामुळे हेल्मेटच्या बाबतीत सक्ती करावी लागत आहे.आगतिकता असेल आणि दुसरा कोणता मार्गच नसेल तर ही सक्ती करण्यात आल्यानंतर त्यावर चर्चा करुन या सभागृहाचा वेळ या विषयामध्ये का घालविण्यात येत आहे? ही चर्चा करुन त्यातून काहीच निष्पन्न होणार नाही. या चर्चेला जर माननीय मंत्रीमहोदय उत्तर देऊ शकत असतील तर जरुर चर्चा करण्यात यावी.परंतु या बाबतीत सुप्रीम कोर्ट आणि केन्द्र सरकार यांनी निर्णय घेतलेला असून त्यासदर्भात

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

आपल्यापुढे दुसरा कोणताही  मार्ग नाही. आपल्या पेक्षा उच्च असलेल्यां सभागृहाने जर निर्णय घेतलेला असेल तर आपण ही चर्चा  सभागृहामध्ये कशासाठी करीत आहोत ?.यातून काय निष्पन्न होणार आहे केवळ सहानुभूती  मिळविण्याचा आपला विचार असेल तर ही बनवाबनवी आहे.

नंतर श्री.सुंबरे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरूपसिंग नाईक : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी जे सांगितले ते खरे आहे, त्यांचे म्हणणे बरोबर आहे. आता या ठिकाणी सन्माननीय सदस्यांकडून जो प्रश्न विचारला गेला आहे वा मुद्दे उपस्थित केले जात आहेत ते सगळे हायकोर्टामध्ये हे प्रकरण असताना तेथेही विचारले गेले होते आणि त्यावर हायकोर्टाने अंतिम निर्णय दिलेला आहे की, हा जो कायदा आहे तो केंद्र सरकारचा आहे आणि केंद्र सरकारच्या कायद्यामध्ये जोपर्यंत बदल केला जात नाही तोपर्यंत तो जसाच्या तसा राज्यातही लागू आहे आणि त्याची अमलबजावणी राज्यात करणे हे राज्य सरकारचे कर्तव्य आहे. ....

**उपसभापती** : आता हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे काय ? ..

श्री. सुरूपसिंग नाईक : नाही. हायकोर्टाने याबाबत अंतिम निर्णय दिलेला आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : अध्यक्ष महाराज, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी या लक्षवेधी सुचनेवरील चर्चेस हरकत घेताना या सभागृहामध्ये यावर विशेष चर्चा करण्याची गरज नाही असे जे म्हटले आहे वा असे जे मत व्यक्त केले आहे ते उचित आहे असे वाटत नाही. ...

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महाराज, मी याही वेळेस ऑब्जेक्शन घेतलेले आहे. या संदर्भात कोर्टाचे निर्देश अगदी स्पष्ट असल्याचे वर्तमानपत्रातून आमच्या वाचनात आलेले आहे. वर्तमानपत्रातून आम्ही जे वाचले त्यानुसार हा प्रश्न जेव्हा निर्माण झाला तेव्हा राज्य सरकारने कोर्टाकडे 8 दिवसांची मुदत मागितली असता, यासाठी 8 तासांचीसुद्धा मुदत देणे बरोबर होणार नाही असे कोर्टाने स्पष्टपणे सांगितलेले आहे. कोर्टाने इतके स्पष्ट सांगितल्यानंतरही आता यावर पुन्हा सभागृहामध्ये चर्चा होऊ शकते काय ? अध्यक्ष महाराज, हेल्मेटस् बाजारात उपलब्ध नाहीत ती होण्यापुरती तरी मुदत द्यावी म्हणून जेव्हा सरकारकडून कोर्टाकडे मागणी करण्यात आली तेव्हाही कोर्ट त्यासाठी मुदत देण्यास तयार नव्हते इतकेच नाही तर कोर्टाने हेल्मेटस् उत्पादकांना बोलावून त्याबाबत विचारणा केली होती. म्हणजे कोर्ट याबाबतीत इतके आग्रही असेल तर मग या सभागृहामध्ये या बाबत चर्चा करता येऊ शकते काय ? करता येत असेल तर चर्चा करण्यास आम्हालाही आनंदच आहे, पण त्याचा काही उपयोगच होणार नसेल तर मग चर्चा करायची तरी कशासाठी ?

.... आर 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे : अध्यक्ष महाराज, मला माझा हरकतीचा मुद्दा कृपा करून मांडू द्यावा. अध्यक्ष महाराज, उच्च न्यायालयाने यासंबंधात निर्णय दिल्यानंतर, सक्ती केल्यानंतरही या निवेदनात म्हटलेले आहे की, '...या दरम्यान शासनाने पुणे व धुळे जिल्ह्यासाठी लागू केलेली हेल्मेट सक्ती दिनांक 14.8.2003 च्या अधिसूचनेन्वये रद्द केली. तसेच राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गांच्या महानगरपालिका व नगर परिषद यांच्या हद्दीतून जाणाऱ्या भागात ही तरतूद लागू असणार नाही असे आदेश दिनांक 20.8.2003 च्या अधिसुचनेन्वये जारी केला.' अध्यक्ष महाराज, हायकोर्टाचा निर्णय लागल्यानंतर त्यासंबंधात अधिसूचना काढण्याचा राज्य सरकारला अधिकार आहे काय ? उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर अशा प्रकारे अधिसूचनेद्वारे ही तरतूद रद्द करण्याचे आदेश राज्य सरकारने दिलेले आहेत, ते उचित आहेत काय ?

श्री. धर्मरावबाब आत्राम : अध्यक्ष महाराज, उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर आपले जे सरकारी वकील आहेत त्यांनी 13.1.2005 रोजी एक पत्र आपल्याला दिले आहे की, ही सक्ती रद्द करण्यासाठी जो जी.आर.काढलेला आहे तो ताबडतोब रद्द झाला पाहिजे. त्यानुसार 20.3. रोजी याबाबत धुळे आणि पुणे यासाठी जी हेल्मेट सक्ती रद्द केल्याचे आदेश काढले होते ते ताबडतोब रद्द केलेले आहेत.

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महाराज, मी या ठिकाणी माझे मत केवळ सांगितलेले नाही तर कोर्टाने ठामपणे दिलेल्या निर्णयावर प्रत्येक वेळेस येथे चर्चा होणार असेल तर तशी चर्चा करण्यास आम्हाला आनंदच होईल. पण यातून काही निष्पन्न होणार आहे का ? नसेल तर कशासाठी ही चर्चा करायचा हा माझा मुद्दा होता.

प्रा. जोगेंद्र कवाडे : अध्यक्ष महाराज, हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर त्यानुसार लागू होणारी सक्ती अधिसूचनेद्वारे रद्द केली असल्याचे जे या निवेदनात सांगितले आहे, तसे करणे योग्य आहे काय ? दुसरे असे की, सन्माननीय सदस्य श्री.आव्हाड यांनी या सक्तीमुळे निर्माण होत असलेल्या वा झालेल्या अडचणी सांगताना सांगितले आहे की, ...

श्री. दिवाकर रावते : त्यांनी जे प्रश्न वा अडचणी सांगितल्या आहेत त्या योग्यच आहेत...

प्रा. जोगेंद्र कवाडे : उपनगरामध्ये रेल्वे स्टेशनपासून दूर अंतरावर राहणारे स्टेशनपर्यंत येण्यासाठी दुचाकी वापरतात आणि अशा वेळी या हेल्मेट सक्तीमुळे त्यांना हेल्मेट घालावे लागते

..... आर 3 ..



KBS/ KGS/ MAP/ श्री. गायकवाड नंतर --- 13:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. कवाडे ....

आणि ती दुचाकी स्टेशनवरील स्टॅण्डवर लावल्यानंतर रेल्वे प्रवासात ते हेल्मेट स्वत:जवळ बाळगावयाचे, हेल्मेट घेऊन ट्रेनमध्ये गर्दीच्या वेळी शिरणे हे किती अडचणीचे आहे हे सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले ते अगदी प्रॅक्टिकल आहे. तर अशा व्यावहारिक अडचणी आपल्या वकीलांनी कोर्टापुढे मांडण्याचे काम केलेले आहे काय ? ....

( यानंतर श्री.जागडे ....एस 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे...

हे उचीत आहे काय ? या बाबत आपण व्यावहारिक दृष्टीने विचार करणार आहात की नाही ?

श्री. सुरुपसिंग नाईक : या सर्व बाबींचा हायकोर्टात उहापोह झाला आहे. सविस्तर चर्चाही झ ाली आहे. सभापती महोदय, 1988 सालचा केंद्र सरकारचा हा कायदा आहे. या कायद्याच्या कलम 129 प्रमाणे हेल्मेट वापरण्याचे बंधन टाकण्यात आले आहे. राज्य सरकारने याची अंमलबजावणी करावयाची आहे. याबाबतचा कायदा हा केंद्र सरकारचा आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, केंद्र शासनाचा कायदा हा सुप्रिम कोर्टात चॅलेंज होत नाही काय ? आता या बाबत या सार्वभौम सभागृहाचा आणि न्यायालयाचा संघर्ष नाही.

श्री. सुरुपसिंग नाईक : सभापती महोदय, हा कायदा संपूण देशाला लागू आहे. याबाबत हायकोर्टाने निकालही दिला आहे. म्हणूनच या बाबतची अंमलबजावणी आपण करीत आहोत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी या ठिकाणी कोणतीही टिका करण्यासाठी बोलत नाही. 2000 सालापर्यन्तच्या झोपड्यांचा प्रश्न आला होता, त्यावेळी आपण धावत दिल्लीला गेला होता. तसेच शहाबानू प्रकरणात सुध्दा आपण कार्यवाही केली होती. आता हेल्मेटचा कायदा हा केंद्र सरकारने केला असल्यामुळे आपण दिल्लीला का जात नाही. केंद्र सरकारला हा कायदा सुधारण्यासाठी का सांगत नाही ?

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. निवेदनात म्हंटल्याप्रमाणे हायकोर्टात याबाबतची चर्चा झाली आहे. आता आपले सभागृह हे सार्वभौम आहे. त्या प्रमाणे आपण केंद्र सरकारला शिफारस करु शकतो.

श्री. दिवाकर रावते : सभागृहाने याबाबतचा ठराव करावा. या बाबतची सर्व प्रोसीजर फॉलो करावी. आणि हा ठराव केंद्र सरकारकडे पाठवावा.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, उच्च न्यायालयाने या बाबत दि. 16.6.2003 रोजी निर्णय दिलाआहे. परंतु शासनाने दि. 10.1.2005 रोजी परिपत्रक काढले आहे. त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्राला तीन दिवस सुट्टी होती. या तीन दिवसाच्या कालावधीत आपल्या पोलिसांनी सकाळी सात वाजल्यापासून या बाबतची कारवाई सुरु केली. ज्या दुचाकीस्वारांनी हेल्मेट घातलेले नव्हते, त्यांना दंड केला आहे. त्यानंतर या बाबत आरडाओरड झाल्यानंतर शासनाने पाच दिवसानंतर यास स्थगिती दिली. तेव्हा या बाबत सरकारने हायकार्टात जाऊन याबाबतची बाजू मांडावयाला पाहिजे होती.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरुपसिंग नाईक : शासन हायकोर्टात गेले नाही. अपिल दाखल केल्यामुळे सरकारला आपली बाजू कोर्टात मांडावी लागली.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, दोन वर्षाने या बाबतचे परिपत्रक काढले आहे.

( गोंधळ )

श्री. प्रमोद नवलकर : मा. सदस्य श्री. विलास अवचट यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे, तो योग्य आहे. पाच दिवसांनी पोलिसांच्या कारवाईला शासनाने स्थगिती दिली. आता या पाच दिवसाच्या कालावधीत दुचाकीस्वारांकडून लाखो रुपये वसूल केले आहेत. आता ही जमा केलेली रक्कम परत करण्यात येणार आहे काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : नाही.

श्री. प्रमोद नवलकर : का नाही ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, दंड म्हणून ही रक्कम वसूल करण्यात आली आहे.

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, ही रक्कम अनधिकृतपणे जमा करण्यात आली आहे. पोलिसांनी जे लाखो रुपये जमा केले आहेत, ते परत देण्यात आले पाहिजेत. आता आपण एक एप्रिलपर्यन्त सूट दिली आहे.

( यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रमोद नवलकर...

आपण 1 एप्रिलपर्यंत दुचाकीस्वारांना सवलत दिल्यानंतर 1 एप्रिलपूर्वी त्यांच्याकडून बेकायदेशीररित्या जी दंड वसूली केली आहे ती त्यांना परत करणार काय?

श्री. धर्मराव आत्राम : त्यावेळी केलेली वसूली कायदेशीर आहे. त्यानंतर जी.आर. काढण्यात आला, तो चुकीचा असल्यामुळे त्यामध्ये दुरुस्ती केली आहे.

श्री. प्रमोद नवलकर : शासनाने ती खंडणी वसूल केली आहे. जर आपण त्यांना 1 एप्रिलपर्यंत सवलत दिली आहे तर....

**उपसभापती** : न्यायालयाने याबाबत निर्णय दिला असला तरी या विषयाच्या संदर्भात मागील अधिवेशनामध्ये चर्चा सुरु असतांना मी या आसनावरुन शासनास निदेश दिले होते की, हेल्मेट वापरणे सक्तीचे करण्यात आले आहे. परंतु अपुऱ्या पुरवठयामुळे बाजारामध्ये पुरेसे हेल्मेट उपलब्ध होत नाहीत. किंवा जे उपलब्ध असतात ते जास्त किंमतीने विकत घ्यावे लागतात. या प्रकारांना आळा बसावा याकरिता दुचाकी वाहन खरेदी करतेवेळी त्या वाहन उत्पादकांकडून खरेदी केल्या जाणाऱ्या वाहनाबरोबर गिऱ्हाईकास हेल्मेट पुरविणे वाहन उत्पादकांना सक्तीचे करण्याबाबत शासनाने आदेश दिले पाहिजेत.

श्री. धर्मराव आत्राम : महाराष्ट्रामध्ये वेगवेगळया ठिकाणी हेल्मेटचे वेगवेगळे दर आहेत...

**उपसभापती** : जे लोक दुचाकी वाहन वापरीत आहेत त्यांची जीवितहानी होऊ नये याकरिता चांगल्या उद्देशाने केंद्र शासनाने हा कायदा केला, व कोर्टाने तो बंधनकारक केला असेल तर संबंधित वाहन उत्पादक कंपन्यांवर सुध्दा आपण हेल्मेट पुरविणे बंधनकारक कां करीत नाही?

श्री. धर्मराव आत्राम : सभापती महोदय, सर्वसामान्यपणे लोक आपल्या मर्जीप्रमाणे, आपल्या पसंतीप्रमाणे हेल्मेट खरेदी करीत असतात. शासनाने हेल्मेट वापरणे सक्तीचे करण्याबाबत 1.2.2005 रोजी आदेश दिले आहेत.

**उपसभापती** : स्कूटरचे उत्पादन करणाऱ्या कंपन्या स्कूटर विकत असतांना त्या बरोबर हेल्मेट विकणे आपण त्यांना बंधनकारक करणार आहात काय?

श्री. सुरुपसिंग नाईक : सभापती महोदय, हेल्मेट बनविणाऱ्या कंपन्या वेगळया आहेत. तसेच, लोक आपापल्या मर्जीप्रमाणे हेल्मेट खरेदी करतात. यामध्ये कुणी 400 रुपयांचा घेतो तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरुपसिंग नाईक...

कुणी 1200 रुपयांचा घेतो. त्यामुळे स्कूटर उत्पादन करणाऱ्या कंपन्यांना तुमच्या कंपनीमध्ये हेल्मेटचे उत्पादन करा असे सांगता येणार नाही. हेल्मेट उत्पादन करणाऱ्या कंपन्यांनी कोर्टामध्ये हेल्मेट उपलब्ध करुन देऊ असे सांगितले आहे.

**उपसभापती** : मी आता यामध्ये जास्त वाद घालू इच्छित नाही. स्कूटरचे उत्पादन करणाऱ्या कंपन्या टायरचे उत्पादन करीत नाहीत, स्कूटरसाठी लागणारे इतर पार्ट सुध्दा त्या कंपन्या बनवीत नाहीत. ते पार्ट त्यांना बाहेरुन विकत घ्यावे लागतात. एखादा माणूस आपल्या स्कूटरला डनलॉपचा टायर बसवितो तर दुसरा मोदीस्टोनचा टायर बसवितो. प्रत्येकाची पसंती वेगवेगळी असते. तरीसुध्दा स्कूटर उत्पादक कंपनीकडून गि-हाईकांना त्या गोष्टी पुरविल्या जातात. आणि म्हणून गिऱ्हाईकास सुध्दा हेल्मेट सहज उपलब्ध झाले तर ते जास्त योग्य होईल. म्हणून आपण स्कूटर उत्पादक कंपन्यांना हेल्मेट पुरविणे सक्तीचे करणार काय?

श्री. धर्मराव आत्राम : सभापती महोदय, स्कूटर वितरकांना वेगवेगळया प्रकारचे हेल्मेट ठेवण्याबाबत व गिऱ्हाईकांना ते पुरविण्याबाबत सूचना करण्यात येतील.

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, दुचाकी स्वाराने हेल्मेट डोक्यात घातल्यानंतर त्याला आजूबाजूचे काही दिसत नाही. त्यामुळे अपघात होण्याची भिती त्याला वाटते. म्हणून हेल्मेटवर लाल दिवा लावायला परवानगी मिळेल काय?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा अत्राम : सभापती महोदय, नाही.

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय कोणत्या कायद्याप्रमाणे नाही असे सांगत आहेत. ते कोणत्या नियमाप्रमाणे प्रतिबंध करीत आहेत. असा काही नियम नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला आपण दिलेल्या निदेशाच्या संबंधात बोलावयाचे आहे. हेल्मेट असावे की नसावे हा आता मुद्दा नाही. हेल्मेट असणे हे अविभाज्य आहे असे स्विकारुन आपण शासनाला निर्देश दिले. पण मला एकच खेदाने नमूद करावयाचे आहे. आम्ही काल-परवा वर्तमानपत्रामध्ये वाचले आहे की, विधानसभेच्या माननीय अध्यक्षांचे कोणी ऐकत नाही. सभापती महोदय, आपण शासनाला वारंवार निदेश देत आहात. मी मघापासून घडयाळ लावून बसलो आहे. येथे जवळजवळ 12 मिनिटे चर्चा सुरु आहे आणि आपण शासनाला निदेश देत आहात की, कराल का ? कराल का ? पण ते नाहीच असे म्हणत आहेत. तेव्हा हल्ली पिठासीन अधिका-यांचे न ऐकण्याची प्रवृत्ती बोकाळलेली आहे का ?

श्री.धर्मरावबाबा अत्राम : सभापती महोदय, याबाबतीत सूचना करावी अशा प्रकारचा आपण आदेश दिलात . . . .

**उप सभापती** : सूचना नाही. तुम्ही त्यांना . . .

श्री.धर्मरावबाबा अत्राम : सभापती महोदय, याबाबतीत आदेश देऊ.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझे याबाबतीत एवढेच म्हणणे आहे की, शहरातील नागरीकांच्या समस्या लक्षात घेऊन शासन सुप्रीम कोर्टामध्ये याचिका अपिलच्या स्वरुपात दाखल करणार आहात का ? कारण केंद्र शासनाचा 1988 चा कायदा आहे. 1988 ते 2004 पर्यंत कोणतीही कारवाई झालेली नाही. आपण केंद्र शासनाकडे विनंती करावी आणि केंद्र शासनाकडून हा कायदा दुरुस्त करुन आणावा . कारण सर्वात जास्त समस्या महाराष्ट्रात आहे. या राज्यात दुचाकी वाहनांची संख्या जास्त आहे आणि दुचाकी वाहनांवरुन नोकरीसाठी जाणा-या प्रवाशांची संख्या जास्त आहे. हे प्रुव्ह झालेले आहे. तेव्हा आपण केंद्र शासनाकडे जावे

(सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते खाली बसून बोलतात.)

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब ज्या पध्दतीने नवीन सदस्यांना त्रास देतात, ते अयोग्य आहे. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, शासन सुप्रीम कोर्टामध्ये ही याचिका दाखल करणार आहे का ? तसेच केंद्र शासनाकडे आपण असा प्रस्ताव पाठविणार आहात का ?

. . . .यु-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा अत्राम : सभापती महोदय, सुप्रीम कोर्टामध्ये याचिका दाखल करणार नाही. कारण 1 एप्रिल पासून आपल्याला हेल्मेट कम्पलसरी करावयाचे आहे आणि जिल्हावाईज ठरविलेले आहे. त्यामुळे आपल्याला याबाबतीत सुप्रीम कोर्टामध्ये जाता येणार नाही. कारण कोर्टाने स्पष्टपणे सांगितलेले आहे की, एका वर्षामध्ये अपघातामुळे किती मृत्यू झाले आहेत ? याबाबतची माहिती कोर्टाने स्पष्टपणे आपल्या नोटमध्ये दिलेले आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी विचारलेला प्रश्न महत्वाचा आहे. शहरामध्ये लहान मुलांना अर्ध्या कि.मी.अंतरावर मोटर सायकल वरुन घेऊन जावे लागते. मग अशा वेळी लहान मुलांनी सुध्दा हेल्मेट घातले पाहिजे का ? याबाबतीत कोर्टाच्या निर्णयामध्ये म्हटलेले आहे की, होय, दोघांनीही हेल्मेट घालणे आवश्यक आहे. तेव्हा एखादा निर्णय जनहिताच्या दृष्टीने बरोबर वाटत नसेल तर तुम्ही सुप्रीम कोर्टाच्या डिव्हीजन बेंचपुढे अपिल करु शकता. हायवेवर ठीक आहे. पण शहरामध्ये जर बाजारात जावयाचे असेल, अर्ध्या कि.मी.वर जावयाचे असेल तर कसे जाणार ? सुप्रीम कोर्टाने आदेश दिला की, तो कायदा झाला. पण आपण त्यांच्यासमोर अडचणी देखील मांडल्या पाहिजेत.

श्री.धर्मरावबाबा अत्राम : सभापती महोदय, केंद्र शासनाने कायदा केलेला आहे आणि केंद्र शासनाकडे आपण विनंती करु की, या कायद्यामध्ये काय करता येईल. पण कायद्याच्या विरोधामध्ये आपल्याला जाता येणार नाही.

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, दुचाकीवर पाठीमागे बसणा-या व्यक्तीला देखील हेल्मेट घालणे सक्तीचे आहे. तर मग बस स्टॉप असणा-या मुलींना लिफ्ट कशी द्यावयाची? म्हणजे बस स्टॉपवर एखादी मुलगी असेल आणि तिच्याकडे हेल्मेट नसेल तर मग काय करावयाचे? तिला तर एक्झम करा.

श्री.सुरुपसिंग नाईक : सभापती महोदय, हेल्मेटचा संबंध येत नाही.

-----

. . . .यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## मंत्रीमहोदयांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, आज माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्री श्री.हसन मुश्रीफ यांचा वाढदिवस आहे. तळेकर सारख्या भ्रष्ट अधिका-याला पकडण्याच्या बाबतीत त्यांनी कारवाई केलेली आहे. तेव्हा मी माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्री श्री.हसन मुश्रीफ यांचे अभिष्टचिंतन करतो.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, माझा आज 24 मार्च रोजी वाढदिवस असला तरी माझा जन्म रामनवमीला झाला होता, त्यामुळे मी त्याच दिवशी वाढदिवस साजरा करतो.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय मंत्री श्री.हसन मुश्रीफ यांचा आज वाढदिवस असल्याबद्दल आपण त्यांना शुभेच्छा दिल्या. सन्माननीय श्री. मुश्रीफ यांच्या मतदार संघाचे वैशिष्ट्य आहे. त्यांच्या मतदार संघामध्ये एक टक्का देखील अल्पसंख्यांक समाज नाही, असे असतांनाही सन्माननीय श्री.हसन मुश्रीफ हे गेली दहा-पंधरा वर्षे सातत्याने निवडून येतात. राम आणि रहीम या दोघांनाही चाहणारे ते आहेत. त्यांना सभागृहाच्या वतीने शुभेच्छा देतो.

श्री.हसन मुश्रीफ : आभारी आहे.

--

2......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नागपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे विभाजन.

**मु. शी** : नागपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे विभाजन यासंबंधी स-मा-ा-ीय सदस्य सर्वश्री सागर मेघे, जगदीश गुप्ता यां-ी दिलेली लजवेधी सूच-ाा.

श्री. पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय, मी आपल्या अ-ुमती-ो -ियम 101 अ-वये पुढील तातडीच्या व सार्वजनिज महत्वाच्या बाबीजडे स-मा-ा-ीय पणन मंत्र्यांचे लज वेधू इच्छितो आजि त्याबाबत त्यां-ी -िवेद-ा जरावे, अशी वि-ांती जरतो.

"नागपूर जिल्ह्यातील नागपूर कृषी उत्पन्न बाजार समिती ही नागपूर शहर, नागपूर ग्रामीण, हिंगणा व कामठी या चार तालुक्यांच्या भौगोलिक क्षेत्रासाठी कार्यरत असताना या ठिकाणी नागपूर बाहेरील इतर जिल्ह्यांतून तसेच देशाच्या इतर भागातूनही मसाल्याचे पदार्थ, ड्रायफ्रुट तसेच इतर मालाची फार मोठ्या प्रमाणावर खरेदी विक्री होत असल्याने ज्या भागातील लोकांसाठी ही बाजार समिती आहे त्यांना याचा लाभ मिळत नसणे, तसेच या समितीचे कार्यक्षेत्र हे तालुकानिहाय नसल्यामुळे काही गावांतील लोकांना 40 ते 50 किलोमीटर इतक्या दूरवरून बैलगाड्यांनी शेतीमाल या ठिकाणी आणावा लागणे, याचा फायदा घेऊन त्यांची व्यापाऱ्यांकडून होत असलेली फसवणूक, त्यामुळे या कृषी उत्पन्न बाजार समितीचे विभाजन करावे अशी प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असलेली मागणी शासनाने अद्याप मान्य न केल्यामुळे स्थानिक नागरिकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, त्यांनी रास्ता रोको, चक्का जाम यासारख्या लोकशाही मार्गांचा केलेला अवलंब व याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (सहकार, पणन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लजवेधी सूच-ोसंबंधीच्या -िवेद-ााच्या प्रती मा-ा-ीय सदस्यां-ाा आधीच वितरीत जेल्या असल्यामुळे मी ते -िवेद-ा आपल्या अ-ुमती-ो सभाजृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : -िवेद-ा सभाजृहाच्या पटलावर ठेवज्यात आले आहे.

-िवेद-ा

( प्रेस : येथे सोबतचे -िवेद-ा छापावे. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुडकर : सभापती महोदय, नागपूर कृषी उत्पन्न बाजार समिती ही 1974 साली स्थापन झालेली आहे. सर्व राज्यामध्ये तालुकानिहाय कृषी उत्पन्न बाजार समित्या असतांना फक्त नागपूरमध्ये तीन तालुक्याची एक समिती करण्यात आलेली आहे. या तीन तालुक्यामध्ये जवळपास 445 गावे आहेत. हिंगणा, कामठी आणि नागपूर या स्वतंत्र बाजार समित्या व्हाव्यात अशाप्रकारची तेथील नागरिकांची अनेक दिवसापासूनची मागणी आहे. परंतु उत्तर देताना सांगितले की, हिंगणा तालुक्यासाठी कापूस संकलन केंद्र उघडण्यात आले. सभापती महोदय,हिंगणा तालुका हा वेगळा आहे. त्या ठिकाणी कापूस संकलन केंद्र उघडण्याची आवश्यकता वाटली तर मग कृषी उत्पन्न बाजार समिती वेगळी का नको ? कामठी आणि हिंगणा या तालुक्यामध्ये मिळून 400 गावे आहेत. त्यामुळे एका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून कंट्रोल करणे अशक्य होते. त्यामुळे तेथील शेतकऱ्यांची व्यापाऱ्याकडून लूट होते. दुसरे असे उत्तर देण्यात आले की, आर्थिकदृष्ट्या या समित्या सक्षम होणार नाहीत. मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, महाराष्ट्रामध्ये अनेक तालुक्यामध्ये कृषी उत्पन्न बाजार समित्या अशा आहेत की, ज्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकल्या नाहीत. परंतु त्या ठिकाणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे अस्तित्व कायम आहे. म्हणून 400 गावच्या शेतकऱ्यांची मागणी आहे की, या कृषी उत्पन्न बाजार समित्या स्वतंत्र झाल्या पाहिजेत. त्याकरिता रस्ता रोको आंदोलन झाले, वेगवेगळ्या प्रकारची आंदोलने झाली, अनेक शेतकऱ्यांना अटक करण्यात आली. तरीसुध्दा शासनाच्या एका अधिकाऱ्याच्या अहवालावरून कृषी उत्पन्न बाजार समित्या सक्षम होणार नाहीत, अशाप्रकारचा निष्कर्ष काढणे, हे योग्य नाही. म्हणून याबाबतीत महाराष्ट्रासाठी जो नियम लागू आहे, तो नियम नागपूरसाठी का लागू केला जात नाही,असा माझा सवाल आहे. मी अशी मागणी करणार आहे की, आपण जरुर निर्णय घेतला, आपल्या स्तरावर बैठक झाली, आपण डीडीआरचा रिपोर्ट मागविला, पण जनतेचे मत लक्षात घेतले नाही. आपण सांगितले की, याबाबतीत कोणाची तक्रारच नाही. परंतु आंदोलने, रस्ता रोको झाली. जनतेच्या भावना लक्षात घेता, हिंगणा आणि कामठी या दोन स्वतंत्र बाजार समित्या करण्यासंबंधी शासन विचार करणार आहे काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सन्माननीय सदस्य श्री. फुंडकर साहेबांनी सांगितल्याप्रमाणे याबाबतची 26 फेब्रुवारीला बैठक बोलाविली होती. मागणी करणा-या सर्व प्रतिनिधींनाही बोलाविलेले होते. सन्माननीय सदस्य श्री.बंग आणि अजून एक प्रतिनिधी त्या बैठकीला उपस्थित होते. त्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (पुढे चालू....

ठिकाणी सर्व विषयावर तपशीलवार चर्चा झाली. कामठी या ठिकाणचे शेतीमालाचे उत्पादनच कमी असल्यामुळे त्याचा विचार थोडा वेगळा करावा लागेल..

श्री.पांडुरंग फुंडकर : कामठी शहराबाबत मी सांगितले नाही, तर कामठी परिसरामध्ये जी गावे अहेत त्याबाबत सांगितले. कामठी आणि नागपूरचे अंतर 6 कि.मी.चे आहे. परंतु त्या तालुक्यापासून 60-70 कि.मी. अंतरावर गावे आहेत. त्या 70 कि.मी.अंतरावरुन त्या शेतकऱ्याला नागपूर बाजारसमितीमध्ये आपला माल आणावा लागतो. मी कामठी गावापुरते बोललेलो नाही.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : अंतराबाबत वाद होऊ शकत नाही. जरी 60-70 कि.मी.च्या अंतरावर गावे आहेत असे सन्माननीय सदस्य म्हणत असले तरी सर्व संबंधितांची मी बैठक घेतली, त्यामध्ये या बाजारसमित्या व्हायबल होऊ शकत नाहीत, असे मत झाले. तरीही सन्माननीय सदस्यांचा आग्रह असेल तर पुन्हा एकदा सर्व संबंधितांशी बैठक बोलावून जर त्या समित्या व्हायबल होत असतील तर त्यांचा विचार करायला काही अडचण नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : माझी सरळ मागणी आहे की, या 400 गावचे सरपंच आहेत आणि ज्या सेवा सहकारी सोसायटींचे अध्यक्ष आहेत, त्यांना एकत्र बोलावून किंवा किमान दोन-तीन टप्प्यात त्यांच्या बैठका घेऊन, त्यांचे मत मागवून याबाबत सरकार निर्णय करणार आहे काय ?

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, निश्चतच त्या सगळयांना विचारात घेऊन बैठक घेऊन त्याबाबतीत निर्णय घ्यायला सरकारला काही अडचण नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अनेक दिवसापासून त्यांची ही मागणी आहे. 1974 साली कृषि उत्पन्न बाजार समिती निर्माण झाली आणि 1974 ते आता पर्यंत जवळपास 30 वर्षे झाले. ते नागरिक मागणी करीत आहेत. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, या संबंधीची सरपंच आणि ग्रामसेवा सहकारी सोसायटयांचे अध्यक्ष यांची बैठक किती दिवसात घेणार?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, सर्व बैठका घेऊन 6 महिन्यात यासंबंधीचा अंतिम निर्णय घेण्यात येईल.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, नागपूर कृषि उत्पन्न बाजार समितीच्या संबंधात मी सन 2003 साली नागपूरच्या अधिवेशनामध्ये लक्षवेधी सूचना आणलेली होती. त्यावेळचे पणन मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील योनी त्याला उत्तर दिलेले आहे. आणि त्या उत्तरामध्ये त्यांनी कबूल केलेले होते की, या नागपूर कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये भ्रष्टाचार झालेला आहे आणि कारणेदाखवा नोटीस सुध्दा या कृषि उत्पन्न बाजार समितीला दिलेली होती. अजून त्यावर कारवाई कां झाली नाही? सभापती महोदय, मागच्या अधिवेशनात आणि डिसेबंरच्या अधिवेशनात मी विशेष उलेखाद्वारे पुन्हा या सदनामध्ये तो प्रश्न मांडला होता. तेव्हा मला लेखी उत्तर पाठविले होते की, आम्ही लवकरात लवकर कारवाई करु. सभापती महोदय, मला आता असा प्रश्न विचारावयाचा आहे की, नागपूर कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये कायद्याच्या कलम 45 अंतर्गत ही समिती बरखास्त कां करीत नाही. या बाजार समितीला बरखास्त करण्यासाठी इतके दिवस कां लागले. संचालक पणन यांनी लेखी कबुली दिलेली आहे की, यामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. गैर व्यवहार झालेला आहे. माझ्याकडे त्यासंबंधीचे लेखी पत्र आहेत. ते सगळे पत्र मी मंत्रिमहोदयांकडे दिलेले होते. तरी पण नागपूर कृषि उत्पन्न बाजार समिती बरखास्त करण्याची कारवाई कां होत नाही? सक्षमीकरण सोडा पण विभाजनाची मागणी असतांना सुध्दा ती मान्य केली जात नाही तर यामध्ये कोणाचे राजकीय हित सांभाळणे तर चालले नाही ना?

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, इतक्या दिवसापासून त्या ग्रामपंचायतीची मागणी आहे ती मान्य होत नाही. यामध्ये काही राजकीय दबाव आहे काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, याठिकाणी दोन प्रश्न उपस्थित झालेले आहेत. यामध्ये पहिला प्रश्न नागपूर कृषि उत्पन्न बाजार समितीच्या विभाजनाच्या संदर्भातील आहे. सन्माननीय राज्य मंत्रिमहोदयांनी त्यांचे उत्तर सांगितलेले आहे आणि त्या संदर्भात त्यांनी सांगितल्याप्रमाणे त्याची कारवाई होईल.दुसरा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला. त्या संदर्भात कृषि उत्पन्न बाजार समितीच्या कलम 45 (1) च्या नोटिशीच्या संदर्भातील कारवाई काय झाली, आणि आतापर्यंत दिरंगाई का झाली. यानिमित्ताने मी सदनाला सांगू इच्छितो की, कोणालाही पाठिशी घालण्याचा पणन विभागाचा इरादा नाही. योग्य असेल त्याप्रमाणे कारवाई केली जाईल.त्यावेळेस आम्ही त्यांना नोटीस इश्यू केली. त्यावेळेस संचालक मंडळाचा खूलाशाचा अहवाल पणन मंडळाकडे सादर झाला. त्यानंतर पणन मंडळाचे संचालक मंडळ आहे, त्याचा मी अध्यक्ष आहे. त्यामध्ये सचिव आहेत. आयुक्त आहेत. सहकार आयुक्त आहेत. त्या बैठकीमध्ये त्यांनी दिलेल्या खुलाशावर चर्चा झाली परंतु अंतिम इफेक्टिव्ह कन्सल्टेशन करण्याच्या संदर्भामध्ये जो मुद्दा असतो त्याच्यावर आधारित आपण मार्केट कमिटी डिझॉल करतो. मार्केट कमिटी डिझॉल करणे हा एक भाग आहे आणि ती डिझॉल करीत असतांना त्याची जाबाबदारी निश्चित कर णे, आर्थिक गैरयवहाराची रुपरेषा निश्चित करणे हा एक भाग आहे. म्हणून दिनांक 15.1.2005 ला त्या संदर्भात कृषि उत्पन्न बाजार समिती नागपूरचे एक पत्र पणन मंडळाला आले आणि त्या पत्रात त्यांनी असे नमूद केले होते की, आम्ही डी.डी.आर.ला जे खुलासे दिले होते त्याच्यामध्ये आम्हाला अधिक माहिती द्यावयाची आहे. कारण त्याच्यामध्ये दोन-तीन मुद्यांची माहिती राहून गेलेली आहे. ते पत्र आमच्याकडे आल्या नंतर या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये इफेक्टिव्ह कन्सल्टेशन करण्याकरिता ठराव आला होता. त्या बैठकीमध्ये हे पत्र आल्यामुळे सचिव, कमिशनर मी स्वत: आणि राज्य मंत्रिमहोदय आम्ही त्या बोर्डामध्ये आहोत. आम्ही त्यांना शेवटची मुदत दिली की, तुमचे पत्र आले आहे. तुम्हाला अजून त्याच्यामध्ये काही खुलासा करावयाचा असेल तर ते पत्र दिनांक 22.2.2005 अन्वये जिल्हा उप निबंधक नागपूर यांना आम्ही कळवले की, या संबंधीची अधिकची माहिती संबंधित कृषि उत्पन्न बाजार समितीला द्यावयाची आहे.

यानंतर श्री. बरवड..

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/ MAP/ SBT प्रथम कु. थोरात 13:55 वा.

श्री. हर्षवर्धन पाटील ....

ती माहिती आपण ताबडतोब एकत्रित करा आणि सेक्शन 45(1) प्रमाणे जी फायनल चौकशी केलेली आहे त्याचा अहवाल पणन महामंडळाला त्वरित सादर करा. त्याप्रमाणे 3.3.2005 आणि 14.3.2005 या दोन तारखांना कृषि उत्पन्न बाजार समिती नागपूर यांना डी.डी.आर. नागपूर यांनी नोटीस दिलेली आहे. 15 दिवसात खुलासा करावा असे सांगण्यात आले आहे. शेवटची नोटीस 14.3.2005 ला दिलेली आहे. त्यांचा खुलासा आल्यानंतर सेक्शन 45(1) च्या बाबतीत पुढची कारवाई करण्यात येईल.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, गेल्या दोन वर्षापासून ही लक्षवेधी सूचना गाजत आहे. यामध्ये सकृतदर्शनी भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येऊनही बोर्डावर कारवाई केव्हा होणार ? त्या कृषि उत्पन्न बाजार समितीचे विभाजन करावे अशी तेथील ग्रामस्तरीय सर्व नागरिकांची मागणी असताना त्यामध्ये टाळाटाळ करण्याचे कारण काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या दोन्ही प्रश्नांची उत्तरे मी दिलेली आहेत.

-----

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. अनंत तरे )**

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षणासाठी इतर मागासवर्गीयांकरिता फी माफी व शिष्यवृत्ती बाबत दिलेली स्थगिती.

**मु. शी.** : राज्यातील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षणासाठी इतर मागासवर्गीयांकरिता फी माफी व शिष्यवृत्ती बाबत दिलेली स्थगिती यासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री सुधाकर गणगणे, नतिकोद्दीन खतिब, प्रा. जोगेंद्र कवाडे, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, वसंतराव खोटरे, प्रा. बी.टी. देशमुख यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा. जोगेंद्र कवाडे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षणासाठी इतर मागासवर्गीयांकरिता फी माफी व शिष्यवृत्ती बाबत राज्य शासनाने अचानक स्थगितीचे आदेश देणे, यामुळे शैक्षणिक वर्षाअखेर सदरहू फी ची रक्कम भरणा केल्याशिवाय इतर मागासवर्गीयांच्या गरीब विद्यार्थ्यांना परीक्षेला बसता न येणे, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय या तिन्ही वर्गातील अनुदानित व विना अनुदानित संस्थामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना फी माफी आणि शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेतलेला असणे, त्या निर्णयाला राज्य शासनाने घेतलेल्या स्थगितीमुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय या तिन्ही वर्गातील विद्यार्थ्यांत व त्यांच्या पालकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत राज्य शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया.

श्री. धर्मरावबाबा आत्राम ( सामाजिक न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री. अनंत तरे)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/ MAP/ SBT

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात एका अत्यंत गंभीर बाबीकडे आपल्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. आमच्या राज्यातील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील आमच्या ओ.बी.सी. समाजाच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क आणि शिष्यवृत्तीची जी सवलत देण्यात आली होती त्याला केवळ आर्थिक अडचण दाखवून स्थगिती देण्यात आली त्यामुळे ऐन परीक्षेच्या वेळेला ओ.बी.सी. समाजाच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना फी भरण्यासाठी, शैक्षणिक शुल्क भरण्यासाठी, परीक्षा फी भरण्यासाठी बाध्य केले जाते आणि गरीब विद्यार्थी वेळेवर हे शुल्क देऊ शकत नसल्यामुळे त्यांना शिक्षणापासून वंचित व्हावे लागते. अनुसूचित जातीच्या, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती आणि फी माफीची सवलत दिली जाते त्याप्रमाणे आमच्या ओ.बी.सी. समाजाच्या विद्यार्थ्यांना देखील ती सवलत देण्यात आली होती परंतु ती सवलत स्थगित करुन आमच्या ओ.बी.सी. समाजाच्या विद्यार्थ्यांवर अन्याय करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यांना आमचे सरकार दिलासा देणार काय ? जो स्थगनादेश दिलेला आहे तो स्थगित करुन पूर्ववत ही सवलत ओ.बी.सी. समाजाच्या विद्यार्थ्यांना देणार काय ?

श्री. धर्मरावबाब आत्राम : ज्या अनुदानित शाळा आहेत त्यांना शिष्यवृत्ती, परीक्षा फी आणि शैक्षणिक शुल्क आपण देतो परंतु हे सर्व जे आदिवासी विद्यार्थी असतील, अनुसूचित जातीचे विद्यार्थी असतील, विमुक्त जाती व भटक्या जमातीचे विद्यार्थी असतील त्यांना देतो. विना अनुदान तत्वावर असलेली महाविद्यालये, इयत्ता अकरावी-बारावी आहे त्या ठिकाणी या समाजाच्या विद्यार्थ्यांना सवलत देत असतो. फक्त ओ.बी.सी. समाजाला विना अनुदानित महाविद्यालये, इयत्ता अकरावी- बारावी आहे त्या ठिकाणी त्यांना देत नाही. कारण सध्या राज्य सरकारची आर्थिक परिस्थिती बरोबर नसल्यामुळे यामध्ये तरतूद करता येणार नाही.

प्रा. जोगेंद्र कवाडे : आर्थिक अडचण असली तरी ज्याप्रमाणे अनुसूचित जाती, अनुसूचित जामतीच्या विद्यार्थ्यांना, मग अनुदानित असो किंवा विना अनुदानित असो, त्यांना ही सवलत दिली जाते. ती सवलत ओ.बी.सी. समाजाच्या विद्यार्थ्यांना दिली जात होती परंतु केवळ आर्थिक अडचणीचे कारण सांगून ही सवलत बंद करण्यात आली आहे. आर्थिक अडचण असताना आपल्या राज्यातील मंत्रिमहोदयांसाठी स्कोडासारख्या महाग गाडया घेण्यासाठी पैसे आहेत परंतु मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ही सवलत देण्यासाठी निधी नाही काय ?

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/ MAP/ SBT

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सध्या आपण स्कोडा गाडया खरेदी करणार नाही असे आश्वासन माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेले आहे. आम्ही गाडया वगैरे घेणार नाही.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा अत्राम....

ज्या अनुदानित शाळा आहेत आणि अकरावी व बारावीची महाविद्यालये या सर्वांना ज्यामध्ये ओबीसी आहेत, यांना सुध्दा आपण सवलती देत आहोत. विनाअनुदानित 11 वी व 12 वीची जी महाविद्यालये आहेत, त्यात इतर जाती व जमाती आहेत त्यांना आपण देतो. फक्त ओबीसीला आपण त्यातून वगळलेले आहे. त्यांच्याकरिता आपल्याला काही करता येणार नाही.

श्री.पांडूरंग फुंडकर : सभापती महोदय, दिनांक 31 मार्च, 2004 च्या शासन निर्णयान्वये ही योजना विनाअनुदानित महाविद्यालयांना लागू करण्यात आली आहे. 31 मार्च, 2004 शासन निर्णय करतो आणि ओबीसीच्या महाविद्यालयीन विनाअनुदानित विद्यार्थ्यांना लागू करण्यात आलेले आहे. यावेळी परीक्षेच्या वेळी लगेच सवलती रद्द करतो. या महाराष्ट्रातील ओबीसी आहे त्याच्या सवलती रद्द करतो. शासनाने दोन-तीन दिवसांपूर्वी अर्थसंकल्प मांडलेला आहे. या अर्थसंकल्पात आपण सर्व जाती, जमातींसाठी तरतुदी केल्या आहेत. फक्त विनाअनुदानित महाविद्यालयामध्ये ओबीसीचे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत अशा विद्यार्थ्यांसाठी तरतूद करण्यासाठी तुमच्याकडे पैसे नव्हते. ऐन परीक्षेच्यावेळी हा आदेश काढता. हे विद्यार्थी परीक्षा फी भरु शकत नाही त्यामुळे ते परीक्षेपासून वंचित राहिले आहेत म्हणून हा निर्णय मागे घेऊन विनाअनुदानित महाविद्यालयांना ही सवलत लागू करण्यात येईल काय ?

श्री.धर्मरावबाबा अत्राम : विनाअनुदानित महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांना आपण शिष्यवृत्ती देतो. त्या विद्यार्थ्यांची फी आपल्याला देता येणार नाही. 83 हजार विद्यार्थी असून त्यांच्यावर 71 कोटी इतका खर्च येईल, म्हणून शासनाला हे करता येणार नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, विद्यार्थी हे एका विशिष्ट वयोगटातील असतात. या वयोगटाच्या विद्यार्थ्यांना ही वागणूक मिळत आहे. हया विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती लागू आहे. शासकीय आणि अनुदानित महाविद्यालयांना लागू आहे, विनाअनुदानितला लागू नाही. एकाच गावातील, एकाच मोहल्यातील हे शासकीय आणि अनुदानित महाविद्यालयात असेल त्याला परीक्षा शुल्क माफ आहे. विद्यार्थ्यांबरोबर वागताना अशाप्रकारे वागणे बरोबर नाही. मुलांच्या मनावर त्याचे विपरित परिणाम होतात. प्रसंगी एका घरातील मुलगे असू शकतात. एकाच घरात

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...

अनुदानितमध्ये शिकत असेल त्याला परीक्षा शुल्क माफ आणि विनाअनुदानितमध्ये शिकणा-या विद्यार्थ्याने फी भरावयाची. हे विनाअनुदानितचे पाप हे वाईट पाप आहे. दुसरी अत्यंत वाईट गोष्ट अशी आहे की, अशा भेदभावामुळे म्हणजे एका घरातील, एका गावातील, एका मोहल्यातील, एका कंम्पाऊंडमधील विद्यार्थ्यांमध्ये फरक करणे योग्य नाही. मुलांमध्ये चांगली भावना निर्माण व्हावी म्हणून, गरीब, श्रीमंत मुलगा असे होऊ नये म्हणून आपण सारख्या सवलती देतो. मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती त्यांना दिलेली आहे. या दोन्हीबाबत निदान विचार तरी करु असे म्हणावे. उद्या हे अनावधानाने राहिले म्हणून विचार कराल.

श्री.धर्मरावबाबा अत्राम : सभापती महोदय, या विद्यार्थ्यांना ही सवलत द्यावयाची म्हटल्यास शासनावर जवळजवळ 71 कोटीचा बोजा पडणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुखसाहेबांनी यासंबंधी शासन काय विचार करणार आहे असा प्रश्न विचारला आहे. यासंबंधी आर्थिक तरतूद करता येईल काय यादृष्टीने जरुर मा.वित्त मंत्र्यांबरोबर बोलून त्यासाठी कशी तरतूद केली जाईल याबाबत विचार करु. परंतु या मागणीचा विचार करु असे आश्वासन यावेळी मी देऊ शकत नाही.

श्री.पांडूरंग फुंडकर : राज्यामध्ये 80 हजार विद्यार्थ्यांचा हा प्रश्न आहे.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : हे 50 टक्के, 52 टक्क्याच्या अनुशेषातील हे विद्यार्थी आहेत. आपण एसीएसटीच्या विद्यार्थ्यांना सवलत देता. हे सुध्दा अनुशेषातील ओबीसीचे विद्यार्थी आहेत.

नंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(श्री. व्ही.यू.डायगव्हाणे....)

संख्या जास्त आहे हा निकष आपण ठरवू नका. हे विद्यार्थीसुध्दा बॅकलॉगमधील आहे. मा.सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितल्या प्रमाणे एकाच कुटुंबातील एका मुलाला फी माफी आणि शिष्यवृत्ती मिळते आणि दुस-याला ती मिळत नाही हे योग्य नाही. केवळ निधीवर अवलंबून राहू नका. ओबीसी बॅकलॉगमध्ये आहेत की नाही या प्रश्नाचे उत्तर द्यावे.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : अनुदानीत शाळांतील विद्यार्थ्यांना आपण सवलती देत असतो. विनाअनुदानित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी फी शुल्क आणि शिष्यवृत्ती देता येणार नाही.

डॉ. नीलम गो-हे : राज्याची आर्थिक स्थिती चांगली नसल्यामुळे यासंदर्भात विचार करु शकत नाही असे उत्तर देण्यात आले आहे. माझा प्रश्न असा आहे की, केन्द्रामध्येही आपलेच सरकार आहे. तेव्हा इतर मागावर्गीय विद्यार्थ्यांसाठी कशा पध्दतीने आर्थिक मदत देता येईल यादृष्टीने केन्द्राकडे आपण काही प्रयत्न केले आहेत काय ? नसल्यास, तसे प्रयत्न केले जातील काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : प्रयत्न करता येतील.

श्री. रामनाथ मोते : आता मा. मंत्री महोदयांनी सांगितले की, शासनाची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे याबाबतीत विचार करता येणार नाही. माझा प्रश्न असा आहे की, 31 मार्च 2004 रोजी शासनाने जो जी.आर.काढला आहे त्यासंदर्भात आपल्या विभागाने वित्त विभागाची परवानगी घेतलेली आहे काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : होय.

श्री. प्रकाश शेंडगे : ओबीसी समाजाच्या विद्यार्थ्यांवर महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारे अन्याय होणे बरोबर नाही. प्रकल्पाच्या नावाखाली 400 कोटीच्या ठिकाणी 1300 कोटी दिले जातात आणि आमच्या ओबीसी समाजासाठी फक्त 71 कोटी रु. शासनाकडे नाहीत. प्रकल्पांच्या ठेकेदारांची बिले देण्याकरिता 900 कोटी वाढवून दिले जातात आणि ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी शासनाला पैसा देता येत नाही. हे असे चालणार नाही. महाराष्ट्रातील सारा ओबीसी समाज रस्त्यावर आल्या शिवाय राहाणार नाही. एका समाजातील विद्यार्थ्यांना सवलती दिल्या जातात आणि दुस-या समाजातील विद्यार्थ्यांना त्या दिल्या जात नाहीत हे योग्य नाही. हा समाजा समाजामध्ये भांडणे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. प्रकाश शेंडगे......)

लावून देण्याचा प्रकार आहे. तेव्हा माझी नम्र विनंती आहे की, मागासवर्गीयांकरिता असलेल्या सवलती बंद करण्याचा जो निर्णय शासनाने घेतलेला आहे त्या निर्णयामध्ये शासन दुरुस्ती करील काय ? या प्रश्नाचे होय किंवा नाही असे मंत्री महोदयांनी द्यावे म्हणजे मग आम्हाला आमचा निर्णय घ्यायला बरे.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : मी या पूर्वीच सांगितलेले आहे की, आम्ही कोणत्याच मागासवर्गीयांवर अन्याय करीत नाही. अनुदानित शाळामध्ये आम्ही सवलती देत असतो.

श्री. विनोद तावडे : विद्यार्थी विनाअनुदानित शाळामध्ये का जातात ? कारण अनुदानित शाळा, महाविद्यालये तुम्ही चालवित नाही. सरकारने ती चालवावीत म्हणजे विद्यार्थी तेथे प्रवेश घेतील. यामध्ये विद्यार्थ्यांचा काय दोष आहे ?

(उत्तर नाही)

प्रा. जोगेंद्र कवाडे : या लक्षवेधीच्या संदर्भात सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुखसाहेबांनी अत्यंत महत्वपूर्ण मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्यानुषंगाने एक गोष्ट मला सांगावयाची आहे की, विनाअनुदानित महाविद्यालयातील ओबीसी समाजाच्या विद्यार्थ्यांना अशा प्रकारे सवलतीपासून वंचित करणे हे सामाजिक न्यायामध्ये बसणारे आहे काय ? एका गावातील, एका वाडीतील, इतकेच नाही तर एका घरातील एका मुलाला सवलती मिळतात तर दुस-या मुलाला त्या मिळत नाहीत अशी परिस्थिती निर्माण होईल. याचे सामाजिक दुष्परिणाम काय होतील याचा शासनाने विचार केलेला आहे काय ? केवळ 70-80 कोटी रुपयांसाठी समाजातील संपूर्ण वातावरण शासनाला बिघडवायचे आहे काय ?

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ MHM/ प्रथम श्री. शिगम 14:10

प्रा.जोगेंद्र कवाडे...

सभापती महोदय, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना मग ते अनुदानीत असो, विना अनुदानीत असो या संस्थामध्ये सवलत मिळते आहे. त्या संस्थामध्ये शिकणारे, त्याच गावात रहाणारा आमचा ओ.बी.सी. समाजाचा जो विद्यार्थी आहे त्याला ही सवलत मिळत नाही. त्याचे कारण म्हणजे संस्था विना अनुदान असल्यामुळे ओ.बी.सी. समाजाच्या विद्यार्थ्याला सवलत मिळत नाही. त्याच गावातील अनुसचित जाती, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना सवलत मिळते आहे. तेंव्हा आमच्या ओ.बी.सी. समाजाच्या विद्यार्थ्यांमध्ये अनुसूचित जाती, जमातीच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत व्देशाची आणि तिरस्काराची भावना निर्माण होण्याची शक्यता आहे. यामुळे सामाजिक वातावरण बिघडण्याची शक्यता आहे. सामाजिक दुष्परिणाम टाळण्यासाठी आमच्या सरकारने 75 नव्हे तर 80 कोटी रुपये दिले पाहिजेत. या राज्यातील सामाजिक वातावरण योग्य ठेवण्याच्या दृष्टीकोनातून तरतूद करण्याची नितांत गरज आहे. ही तरतूद उपलब्ध करुन देण्यासंबंधी मंत्री महोदय खुलासा करतील काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, ही गंभीर बाब आहे. सभागृहातील सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन जरुर यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करु.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. पांडुरंग फुंडकर : अध्यक्ष महोदय, आम्हाला स्पेसिफीक उत्तर हवे आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : विना अनुदानीत संस्थेत शिकणा-या सर्व मागासवर्गीय समाजाच्या विद्यार्थ्यांना सर्व सवलती मिळाल्या पाहिजेत असा आमचा शासनाकडे आग्रह आहे...

( घोषणा देण्यात येतात. )

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माझे म्हणणे ऐकून घ्यावे.

**तालिका सभापती** : सन्माननीय मंत्री उत्तर देत आहेत. आपण त्यांचे उत्तर पूर्णपणे ऐकून घ्यावे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सामाजिक न्यायाची भावना माननीय मंत्र्यांनी ठेवावी अशी आमची त्यांच्याकडे मागणी आहे.

श्री. सुधाकर गणगणे : माननीय मंत्र्यांनी सभागृहातील दोन्ही बाजूच्या सदस्यांच्या भावना समजून घ्याव्यात.

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, ही आर्थिक बाब असल्यामुळे याबाबतीत वित्त मंत्र्यांशी चर्चा करण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी अशी आमची मागणी आहे.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

प्रा.बी.टी.देशमुख : माननीय मंत्री महोदयांनी ही गोष्ट कबूल केलेली आहे की, त्यांना या विषयाची पुरेशी तयारी करावी लागेल. अनेक वेळा असे होते की, जी काही पोझीशन असते त्या अनुषंगाने उत्तर येत असते. हा तसा विषय नाही. हा संवेदनशील विषय आहे. एका वर्गाला सवलत देऊ, दुस-या वर्गाला सवलत देणार नाही. एकाच घरातल्या एकाच मुलाला सवलत मिळेल. कारण तो या कम्पाऊंडमध्ये शिकतो. दुस-या मुलास सवलत मिळणार नाही. त्याचे कारण तो त्या कम्पाऊंडमध्ये शिक्षण घेत नाही. हे कम्पाऊंड तुम्ही निर्माण केलेले आहे. सभागृहाच्या दोन्ही बाजुच्या सदस्यांच्या भावना अतीशय तीव्र आहेत. विद्यार्थ्यांमध्ये असा भेदाभेद करु नये. माझे म्हणणे असे आहे की, मंत्री महोदयांनी सांगितले की, मला वित्त मत्र्यांशी चर्चा करावी लागेल. त्यांना वित्त मंत्र्यांशी चर्चा करु द्या. सभागृहातील सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेता ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

**तालिका सभापती** : सदर लक्षवेधी सूचना मी राखून ठेवत आहे.

-----------------

यानंतर श्री. उपरे..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**:कार्यक्रम पत्रिकेवरील गुटखा उत्पादनाच्या संदर्भातील लक्षवेधी सूचनेबाबत.

**तालिका सभापती** : आजच्या कार्यक्रम पत्रिकेवरील चौथ्या क्रमांकाची लक्षवेधी गुटखा उत्पादनाच्या संदर्भात असून ही लक्षवेधी सूचना आज घेण्यात येणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवाणी आणि अन्न व औषधी द्रव्ये प्रशासन मंत्र्यांच्या सुचनेनुसार ही लक्षवेधी सूचना सोमवारी घेण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अंबाजोगाई येथील लाभार्थींना शेळी-मेंढी महामंडळाकडून मंजूर झालेले अनुदान अद्याप न मिळणे.

**मु.शी.**: अंबाजोगाई येथील लाभार्थींना शेळी-मेंढी महामंडळाकडून मंजूर झालेले अनुदान अद्याप न मिळणे या विषयी श्री.पांडुरंग फुंडकर यांनी मांडलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचनेबाबत निवेदन.

श्री.हसन मुश्रीफ (पशुसंवर्धन राज्यमंत्री ): सभापती महोदय, अंबाजोगाई येथील लाभार्थींना शेळी-मेंढी महामंडळाकडून मंजूर झालेले अनुदान अद्याप न मिळण्याबाबत श्री.पांडुरंग फुंडकर यांनी उपस्थित केलेल्या विशेष उल्लेखाच्या सुचनेच्या संदर्भात निवेदन करण्याचे निदेश देण्यात आले होते. तरी ते निवेदन मी आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(निवेदनानंतर)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विशेष उल्लेखाच्या सूचनेव्दारे मी हा मुद्दा उपस्थित केला होता. शेळी-मेंढी महामंडळाचे आंबेजोगाई येथील कार्यालय आहे त्या ठिकाणी धनगर समाजाचे लोक उपोषणाला बसले होते. या महामंडळाच्या वतीने 10 कोटी रुपयांचे अनुदान मंजूर झाले हे अनुदान कायद्यानुसार लाभार्थीना मिळाले पाहिजे आणि लाभार्थींची तशी मागणीही होती. परंतु महामंडळाच्या वतीने टेंडर काढण्यात आले. अनुदान प्रत्यक्ष लाभार्थीना देण्यात आले नाही. यामध्ये प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार झाला. या भ्रष्टाचाराची चौकशी झाली पाहिजे अशी मागणी लाभार्थींनी केली होती आणि त्या मागणीसाठी ते उपोषणाला बसले होते. माननीय मुख्य मंत्र्यांनी उत्तर दिल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.शेंडगेसाहेब हे त्या ठिकाणी गेले आणि त्यानंतर त्या लोकांनी उपोषण सोडले. लाभार्थींचे अर्ज मागवून त्यांना 10 कोटी रुपये डायरेक्ट दिले पाहिजेत. कायद्यामध्ये तशी तरतूद आहे. पण तसे न करता कॉंट्रॅक्टरला ते पैसे दिले आणि त्यामध्ये लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. तरी या संपूर्ण प्रकरणाची चौकशी शासन करणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, नागपूर अधिवेशनामध्येसुध्दा हा विषय आलेला होत. ही गंभीर बाब आहे. कारण 10 कोटी रुपये पहिल्यांदाच शासनाने या शेळी-मेंढी मंडळाला दिले होते. यामध्ये 5 टक्के लाभधारकाचा हिस्सा, 20 टक्के अनुदान आणि 75 टक्के शासनाचे कर्ज आहे. धनगर समाजातील लोकांना हे पैसे देत असताना गैरव्यवहाराच्या तक्रारी दाखल झाल्या. त्यामुळे याबद्दल शासनाने काल जे आदेश दिले आहेत ते मी या ठिकाणी वाचून दाखवितो. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "परिषदेमध्ये दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने, या सर्व प्रकारची चौकशी करण्यासाठी, डॉ.ए.एस.कुचेवार, प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे."

**(सभापतीस्थानी मा. उप सभापती)**

डॉ.अशोक मोडक : सभापती महोगदय, आम्हांला जे निवेदन देण्यात आलेले आहे त्यामध्ये याचा उल्लेख नाही.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे निवेदन कालचे आहे. सभागृहामध्ये काल हे निवेदन करावयाचे होते म्हणून मी येथे येऊन बसलो होतो. पण काल निवेदन करण्यास मला परवानगी मिळाली नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : कालचे जे निवेदन आहे त्यामध्ये चौकशी अधिका-याचा उल्लेख नाही. तरी चौकशी अधिका-याची नेमणूक आज करण्यात आलेली आहे काय ? नागपूरच्या अधिवेशनामध्ये लक्षवेधी सूचनेव्दारे हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. हा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी चौकशी अधिका-याची नेमणूक करण्यात आली नाही हे बरोबर नाही. एका अधिका-याची चौकशी समिती नेमण्याऐवजी पाच सदस्यांची चौकशी समिती नियुक्त करून या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यात येईल काय ?

(उत्तर देण्यात आले नाही.)

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, मला माननीय मंत्रिमहोदयांना असे विचारावयाचे आहे की,हे निवेदन कसे आले आहे? माननीय सदस्यांनी काल जे मुद्दे उपस्थित केले होते ते मुद्दे वेगळे होते आणि आज जे निवेदन करण्यात आलेले आहे ते वेगळे आहे. हे निवेदन जर प्रेसला दिले जाणार असेल तर हे निवेदन करुन दिशाभूल करण्याचा सरकारचा हेतू नाही काय ? हा विषय भ्रष्टाचाराचा असून सन्माननीय सदस्यांनी भ्रष्टाचाराची दहा उदाहरणे दिली आहेत. परंतु त्यासबंधीचा एकही उल्लेख आजच्या निवेदनात करण्यात आलेला नाही.आता आपण या ठिकाणी जो उल्लेख केलेला आहे तो उल्लेख सुध्दा या निवेदनात करण्यात आलेला नाही.सरकारची काम करण्याची ही कोणती पध्दत आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी मी उभे राहून आपल्याला सांगितले होते. परंतु त्यावेळी त्यांनी भ्रष्टाचाराचा उल्लेख केला नव्हता. लोक उपोषणाला बसलेले आहेत एवढेच त्यांनी सांगितले होते.

श्री.पांडुरंग फुंडकर : मी त्याबाबतीत सांगितले होते.

श्री.हसन मुश्रीफ : लोक उपोषणाला बसलेले आहेत एवढाच उल्लेख त्यांनी केला होता.ते माझ्या दालनात आले होते आणि मी जिल्हाधिका-यांना सूचना दिल्या होत्या.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी मला सागितल्यानंतर मी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती केली आणि जिल्हाधिका-यांच्या मार्फत निरोप पाठविण्यास सांगितले होते. ही वस्तुस्थिती आहे.असे असतांना सन्माननीय सदस्य जर माननीय मत्रिमहोदयांना अडचणीत आणत असतील तर ते बरोबर नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हे निवेदन आपण वाचा. त्या दिवशी जो मुद्दा मांडण्यात आला होता त्याचा काहीही उल्लेख आजच्या निवेदनात करण्यात आला नाही.

श्री.हसन मुश्रीफ : तेथील लोक उपोषणाला बसलेले आहेत असे सन्माननीय सदस्यांनी मला सागितले होते.नंतर ते माझ्या दालनात आले होते त्यानंतर मी जिल्हाधिका-यांना असे सांगितले की, उपोषण करणा-यांना उपोषण मागे घेण्यास सांगण्यात यावे.त्याप्रमाणे

जिल्हाधिका-यांनी त्यांना उपोषण मागे घेण्यास सांगितले होते. त्या दिवशी भ्रष्टाचाराच्या बाबतीत त्यांनी कोणतेही दाखले दिलेले नव्हते.दहा कोटी रुपयाचे वाटप कशा पध्दतीने केलेले आहे

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ ...

यासबंधी हे निवेदन करण्यात आलेले आहे.80 टक्के वाटप पूर्ण झालेले आहे.त्यांनी ज्या सूचना केल्या होत्या त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही ही गोष्ट खरी आहे.धनगराच्या पैशामध्ये गैरव्यवहार व्हावा ही बाब मलासुध्दा बरी वाटली नाही म्हणून मी स्वत: त्यात लक्ष घातले होते आणि मी माननीय मंत्रिमहोदयांबरोबर बोललो होतो.माननीय मंत्रिमहोदयांनीसुध्दा तातडीने आदेश दिले आणि एक चौकशी अधिकारी नेमून सर्वागीण चौकशी करण्यास सागितलेले आहे.

डॉ.अशोक मोडक :सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदय आता जे काही सांगत आहेत ते बरोबर नाही.माझ्याकडे सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या भाषणाची प्रत आहे.ते भाषण मी येथे वाचून दाखवू काय ? . आपल्या भाषणात त्यांनी भ्रष्टाचाराचा उल्लेख केलेला आहे.

**उप सभापती** :सन्माननीय मंत्रिमहोदयांनी जे निवेदन केलेले आहे ते निवेदन सन्माननीय सदस्यांनी वाचलेले आहे तेव्हा त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांना काही प्रश्न विचारावयाचे असतील तर त्यासाठी त्यांनी लक्षवेधी सूचना द्यावी किंवा अन्य आयुधांचा वापर करावा.परंतु या संदर्भात आयत्या वेळी सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित करणे योग्य नाही.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय,लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून वा अन्य कोणत्याही आयुधाच्या माध्यमातून या विषयावर चर्चा करण्याची शासनाची तयारी आहे.

डॉ.अशोक मोडक : जे मुद्दे उपस्थित करण्यात आले होते त्यासंबंधी माननीय मंत्रिमहोदयांनी निवेदन केले पाहिजे अशी जर आम्ही अपेक्षा केली तर ती चूक आहे काय ?

**उप सभापती** : त्या दिवशी सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी मुद्दा मांडल्यानंतर त्या चर्चेत मी हस्तक्षेप केला होता व माननीय मंत्रिमहोदयांना विनंती केली होती. त्याप्रमाणे त्यांनी विनंती मान्य केली होती. आता त्या संदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी निवेदन केले आहे.

डॉ.अशोक मोडक : माननीय मत्रिमहोदयांनी मान्य केलेली विनंती आणि आमच्या हातामध्ये असलेले निवेदन याचा ताळमेळ असला पाहिजे.

श्री.प्रकाश शेंडगे :सभापती महोदय, दहा टक्के रक्कम लाच म्हणून घेण्यात आली असल्याबाबत अनेक लोकांनी लेखी तक्रारी केल्या आहेत कोणी कोणाला पैसे दिले याचासुध्दा त्यात उल्लेख केलेला आहे.

श्री.हसन मुश्रीफ :सन्माननीय सदस्यांनी ही माहिती माझ्याकडे द्यावी ती चौकशी अधिका-याकडे देण्यात येईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे : ही माहिती मी माननीय मंत्रिमहोदयांकडे देतो.

श्री.हसन मुश्रीफ :ठीक आहे.

श्री.प्रकाश शेंडगे : जो पर्यन्त ही चोकशी पूर्ण होत नाही तोपर्यन्त या योजनेला स्थगिती देण्यात येणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 80 टक्के वाटप पूर्ण झालेले आहे.

श्री.प्रकाश शेंडगे :लक्षवेधी सूचना येई पर्यन्त वा चौकशी पूर्ण होईपर्यन्त योजनेला स्थगिती देण्यात यावी.

श्री.हसन मुश्रीफ :ठीक आहे योजना स्थगित करु.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

4..


VTG/ SBT/ MHM/ प्रथम श्री.उपरे 14.20

<u>विशेष उल्लेखाच्या सूचना</u>

पृ.शी. रुग्णवाहिन्या आणि शववाहिन्यांचे दर निश्चित करणे

मु.शी :रुग्णवाहिन्या आणि शववाहिन्यांचे दर निश्चित करण्याबाबत
डॉ.दीपक सावंत यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उप सभापती** : माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचनादिली आहे.त्यांनी ती मांडावी.

डॉ.दीपक सावत (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"रुग्णवाहिन्या तसेच शववाहिन्यांच्या खरेदी आणि नोंदणीच्या वेळी संस्थांना सरकारकडून सवलत देण्यात येते. परंतु बहुतांशी खाजगी रुग्णवाहिका आणि शववाहिकांच्या चालकांकडून गरजूंची लुबाडणूक केली जात आहे. प्रति किलोमिटरसाठी सर्रास 100 ते 150 रुपये आकारण्यात येतात तर अगदी जवळच्या अंतरासाठी 400 ते 500 रुपये घेतले जातात. सरकारी रुग्णालयांच्या रुग्णवाहिन्या उपलब्ध होत नसल्याने रुग्णांच्या नातेवाईकांना नाईलाजाने या खाजगी रुग्णवाहिन्यांची सेवा घ्यावी लागते. यासाठी सरकारने खाजगी रुग्णवाहिन्यांचे व शववाहिन्यांचे दर पत्रक निश्चित करावे व याबाबत शासनाने निवेदन करावे._"

:सभापती महोदय, आपण आज जर सार्वजनिक हॉस्पिटलसमोर किंवा मोठया प्रायव्हेट नर्सिग होमसमोर पाहिले तर तेथे रुग्णवाहिन्यांची आणि शव वाहिन्यांची रांग लागलेली असते असे आपल्याला दिसून येईल..ज्यावेळी एखादा पेशंट आजारी असतो त्यावेळी त्या पेशंटला हॉस्पिटलमध्ये नेण्यासाठी रुग्णवाहिकेची किंवा हॉस्पिटलमध्ये जर एखाद्या रुग्णाचा मृत्यू झाला असेल तर बॉडी घरी आणण्यासाठी शव वाहिनीची गरज पडत असते. परंतु ब-याचदा रुग्ण वाहिकेतूनच शव आणले जाते. ज्या ठिकाणी अडचण असेल त्या ठिकाणी असे करणे ठीक आहे परंतु ज्या ठिकाणी शव वाहिनी उपलब्ध आहे त्या ठिकाणी सुध्दा ॲम्ब्युलन्समधून शव आणले जाते.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सावंत ....

अध्यक्ष महाराज, आपण जर या रूग्णवाहिन्यांचे आणि शववाहिन्यांचे दर पाहिले तर ते अव्वाच्या सव्वा असल्याने आपल्याला दिसून येतील. एकाच अंतरावर जाण्यासाठी एखाद्या रूग्णवाहिनीला हजार-दीड हजार रुपये सांगितले जातात तर दुसरा 400 रुपये मागतो. पेशंट वा त्याचे नातेवाईक हे अडलेले असल्याने जेवढे पैसे मागितले जातात तेवढे तो देण्यास तयार होतो आणि अशा प्रकारे त्याला नाडले जाते. हीच परिस्थिती शववाहिनीच्याबाबतीत देखील आहे. एक तर शासकीय हॉस्पिटलच्या रूग्णवाहिका असतातच असे नाही. बहुतेक ठिकाणी त्या नसतातच. त्यामुळे पेशंटला वा त्याच्या नातेवाईकाला खाजगी संस्थांकडून चालविल्या जाणाऱ्या या सेवेवर अवलंबून रहावे लागते. खरे तर खाजगी संस्था शासनाकडून सवलती घेऊनच रूग्णवाहिका वा शववाहिका खरेदी करीत असतात पण पेशंटला मात्र कोठल्याही प्रकारे सवलत त्यांचेकडून दिली जात नाही, किंबहुना त्याला नेहमीच नाडले जाते. म्हणूनच या रूग्णवाहिकांचे तसेच शववाहिकांचे दर शासनाने निश्चित करून द्यावेत अन्यथा आपण स्वत: रूग्णवाहिका किंवा शव वाहिका प्रोव्हाईड कराव्यात अशी माझी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती आहे.

****

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...... डीडी 2 ..

**<u>हरकतीच्या मुद्याबाबत</u>** ....

श्री. मधुकर चव्हाण : अध्यक्ष महाराज, या विशेष उल्लेखा बाबत माझा हरकतीचा मुद्दा आहे. 17 डिसेंबर 2004 रोजी नागपूर अधिवेशनामध्ये मी विशेष उल्लेख केला होता. अध्यक्ष महाराज, आपल्या नियमानुसार सदस्यांनी विशेष उल्लेख केल्यानंतर त्या संबंधात संबंधित मंत्री महोदयांनी वा विभागाने सदस्यांना 30 दिवसात उत्तर देणे आवश्यक आहे. मी सदनामध्ये विशेष उल्लेख 17 डिसेंबरला केल्यानंतर 30 दिवसात मला त्याबाबत कोणतेही उत्तर आले नाही म्हणून मी 11 फेब्रुवारी 2005 रोजी माननीय सभापती श्री.शिवाजीराव देशमुख यांना पत्र लिहिले होते आणि त्यांनी देखील त्याची दखल घेऊन त्वरित विभागाला लिहिले होते की, सदस्यांना या विषयी 15 दिवसात माहिती द्यावी. पण त्यानंतरही मला त्याबाबत काहीही कळविण्यात आले नाही. म्हणून मी पुन्हा माननीय सभापतींना याबाबत सांगितले असता त्यांनी पुन्हा विभागाला स्मरणपत्र देवून 3 दिवसात माहिती देण्यास सांगितले होते. पण तरीही आजतागायत मला त्याबाबत काहीही कळविण्यात आलेले नाही. अध्यक्ष महाराज, नियमानुसार 30 दिवसात सदस्यांना काही उत्तर विभागाने वा मंत्र्यांनी दिले नाही तर आम्ही येथे करीत असलेल्या 'विशेष उल्लेख'ला काहीच अर्थ नाही. अध्यक्ष महाराज, खटाव गिरणीला जी आग लागली होती त्यासंबंधात मी हा विशेष उल्लेख केलेला होता. आता त्यासंबंधात कोणाला वाचविण्याचा शासनाचा प्रयत्न चालला आहे काय ? या संबंधात माननीय सभापतींनी दोन स्मरणपत्रे पाठवून देखील मंत्री महोदय किंवा संबंधित विभाग त्याची दखल घेणार नसेल तर या विशेष उल्लेखाचा उपयोग काय ?

**उपसभापती** : कोणत्या विभागाशी ही बाब संबंधित आहे ?

श्री. मधुकर चव्हाण : वस्त्रोद्योग विभागाशी. ..

**उपसभापती** : वस्त्रोद्योग विभागाने माननीय सदस्यांच्या विशेष उल्लेखासंबंधात, माननीय सभापतींनी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने ताबडतोब याचा खुलासा करावा, पुढील आठवड्याच्या आत.

श्री. सुरेश शेट्टी : होय. मी याची नोंद घेतो.

****

..... डीडी 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : भारताचा सुपरस्टार क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यास राज्य विधीमंडळाच्या सभागृहात बोलावून त्याचा सन्मान करण्याबाबत.

**मु.शी.** : भारताचा सुपरस्टार क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यास राज्य विधीमंडळाच्या सभागृहात बोलावून त्याचा सन्मान करण्याबाबत श्रीमती मंदा म्हात्रे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

---

**उपसभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे ती त्यांनी मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते -

" भारताचा सुपरस्टार क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर जागतिक क्रिकेटसाठी आज आयकॉन ठरला आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दहा हजार धावा आणि जवळपास 70 शतके ही सचिनची धडाकेबाज कारकीर्द आहे. अशा या सचिनबद्दल महाराष्ट्राला अभिमान आहे. सचिनला संसदेत बोलावून त्याचा सन्मान करण्याचा मानस केंद्र सरकारने व्यक्त केला आहे. मी याबाबत विशेष उल्लेख करते की, सचिनला राज्य विधीमंडळाच्या सभागृहात बोलावून त्याचा महाराष्ट्रातील जनतेच्या वतीने यथोचित सन्मान करावा अशी मी सभागृहाला विनंती करीत आहे. "

****

..... डीडी 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये शासनाने मागासवर्गीयांसाठी राखून ठेवलेल्या जागांच्या विक्री-हस्तांतरणात निर्माण होणाऱ्या समस्या.

**मु.शी.** : सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये शासनाने मागासवर्गीयांसाठी राखून ठेवलेल्या जागांच्या विक्री-हस्तांतरणात निर्माण होणाऱ्या समस्या या बाबत श्री.कन्हैयालाल गिडवानी यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

---

**उपसभापती** : सन्माननीय सदस्या श्री. कन्हैयालाल गिडवानी यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे ती त्यांनी मांडावी.

श्री. कन्हैयालाल गिडवानी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो -

" राज्यात विशेषत: मुंबईत व राज्यातील प्रमुख शहरांमध्ये निवासाच्या सोयी-सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने स्थापन होणाऱ्या व करण्यात येणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना शासन काही विशिष्ट अटी व शर्तीवर भूखंड उपलब्ध करून देते. असे भूखंड उपलब्ध करून देत असताना त्या ठिकाणी बांधण्यात येणाऱ्या एकूण सदनिका अथवा जागांपैकी 20 टक्के जागा विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय समाजाच्या व्यक्तींसाठी (SC, ST & NT) देण्याबाबतचा दिनांक 7 जुलै 1999 चा असलेला शासन निर्णय, या शासन निर्णयानुसार सहकारी गृहनिर्माण संस्थेला देण्यात येणाऱ्या एकूण जागेच्या 20 टक्के जागा SC, ST व NT साठी देण्याचे सक्तीचे असणे तसेच या जागांच्या हस्तांतराबाबत विक्रीसंदर्भात शासनाचे 5 वर्षे, 10 वर्षे व 15 वर्षांच्या कालावधीचे स्लॅब निश्चित असून हस्तांतराची फी सुद्धा ठरलेली असते. परंतु शासनाने केलेल्या या तरतुदीचा मागासवर्गीय समाजाला होत असलेला आर्थिक तोटा, सदरहू जागा अथवा सदनिका हस्तांतरित करावयाची अथवा विकावयाची झाल्यास ती मागासवर्गीय म्हणजेच SC, ST किंवा NT समाजातील व्यक्तीलाच विकण्याची असलेली सक्ती. त्यामुळे अशा जागा अथवा सदनिकांची त्याच संवर्गातील खरेदीदार न मिळाल्यामुळे विक्री करता न येणे व अशा जागांच्या विक्रीमध्ये असलेल्या अनंत अडचणी, एखाद्या जागेला त्याच संवर्गातील खरेदीवर मिळाल्यास तो बाजार मूल्यापेक्षा त्या जागेची किंमत कमी सांगत असल्यामुळे कमी किंमतीला जागा विकावी लागणे. परिणामी मूळ

...... डीडी 5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गिडवानी .....

मागासवर्गीय मालकाला तोटा सहन करावा लागणे. शासनाच्या चुकीच्या निर्णयामुळे मागासवर्गीयांवर होत असलेला अन्याय व तोटा. सबब अशा जागा अथवा सदनिका विक्री करणाऱ्या SC, ST अथवा NT च्या सदनिकाधारकांना त्यांच्या जागा कोणालाही विकण्याची मुभा देण्याची आवश्यकता व त्याप्रमाणे 7 जुलै 1999 च्या शासन निर्णयात बदल करण्याची आवश्यकता. शासनाने असा बदल केल्यास मागासवर्गीय समाजाचा सदनिकाधारक स्वत:ची जागा इतरांप्रमाणे कोणालाही विक्री करू शकेल व त्यायोगे त्याला त्या जागेचा योग्य मोबदला प्राप्त होऊ शकेल व त्या अनुषंगाने त्याचा तोटा व अन्याय होणार नाही. सबब शासनाने वरीलप्रमाणे शासन निर्णयात बदल करावा अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे. आपण मला विशेष उल्लेख मांडू दिल्याबद्दल धन्यवाद."

अध्यक्ष महाराज, कोणतीही गृहनिर्माण सहकारी संस्थेला भूखंड देताना त्यातील 20 टक्के जागा मागासवर्गीयांसाठी राखीव म्हणून ठेवण्याची अट शासनाने जुलै 1999 च्या जीआर ने घातलेली आहे आणि ती गोष्ट सक्तीची केलेली आहे. त्यामुळे असे झाले आहे की, अशा 20 टक्के राखीव जागांतून ज्यांनी सदनिका घेतलेल्या आहेत त्यांना त्यांची पुनर्विक्री करताना मोठा तोटा सहन करावा लागतो. ती सदनिका त्यांना मागासवर्गीय व्यक्तीलाच विकावी लागते आणि अशा वेळी संबंधित व्यक्ती त्या जागेची किंमत बाजारभावापेक्षा पाडून मागते आणि नाईलाजाने मूळ सदस्याला तो व्यवहार पूर्ण केल्याने तोटा होतो. म्हणजेच त्याला त्या जागेचे बाजारमूल्यानुसार किंमत मिळायला पाहिजे ती मिळत नाही, हा त्याच्यावर एक प्रकारे अन्यायच होतो आहे. 9.7.1999 च्या महसूल विभागाच्या जी.आर. नुसार सोसायटीतील इतर सदस्यांना अन्य कोणालाही जागा विकण्यास मुभा दिलेली आहे. ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री.जागडे ....इइ 1 ..

श्री. कन्हैयालाल गिडवाणी...

अशी सवलत मागासवर्गीयांना सुध्दा देण्यात यावी. आज त्यांच्यावर अन्याय होत आहे. तसेच गृहनिर्माण सोसायटीमध्ये मागासवर्गीयांसाठी 20 टक्के घरे राखून ठेवण्याबाबतचे देखील बंधन आहे. त्यामुळे मागासवर्गीयांना त्यांचे अधिकार मिळावेत म्हणून मी हा विशेष उल्लेख केला आहे. शासनाने या बाबत गांभिर्याने दखल घेण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी जी संधी दिली, त्याबद्दल मी आपले आभार मानून माझे भाषण संपवितो.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: उत्कृष्ट वाङ.मय निर्मितीचा पुरस्कार जाहीर होऊनही त्याची अंमलबजावणी न होणे.

**मु.शी.**: उत्कृष्ट वाङ.मय निर्मितीचा पुरस्कार जाहीर होऊनही त्याची अंमलबजावणी न होणे या बाबत श्री. विलास अवचट यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. विलास अवचट यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. विलास अवचट ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" माहे जून 2004 मध्ये उत्कृष्ठ वाङ.मय निर्मितीचा पुरस्कार जाहीर करण्यात आली. या बाबतची अभिनंदनाची तार महाराष्ट्राच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत पाठविण्यात आली. वृत्तपत्रातून नावे जाहीर झाली. आपल्या साहित्यसेवेचा राज्य शासनाने गौरव केल्याच्या भावनेने राज्यातील अनेक साहित्यिकांचा ऊर आनंदाने भरुन आला. परंतु सरकारच्या वतीने अधिकृतपणे येणारे पत्रही अद्यापही आलेले नाही. सरकारच्या वाङ.मयप्रेमात खतपाणी कसे घातले जाईल आणि लक्तरे लेऊन मंत्रालयासमोर उभ्या असलेल्या मायमराठीला खराखुरा राजाश्रय कधी मिळेल, या विवंचनेत साहित्यविश्व ग्रासले आहे. यंदाचे आर्थिक वर्ष संपण्याआधी हे पुरस्कार वितरीत व्हावे, यासाठी राज्याच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाने मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवूनही त्यास अद्याप प्रतिसाद मिळालेला नाही. आपल्या मायमराठीला जगविणारे हे साहित्यिक जर असे लाचार झाले असतील तर मराठी जगणार तरी कशी ? या बाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी. "

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: समन्वयाचे पद बंद करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय.
**मु.शी.**: समन्वयाचे पद बंद करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय या बाबत श्रीमती संजीवनी रायकर यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती संजीवनी रायकर ( मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

" मुदलीयार आयोगाच्या शिफारशीनुसार निर्माण केलेली शिक्षण शास्त्र महाविद्यालयातील विस्तार केंद्रे बंद करुन समन्वयकांमार्फत शिक्षकांचे सेवांतर्गत प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि कामे जबाबदारीने करणा-यांना नोकरकपातीचा मार्ग म्हणून नियुक्तीवर बंदी घालणे, पुरोगामी महाराष्ट्राच्या विचार प्रणालीसाठी योग्य नाही. सदर विषय अत्यंत महत्वाचा असल्याने तो मी आज सभागृहात " विशेष उल्लेखाद्वारे " मांडू इच्छिते. "

सभापती महोदय, शासन समन्वयकाची पदे बंद करण्याचा हळूहळू निर्णय घेत आहे. मुदलियार आयोगाच्या शिफारशीप्रमाणे शिक्षणशास्त्र महाविद्यालयात विस्तारसेवा केंद्रे सुरु केली. सुरुवातीला चार ठिकाणभ समन्वयक व अन्य पदांची नियुक्ती मा. मधुकरराव चौकरी शिक्षणमंत्री असताना करण्यात आली. त्याप्रमाणे प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी ही केंद्र स्थापन झाली. सभापती महोदय, समन्वयकांचे त्यावेळी काय काम होते ? शिक्षकांचे सेवाअंतर्गत प्रशिक्षण करणे, त्यांच्यात संशोधनवृत्ती निर्माण करणे, मुल्य शिक्षण जागृती करणे, पाठ्यपुस्तकांवर अभ्यासक्रमांवर विचार करुन नविन शैक्षणिक धोरणावर अभ्यासपूर्ण विवेचन करणे व उद्‌बोधन वर्ग घेणे अशा पकारची कामे त्यांना देण्यात आली होती. शासनाची नवनवीन धोरणे शिक्षकांपर्य्रन्त पोहचविण्याचे काम उत्तम रितीने हे समन्वयक करीत होते. परंतु हळूहळू ही पदे काटकसरीच्या नावाखली रद्द करण्याचे शासनाने ठरविले आहे. असे झाले तर त्यांचे काम कोण करणार ? अगोदरच भरपूर कार्यभार असलेल्या प्राधापकांवर हे काम सोपविले तर शिक्षणाचा दर्जा कसा काय टिकून राहणार आहे, हे मला समजत नाही. म्हणून शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी समन्वयाचे पद अत्यावश्यक आहे. म्हणून या बाबतचा शासनाने फेरविचार करावा अशी मी या विशेष उल्लेखाच्या निमित्ताने शासनास विनंती करीत आहे.

..4..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: आझाद मैदानाजवळ येणा-या मोर्चेक-यांना प्रसाधनगृहे व स्नानगृहे बांधणे.
**मु.शी.**: आझाद मैदानाजवळ येणा-या मोर्चेक-यांना प्रसाधनगृहे व स्नानगृहे बांधणे या बाबत श्री. संजय दत्त यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय दत्त ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो..

" मुंबई मध्ये मोर्चे, धरणे, आंदोलने यासाठी मुंबईतील आझाद मैदान हे ठिकाण निश्चित केले असल्यामुळे त्या ठिकाणी सतत महाराष्ट्रभरातून अनेक मोर्चेकरी हजारोंच्या संख्येने जमत असतात. या मार्चेक-यांमध्ये मुंबईबाहेरील विशेषत: ग्रामीण भागातून येणा-या व्यक्तिचा मोठ्या प्रमाणात समावेश असतो. यात महिला व त्यांच्या बालकांचाही समावेश असतो. ग्रामीण भागातून मुंबईकडे निघालेल्या जनतेला 10 ते 12 तासांचा प्रवास करुन सकाळी पोहोचल्यानंतर मोर्चासाठी आझाद मैदानात हजर रहावे लागते. सकाळी त्यांना मुंबईतील या परिसरात पुरेशा प्रमाणात प्रसाधनगृहे व स्नानगृहे उपलब्ध नसल्यामुळे त्यांची फार मोठी गैरसोय होते.

तरी मोर्चेकरी स्त्री-पुरुषांची गैरसोय दूर करण्यासाठी मुंबईतील या परिसरात पुरेशा प्रमाणात प्रसाधनगृहे व स्नानगृहे उभी करावीत व शासनास त्याबाबत योग्य सूचना द्यावी. "

-

( यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेखाच्या सूचनेसंबंधी**

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, मला आपणास एक विनंती करावयाची आहे की, शासनाच्या गट विमा योजनेतील नफेखोरीसंबंधी मला विशेष उल्लेखाची सूचना मांडण्याकरिता आपण मला सोमवारी अनुमती द्यावी.

**उपसभापती** : आपण आज जरी विशेष उल्लेखाची सूचना मांडण्यासाठी विनंती केली असती तर मी आजही आपणास परवानगी दिली असती.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(शासजीय विधेयजे )**

**पृ.शी.: (पुरवणी) विनियोजन विधेयक.**

**L.A. BILL XXXI OF 2005.**

**(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 2005.)**

डॉ. सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 31 दिनांक 31 मार्च 2005 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजूरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास असे आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) व्दारे महाराष्ट्राचे राज्यपाल त्यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 ते 3, अनुसूची खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**उपसभापती** : ज्या अर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्या अर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येत आहे.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : विद्यापीठ (सुधारणा) विधेयक

**L.C. BILL NO.I OF 2005.**
**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNIVERSITIES ACT, 1994.)**

श्री. सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : महोदय,मी आपल्या अ-ुमती-ने स-ा 2005 चे वि.प.वि. ज्रमांज 1 महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेज्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयज विचारात घेज्यात आले आहे. आता विधेयज जंडश: विचारात घेज्यत येईल.

जंड 2 ते 3, विधेयकाचे भाग झाले .

खंड 1 संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले .

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या विधेयकाच्या निमित्ताने एक बाब मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो. त्या बाबत आपण विचार करावा अशी विनंती करतो. या विधेयकाच्या मराठी व इंग्रजी प्रती मला देण्यात आल्या आहेत. त्यापैकी मराठी प्रतीमध्ये "संत गाडगे महाराज विद्यापीठ" व इंग्रजीमध्ये "दी संत गाडगे महाराज विद्यापीठ" असे म्हटले आहे. हे चुकीचे असून ते कायम स्वरुपी रेकॉर्डवर राहील. तेव्हा मराठीमध्ये सुध्दा "दी संत गाडगे महाराज विद्यापीठ" असे वाक्य असावे अशी माझी सूचना आहे.

**उपसभापती** : विधेयकामधील वाक्यरचना बरोबर आहे.

श्री. सुरेश शेट्टी : महोदय, मी आपल्या अ-ुमती-ने स-ा 2005 चे वि.प.वि.ज्रमांज 1 संमत ज्रज्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्-ा मतास टाजू-ा संमत झाला.

**उपसभापती** : स-ा 2005 चे वि.प.वि. ज्रमांज 1 संमत झाले आहे.

----

(यानंतर सौ. रणदिवे)

APR/MHM/SBT पूर्वी श्री.सरफरे . . . . 14:40

सावंत आयोगाच्या अहवालाबाबत

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, सावंत आयोगाचा अहवाल मराठीमध्ये भाषांतरीत झाल्यानंतर तो आज आम्हाला आमच्या पिजन होलमध्ये मिळालेला आहे. या अहवालावर तातडीने चर्चा व्हावयास पाहिजे. तेव्हा ही आज आज घेणार आहात का ?

**उप सभापती** : या विषयावर आज कशी चर्चा घेणार. याबाबतीत कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरेल.

----

. . . .2 जी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई दुकाने व आस्थापना (सुधारणा) विधेयक

**L.C. BILL NO.III OF 2004.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY SHOPS AND ESTABLISHMENTS ACT, 1948.)**

श्री.गणेश नाईक (उत्पादन शुल्क मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 3 - मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, 1948 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, मुंबईतील दुकाने व आस्थापना अधिनियम 1948 च्या अंतर्गत दुकाने वाणिज्यिक, आस्थापना, रहिवाशी हॉटेल्स्, रेस्टॉरंट, खाद्यगृहे आणि सिनेमागृहे आणि सामाजिक करमणुकीची ठिकाणे यामधील कामाच्या अटी आणि रोजगार मध्ये सुधारणा करणे विषयीचे हे विधेयक आहे. पूर्वीच्या कालखंडात वाणिज्यिक आस्थापना कोणत्याही दिवशी सकाळी 8.30 वाजता उघडण्यात येत असत व रात्री 8.30 वाजता बंद होत असत. पण एकंदरीत बदललेल्या परिस्थितीत ब-याच घटकांनी ही वेळ एक तासांनी वाढवावी अशी मागणी केलेली आहे. त्यानुसार सुधारीत विधेयकामध्ये 9.30 पेक्षा अगोदर बंद करण्यात येणार नाही असे या विधेयकात मांडण्यात आलेले आहे आणि हा कलम 13(1) मधील भाग आहे. तसेच कलम 33(1) मध्ये असे म्हटलेले आहे की, पूर्वीच्या कालखंडामध्ये कोणत्याही आस्थापनात, दुकानात कोणतीही स्त्री घटकाला, मग ती मालकाच्या कुटुंबातील असली तरी सुध्दा सकाळी 6.00 वाजण्यापूर्वी येण्यास मनाई होती. परंतु आज जगातील एकूणच व्यापार,उदीम बदलला आहे. कॉल सेंटर आणि इंफरमेशन टेक्नॉलॉजीमध्ये मोठया प्रमाणात तरुण-तरुणी 24 तास काम करीत आहेत. अशा बाबतीत काही खास घटकांना परवानगी देण्यात आली होती. परंतु सर्वच ठिकाणी महिलांना आत्मविश्वासाने काम करण्यासाठी मुभा मिळावी म्हणून याठिकाणी मागच्या कलमानुसार सकाळी 6.00 वाजण्यापूर्वी कामावर येण्याची मनाई केली होती, ती रद्द केले आहे.आता कलम 33(3) अन्वये अशा प्रकारच्या कोणत्याही स्त्रीस रात्री 8.30 वाजल्यानंतर काम करण्यास फर्मावण्यात येणार नाही. पण आता ती वेळ एक तासांनी वाढविली आहे. काही घटकांमध्ये महिलांना काम

. . . .2 जी-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक . . . .

करताना आणखी मुभा मिळावी हा यातील उद्देश आहे आणि यासाठी मी येथे विधेयक मांडलेले आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

----

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/ पूर्वी सौ.रणदिवे.... 14:45

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या विधेयकाचा उद्देश चांगला आहे. प्रश्न एवढाच आहे की, महिलांना रात्री 9-30 पर्यन्त काम करण्याची त्यांना मुभा दिलेली आहे. या मुंबई शहरामध्ये वेळेला काही महत्व राहिले आहे काय, असा माझा प्रश्न आहे. महिलांना काही सुरक्षितता राहिलेली आहे काय, असा माझा दुसरा प्रश्न आहे. मुंबई शहरात आणि ठाणे शहरात अत्याचार, बलात्काराचे प्रकार राजरोज चालू आहेत. त्याबाबतचा कोणत्याही प्रकारचा विचार न करता आपण या दुकानातून, आस्थापनेतून....नवी मुंबईमध्येदेखील चालू आहे. आज जी आपण व्यवस्था करत आहोत परंतु त्या संदर्भात महिलांना जास्त संरक्षण मिळावे, मोठ्या संख्येने ज्या ठिकाणी महिला असतील तेथे त्या एकत्र राहू शकतील,येऊ शकतील.पण एखाद्या आस्थापनेवर एखाद-दुसरी महिला असेल तर तिला रात्रीच्यावेळी प्रवास करावा लागतो, शेवटी नोकरीच्या निमित्ताने तिला प्रवास करावा लागतो. प्रामुख्याने मुंबई शहरातील मराठी वस्ती उपनगरात बाहेर रहायला चाललेली आहे. त्यांना नोकरीच्या निमित्ताने मुंबई शहरामध्ये यावे लागते, अशापरिस्थितीत रात्री त्यांना संरक्षण नसेल तर या महिलांनी करायचे काय, हा मोठा प्रश्न आहे. आज आपल्याला माहिती आहे की, मतीमंद मुलींवर रेल्वेमध्ये बलात्कार होत आहेत. परवा तर अतिशय भयंकर घटना घडली की, त्या मतीमंद मुलीला राजरोज मारझोड चाललेली असताना, प्लॅटफॉर्मवर हजारो नागरीक असतांना सुध्दा एक नागरीक पुढे जाऊन त्यांना रोखू शकला नाही. अशी या मुंबई शहराची परिस्थिती होत चाललेली आहे.शॉप ॲन्ड एस्टॅब्लिशमेंट ॲक्टमध्ये परिवर्तन करुन आपण वेळ वाढवितो आहोत. त्याचा गैरवापर होईल काय,हा प्रश्न माझ्यासमोर आहे. लोकांची सोय होईल हे मान्य आहे. परंतु बाहेर सगळया ठिकाणी हायकोर्ट बंधने घालते. सार्वजनिक सभा चालवायची असेल तर रात्रौ 10 च्या पुढे सभा चालवायची नाही, असे हायकोर्ट सांगते. आपण रात्रौ 9-30 पर्यन्त परवानगी दिली. उद्या रात्रौ या महिला घरी जायला निघाल्यानंतर त्यांच्या संरक्षणाची व्यवस्था कोण करणार आहे ? पुरुषांचा प्रश्न निराळा आहे. तीन पाळयांमध्ये कारखान्यांमध्ये काम चालते, हे मान्य आहे. परंतु महिलांना रात्री 8-30 नंतर कामावर बोलाविण्यात येऊ नये, अशाप्रकारची आपल्या सगळया व्यवस्थेमध्ये व्यवस्था असतानासुध्दा आपण ही नवीन तरतूद करतो आहोत, तेव्हा त्या महिलांच्या संरक्षणाचा विचार केलेला आहे काय ? इतर जे तुम्ही दंडाच्या रक्कमेमध्ये 1 हजार वाढवीत आहोत, या सगळया तरतुदी ठीक आहेत. परिस्थिती बदलेल तशा या तरतुदी बदलण्याची आवश्यकता आहे. जुन्या तरतुदी तशाच ठेवून कारभार चालवावा असे आमचे मत नाही, माझा जो संदर्भ आहे, त्याबाबत उद्देश आणि कारणे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे चालू...

तपासून पाहिली तर "वाणिज्यिक आस्थापनांसाठी, बंद करण्याची वेळी रात्री 8-30 वरुन रात्री 9-30 पर्यन्त वाढविणे"..असे म्हटलेले आहे. याचे कारण काय? याबाबतचे स्पष्टीकरण करताना सांगितले आहे की, अनेक व्यापाऱ्यांकडून अशाप्रकारची मागणी आली, ही मागणी व्यापाऱ्यांकडून आली, पण ती आपण तपासून पाहिली आहे काय ? त्यांनी अशाप्रकारची मागणी केली असेल तर व्यापाऱ्यांनी अशाप्रकारे महिलांना संरक्षण देण्याबाबतची व्यवस्था केलेली आहे काय ? "महिला कर्मचाऱ्यांना रात्री 9-30 पर्यन्त काम करण्याची मुभा देणे, आणि अतिकालिक कामाच्या तासांची कमाल मर्यादा तीन तास इतकी करण्यासाठी आणि परिणामस्वरुप तरतूद व उक्त अतिकालिक तासानंतरच्या कामाच्या प्रयोजनासाठी अतिरिक्त कर्मचारी नेमण्यासाठी तरतूद करणे, अधिनियमाच्या तरतुदींना भंग करणाऱ्या घटनांना पायबंद घालण्याच्यादृष्टीने आणि तरतुदींची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने, त्यांचा भंग केल्याच्या बाबतीतली शास्ती वाढविण्याचेही प्रस्तावित केले आहे", असे म्हटलेले आहे. जर अशा घटनांचा भंग झाला तर त्यावर कोणत्या प्रकारची उपाययोजना करण्यात येणार आहे, त्याचेदेखील आपण स्पष्टीकरण करायला पाहिजे. आपल्याला कल्पना आहे की, आज कोणतेही दुकान रात्री 8-30 ला बंद होत नाही. शेवटी इन्स्पेक्टरचे स्कॉड येते. त्यामध्ये त्यांना पैसे कमविण्यासाठी आणखी एक रान मिळते, अशी परिस्थिती निर्माण होते. यावर उपाय करण्यासाठी खरोखरच गांभीर्याने उपाययोजना करुन या गोष्टकडे शासन लक्ष देणार आहे काय, हा त्यातील महत्वाचा प्रश्न आहे. कायद्याने सवलत द्यायला हरकत नाही. या सवलतींचा दुरुपयोग होणार नाही याची काळजी कोण घेणार आहे ? शासनाचे इन्स्पेक्टरचे राज असल्याचे बाहेर आपण म्हणतो. शॉप ॲन्ड एस्टॅब्लिशमेटखाली ज्या ज्या इन्स्पेक्टरांना नियुक्त केलेले आहे, त्या नियुक्तीवरुन भ्रष्टाचाराचे मार्ग उपलब्ध होतात. आपल्याला कल्पना आहे की, सध्या जे डान्सबार चाललेले आहेत. डान्सबारच्याबाबतीत सरकार हतबल झालेले आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी मुंबई शहरातील महिलांच्याबाबतीत मुद्दा उपस्थित केला. महिलांवर अत्याचार व्हावे, महिलांना त्रास दिला जावा,त्यांच्यावर फुगे मारले जावेत हे सगळे मान्य..

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

पण शेवटी महिलाच जर अशा मार्गाने पुढे जात असतील तर त्याच्यावर इजाल काय ! हा प्रश्न पुढे उभा रहातो. या दृष्टीने शासनाने जी काही पावले उचलावयाची आहेत, ती चांगला परिणाम करुन, चांगला रीझल्टस घेण्यासाठी उपाययोजना करावी, त्याचा दुरुपयोग होणार नाही, यासाठी शासन कोणती दक्षता घेणार आहे, याच्या विषयीचा खुलासा केला तर मी आपल्याला धन्यवाद देईन.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MHM/ प्रथम श्री.किल्लेदार... 14:50

श्री. दिवाकर रावते ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, या ठिकाणी जे बिल आलेले आहे,त्याबाबतीत एक आनंद एवढया करिता झाला की, मुंबईमध्ये जे चालले आहे, त्याबाबतीत या बिलामुळे नियमितता येणार आहे. पहिल्यांदा आम्हाला उगाचच संशय आला की, दारुच्या दुकारनदारांनी वेळ वाढवून मागितली, ती वेळ त्यांना वाढवून देण्यात येणार आहे की काय? पण तसे यामध्ये काही नाही. आनंद एवढयाचकरिता झाला की, यापूर्वीचे जे सन्माननीय मंत्री होते त्यांना श्री. अण्णा हजारेंच्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणामध्ये जावे लागले. त्यामुळे तो चार्ज आता सन्माननीय मंत्रिमहोदेयांकडे आलेला आहे. तो अतिरिक्त भार आलेला आहे.आता अतिरक्त म्हणता येणार नाही. तो अधिकृत भार आलेला आहे. दारुबंदीकडे आणि दारुच्या प्रकरणाकडे श्री. अण्णा हजारे यांनी लक्ष न घातल्यामुळे आताही त्यांच्या शेजारी दारु विकली जाते. त्यांनी याबाबतीमध्ये लक्ष घातले तर यांचेही नांव येईल.

**उपसभापती**: श्री. अण्णा हजारेंच्या गुड बुकमध्ये त्यांचे नांव घेतले असावे.

श्री. दिवाकर रावते :सभापती महोदय, आगोदरच्या मंत्र्यांना सत्तेत आल्या आल्या असे वाटले की, मला मुंबई शहरहाचे अधिराज्य मिळाले आहे, अमुक आणि तमूक मिळालेले आहे. म्हणून त्यांनी घोषणा केली होती व रात्रभर दुकाने चालू ठेवण्यासाठी त्यांनी प्रेस कॉन्फरन्स वगैरे घेतली होती. आणि दणदण निर्णय घेतला होता. आणि रात्रभर दुकान चालू ठेवणार असे सांगितले होते. त्यामुळे रोजगार वाढेल, अमुक वाढेल, तमुक वाढेल अशा प्रकारे शेख मोहमदीछाप त्यांनी ते दणादण चालू केले होते. त्यामुळे पोटात गोळा आला होता की, या सरकारला न मिळणारी सत्ता त्यांना परत मिळालेली आहे, त्यामुळे हुरळून गेल्या सारखे सत्तेच्या बळावर ते काही तरी निर्णय करतील अशी भिती होती. पण आता हे बिल या ठिकाणी आल्या मुळे ती भिती नष्ट झाली. त्यामुळे या शासनाला धन्यवाद देतो. माननीय मंत्रिमहोदय या बिलाचे उद्देश सांगत असतांना आम्ही त्यांना आग्रह केला की, या बिलात ज्या तरतुदी करण्यात येत आहेत त्या आम्हाला सांगा. माननीय मंत्रिमहोदय, या ठिकाणी भराभर वाचत होते, म्हणून आमच्या ते लक्षात आले नाही. पण आम्हाला एवढेच कळले की, रात्री 8.30 या मजकुराऐवजी रात्री 9.30 केलेले आहे. ठीक आहे. परंतु या बिलाच्या अंतर्गत पान 2. कलम क्रमांक 2 प्रमाणे जो फेरफार वाचावयाचा आहे तो रात्री 8.30 या मजकुराऐवजी रात्री 9.30 हा मजकूर दाखल करण्यात येईल, हे बरोबर आहे. कलम 3 मधील (क) पोटकलम (1) वगळण्यात आलेले आहे. मुळात हे पोटकलम काय आहे? ते ...............

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

वगळण्यात आलेले आहे, त्यामुळे आम्हाला ते कळलेले नाही. त्यासाठी आमच्याकडे मूळ अधिनियमाची प्रत पाहिजे होती. त्यानंतर (ख) पोटकलम (3) मध्ये "रात्री साडे-आठ" हया मजकुराऐवजी "रात्री साडे-नऊ" 9.30 असा मजकूर दाखल करण्यात येईल हे अक्षरी आलेले आहे. सन्माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरामध्ये याचा खुलासा करावा. कलम 4 मध्ये असे म्हटले आहे की, मुख्य अधिनियम कलम 52 मध्ये "पन्नास रुपयापेक्षा" या मजकुराऐवजी "एक हजार रुपयापेक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.. (ख) मध्ये "पाचशे रुपयापर्यंत" या मजकुराऐवजी "पाच हजार रुपयापर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल. त्यानंतर पुढचे कलम 5,कलम 6,कलम 7, कलम 8, कलम 9 हया सगळया कलमांमध्ये पूर्वीच्या रकमेमध्ये किती वाढ केलेली आहे, हे सांगितलेले आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, सन 1948 चा मुंबई अधिनियम, 79 याच्या कलम 56 ची सुधारणा. मुंबई अधिनियम 79 याच्या कलम 63 ची सुधारणा. मुंबई अधिनियम 79 याच्या कलम 57 ची सुधारणा म्हणजे हे नक्की काय आहे? हा पैशाचा फेरफार केला म्हणजे तो कशासाठी केलेला आहे? याचा खुलासा मंत्रिमहोदयांच्या खुलाशामध्ये नव्हता. त्यामुळे येथे फक्त रक्कम 1000 रुपयाची 5000 झाली एवढेच समजते. रक्कम 150 रुपयाचे 7000 झाले एवढे समजते. बाजूला कायद्याच्या भाषेत लिहिलेले आहे की, सन 1948 मुंबई अधिनियम क्रमांक 79 च्या कलम 56 ची सुधारणा, याबाबतीत आम्हाला सांगितले असते तर आम्हाला ते लगेच कळले असते. मंत्रिमहोदयांनी या सुधारणा मांडत असतांना ते कलम 56 काय आहे, कलम 57 काय आहे, कलम 63 काय आहे, कलम 55 काय आहे, कलम 54 काय आहे? म्हणजे अधिनियम क्रमांक 79 चे कलम 53 काय आहे, कलम 52 काय आहे, याचे जरा विश्लेषण केले असते तर हे बिल आम्हाला समजले असते. त्यामुळे आता नक्की रक्कम दंडाची वाढली आहे कां पगाराची वाढली आहे हे कळत नाही. त्यामुळे याचा खुलासा केला असता तर जास्तीचे बरे

झाले असते. एवढेच मला सांगावयाचे आहे. आगोदरच्या मंत्रिमहोदयांनी मुंबईत रात्रभर धुमाकूळ घालण्याचे ठरविले होते ते आता रात्री 9.30 वाजता बंद होणार आहे. त्याबद्दल धन्यवाद.

यानंतर श्री. बरवड..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या विधेयकावर बोलत असताना माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी उद्दिष्टे सांगितली. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे मूळ कायदा काय आहे हे जोपर्यन्त आम्हाला कळत नाही तोपर्यन्त यामध्ये काय सुधारणा करीत आहात हे कळणार नाही. मालकाने व व्यवस्थापनाने केलेल्या खोटया नोंदी याबाबतीत आपण स्पष्टीकरण दिले त्यावरुन याची कल्पना येते. अगोदरच्या अपराध सिध्दीनंतर वाढविलेली शास्ती, निरीक्षकास अडथळे करण्याबाबत शास्ती याबाबतीत जसा मूळ कायद्यामध्ये खुलासा केलेला आहे तसा खुलासा होणे आवश्यक होते असे मला वाटते. सभापती महोदय, याचा फायदा संपूर्ण महाराष्ट्रामध्ये जी लहान दुकाने आहेत त्यांना होणार आहे. परंतु नाण्याच्या जशा दोन बाजू असतात त्याप्रमाणे सुक्याबरोबर ओलेही जळू शकते. एक विशिष्ट हेतू डोळयासमोर ठेऊन हे सुधारणा विधेयक आणले आहे. या विधेयकाचे स्वागत करीत असताना सांगू इच्छितो की, आतापर्यन्त लहान लहान दुकानदारांना महापालिकेचे अधिक्षक जशा प्रकारे त्रास देत होते किंवा पोलीसांकडून जो त्रास होत होता त्याला आळा घालण्याच्या दृष्टीने हे चांगले विधेयक आहे असे मला वाटते. ज्यावेळेला महाराष्ट्रामध्ये निरनिराळे सण येतात त्यावेळी मुंबई दुकाने व आस्थापना ॲक्टमध्ये आपण दहा ते साडेदहा वाजेपर्यन्त मतुभा देत असतो. आता आपण ही तरतूद कायम स्वरुपी केल्यामुळे खऱ्या अर्थाने दुकानदारांना त्याचा फायदा होईल. परंतु मला एका बाबतीत माननीय मंत्रिमहोदयांना विचारावयाचे आहे. यामध्ये असे म्हटले आहे की, " अतिकालिक काम करण्याची कमाल मर्यादा तीन तासांपेक्षा अधिक नसेल आणि मालकाला, उक्त अतिकालिक तासांपेक्षा अधिक तास काम करण्यासाठी, अधिक संख्येने कर्मचारी नेमला येतील." हे शुध्द मराठी आहे. याचा अर्थ कळण्यासाठी इंग्रजी बिल बघावे लागते आणि नक्की काय म्हणावयाचे आहे ते त्यात कळते. जास्तीचे तीन तास असतील तर ओव्हरटाईम द्यावा लागेल किंवा त्यापेक्षा जास्त तास काम असेल तर अतिरिक्त कर्मचारी नेमता येतील. यामध्ये बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन द्यावयाचा आहे असे मला वाटते. एकीकडे आपण म्हणत आहात की, ओव्हर टाईम देऊ शकतात आणि दुसरीकडे आपण अतिरिक्त कर्मचारी वाढवू शकता असेही म्हटले आहे. यामध्ये एकच काही तरी ठेवावे. त्या ठिकाणी जो कायम स्वरुपी कर्मचारी आहे त्याला दोन पैसे जास्त मिळू शकतील.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट ...

आपण अतिरिक्त कर्मचारी नेमण्याबाबत म्हणत आहात पण ज्यावेळी कर्मचारी नेमतो त्यावेळी मग त्यांच्या ग्रॅच्युईटीची बाब, त्यांच्या प्राव्हीडंट फंडाची बाब अशा बाबी येतील. आपण मालकवर्गाला ऑप्शन दिल्यानंतर ते त्या ठिकाणी ओव्हर टाईम देतील. याबाबतीत सुध्दा अधिक खुलासा करणे आवश्यक आहे असे मला वाटते. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/ MHM/ SBT

प्रा. जोगेंद्र कवाडे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेमध्ये बाब क्रमांक 6 मध्ये सन 2004 चे वि. प. वि. क्रमांक 29 हे नागपूर शहर महानगरपालिकेच्या संदर्भात दाखविले आहे. आमच्याकडे जे विधेयक आलेले आहे ते चुकीचे आहे. ते मुंबई महानगरपालिकेचे बिल आहे. या ठिकाणी चुकीने नागपूर लिहिण्यात आले आहे असे मला वाटते. सभापती महोदय, मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, 1948 यामध्ये सुधारणा करण्यासाठी सन 2004 चे वि. प. वि. क्रमांक- 3 हे जे विधेयक या ठिकाणी मांडण्यात आले आहे त्याचे स्वागत करण्यासाठी मी उभा आहे. मी शासनाला आणि माननीय मंत्रिमहोदयांना धन्यवाद देतो. आधीच्या कायद्यामध्ये साडेआठ वाजेपर्यन्तची वेळ असली तरी साडेनऊ ते दहा वाजेपर्यन्त दुकाने सुरु राहावयाची. जुन्या कायद्याचा आधार घेऊन संबंधित यंत्रणा, मुंबई महापालिकेची यंत्रणा व्यावसायिकांकडून आणि दुकानदारांकडून खंडणी वसूल करण्याचे काम करीत होती. ही वेळ साडेआठ वरुन साडेनऊ पर्यन्त वाढविल्यामुळे या गोष्टीला पायबंद बसेल, आळा बसेल तसेच दुकानदारांचा आणि ग्राहकांचा देखील फायदा होईल. काही सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी एक मुद्दा उपस्थित केला. जे सामाजिक सण असतात मग दिवाळी असेल, दसरा असेल, ईद असेल, धम्मचक्र प्रवर्तन दिन असेल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती असेल, शाहू महाराजांची जयंती असेल, महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती असेल, शिवजयंती असेल अशा सणांच्या दिवशी तसेच 26 जानेवारी, 15 ऑगस्ट अशा राष्ट्रीय सणांच्या दिवशी साडेनऊ पेक्षा अधिक वेळ दुकाने उघडी ठेवावी लागत असतील तर ती सूट देण्याच्या दृष्टीने सहानुभुतीने विचार करणे आवश्यक आहे. खरे पाहिले तर त्या ठिकाणी महिला कर्मचाऱ्यांची सोय पाहिली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी अत्यंत महत्वाचा मुद्दा उपस्थित केला. आपण महिला कर्मचाऱ्यांच्या सोयीसाठी हे केले आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे....

या बिलामध्ये महिलांचा भाग देखील आहे. आज अनेक ठिकाणी डान्सबार चालतात. हे बार रात्री 12-12 वाजेपर्यंत चालू असतात, त्यामध्ये पोरीबाळी नाचलत असतात. त्यांच्याबाबत काही सुधारणा करणार आहात काय ? हया डान्सबार संस्कृतिमुळे शाळा कॉलेजमधील विद्यार्थी बहमत चालले आहेत. आजच मा.सदस्य श्री.संजय दत्त यांनी चेंबूर येथील महाविद्यालयातील एका विद्यार्थ्याने आपल्याच महाविद्यालयातील विद्यार्थीनीवर ॲसिड फेकल्याची घटना घडल्याचे सांगितले आहे. म्हणून हया डान्सबार्सना या कक्षेमध्ये आणता येईल काय याचाही शासनाने विचार करावा. या दुरुस्तीनुसार रात्री 9.30 पर्यंत दुकाने बंद करण्यात येणार आहेत. या सुधाणेचे स्वागत करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

-----

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ KGS/ MAP/ SBT/

डॉ.दीपक सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी या विधेयकावर आपले विचार मांडलेले आहेत. मी केवळ 2-3 मुद्देच मांडणार आहे. या विधेयकानुसार रात्री 9.30 वाजता दुकाने बंद करण्याची वेळ निश्चित केलेली आहे. आज मॉल किंवा इतर आस्थापना असतील त्या आजही रात्री 9.30 ते 9.45 वाजता बंद होतात. आता नवीन वेळेनुसार रात्री 9.30 ऐवजी 10.30 वा. ही दुकाने बंद होणार नाहीत याची शाश्वती आहे का ? याच्यातून इन्सपेक्टर राज सुरु होईल आणि आपण यामधून बाहेर पडावयाचे आहे असे म्हणत असलो तरी हे दुष्टचक्र सुरु होईल. वास्तविक शासनाने ही वेळ रात्री 10 वाजेपर्यंत ठेवली पाहिजे होती. त्यामुळे रात्री 11 नंतरची वेळ कव्हर होईल. मुळात हे बिल कॉल सेंटरसाठी केलेले आहे असे वाटते. कारण आज मुंबईमध्ये कॉल सेंटर्सची संस्कृती मोठया प्रमाणात वाढत आहे. त्या सेंटर्समध्ये सकाळी 5 वाजेपर्यंत मुली काम करीत असतात. त्या मुलींना स्पेशल गाडया घेऊन त्यांच्या घरी सोडतात. या कॉल सेंटर्सबाबत शासनाची भूमिका काय राहणार आहे, शासन त्यांना संरक्षण देणार आहे काय हे सांगितले पाहिजे. कॉल सेंटरमध्ये काम करणा-या मुलींच्या पालकांना चिंता वाटत असते की, आपली मुलगी केव्हा घरी येईल ? या कॉल सेंटर्सच्या नावाखाली काय धंदे चालतात हे आपण जर त्यांना घेऊन येणा-या गाडीतून डोकावून पाहिले तर आपल्याला दिसून येईल. तेथे काम करणारा मुलगा असो वा मुलगी असो त्यांच्याबाबतीत आई-बाबांना चिंता असते. म्हणून यांच्यावर बंधन घालणार आहे की त्यांना नियमित करणार आहे ते सांगावे. त्याचप्रमाणे रात्री 9.30 नंतर लोकलमधून हया मुली घरी येत असताना अतिप्रसंगाचे वा बलात्काराचे किंवा छेडछाडीचे प्रकार चालतात त्याला पायबंद कसा घालणार हे देखील मंत्रिमहोदयांनी स्पष्ट करावे एवढेच यानिमित्ताने मी बोलतो आणि भाषण थांबवितो.

-----

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ KGS/ MAP/ SBT/

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, हे विधेयक मांडण्यामागचा शासनाचा उद्देश निश्चितच स्तुत्य आहे. मा.सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी मांडलेल्या एका मुद्याशी मी सहमत आहे. रात्री 9.30 पर्यंतची वेळ निश्चित केली आहे. याचा अर्थ त्या दुकानाचा मुख्य दरवाजा 9.30 वाजता बंद होणार आहे. त्याच्यानंतर दुकानातील इतर जी कामे असतात ती चालू राहतील. आज डिपार्टमेंटल स्टोअर्स असतील वा मॉल असतील रात्री 9.30 वाजता बंद झाल्यावर त्यांच्यानंतर आणखी एक तासाने त्यात वाढ होणार आहे. याचा अर्थ ग्राहकांना 9.30 वाजता मुख्य दरवाजा बंद होणार आहे. परंतु यासंबंधी स्प्ष्टीकरण होणे आवश्यक आहे. ही वेळ रात्री 10 वाजेपर्यंत करण्यास हरकत नव्हती. याठिकाणी कॉल सेंटर्सबद्दल बोलले गेले आहे. हा दुकानाचा विषय होऊ शकत नाही. कारण हया कॉल सेंटर्सचे काम राऊंडअप पध्दतीने चालू असते.

नंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत पुढे सुरु...)

कॉल सेंटर्स ही वेगळ्या कामासाठी निर्माण झालेली संस्था आहे. ही कॉल सेंटर्स म्हणजे आऊटसोर्सिंग सारखा प्रकार आहे. अमेरिकेत दिवसा जे काम केले जाते ते रात्रीपर्यन्त त्यांना पूर्ण करुन हवे असते. सुदैवाने अमेरिकेमध्ये जेव्हा दिवस असतो त्यावेळी आपल्याकडे रात्र असते. म्हणून तिकडचे सर्व काम आऊट सोर्सिंद्वारे आपल्याकडे येते. आपण ते दिवसभरात पूर्ण करुन देतो. तेथील डॉक्टरांकडील सबंध डाटा कॉल सेंटरवर येतो. तो डाटा तयार करुन दुस-या दिवशी जेव्हा अमेरिकेमध्ये दिवस असतो त्यावेळी त्यांना तो तयार मिळतो. असे कॉल सेंटरचे काम आहे. काही कॉल सेंटरचे काम हे पूर्वी जसे ट्रंक कॉलचे काम होते तशा पध्दतीचे आहे. त्यामध्ये इन्क्वायरीचेही काम आहे. ती राऊण्ड दी क्लॉक चालणारी व्यवस्था आहे. त्याच्याशी या बिलाचा काहीही संबंध नाही.

मला या विधेयकाच्या संदर्भात सांगायचे आहे की, आपण वेळ वाढविण्याची चांगली गोष्ट केलेली आहे. शेवटी कोणाला तरी ब्लॅकमेलिंग करण्याचा उपद्व्याप करायला वाव मिळतो. 8.30 वाजता दुकाने बंद होऊ शकत नाहीत. किंबहुना मुंबईसारख्या शहरामध्ये अधिक वेळ वाढविण्याची गरज आहे. परदेशातील मॉल सेंटर्स् राऊण्ड दी क्लॉक चालतात. तशी ती आपल्याकडे चालतील की नाही ही शंका आहे. तरीही वेळ वाढवून आपण थोडासा दिलासा दिलेला आहे. मात्र यामधून काही वाईट होणार नाही याची दक्षता घेण्याची गरज आहे. मा.सदस्य श्री. विलास अवचट साहेबांनी ओव्हर टाईमच्या बाबतीत जे सांगितले तेथे खरी ग्यानबाची मेख आहे. तीन तास ओव्हर टाईम करायला आपण परवानगी दिलेली आहे. कामाची वेळ जर 8.30 ते 8.30 अशी असेल तर 12 तास ही कामाची वेळ झाली. त्यामध्ये आणखीन एक तास वाढवला म्हणजे ती कामाची वेळ 13 तासाची होईल. मध्ये लन्च टाईम असतो की नाही याची मला कल्पना नाही. परंतु एकूण कामाचे तास किती ? कामाची वेळ 13 तास असेल आणि ओव्हर टाईम 3 तास असेल तर कामाची वेळ 16 तास होईल. मग 8.30 नंतर 3 तास की 9.30 नंतर 3 तास असा त्याचा अर्थ करायचा काय? त्यांच्या कामाची वेळ मुळात 8.30 ते 5.30 आहे आणि त्यानंतर त्यांना 3 तास काम करावे लागणार आहे काय ? कोणत्याही दुकानामध्ये अगदी सेक्युरिटीमध्येही 12 तासाची ड्युटी आहे. म्हणून कामाच्या तासाचा विचार आपण केलेला आहे काय ? कामाची वेळ 12 तासाची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/

(श्री. अरविंद सावंत पुढे सुरु....)

असेल तर मग ओव्हर टाईमचे तीन तास धरुन एकूण 15 तास काम करणार काय ? त्यासाठी अतिकालिक भत्ता देणार काय ? देणार असाल तर त्याचा दर काय असेल ? बेसिकली कामच खूप अधिक आहे. त्यामुळे तीन तासापेक्षा अधिक ओव्हर टाईम देऊ नये, त्याऐवजी नवीन एम्प्लॉयमेंट करावी, असा जो उद्देश आहे तो फार चांगला आहे. मुळात कामाचे तास किती असावेत यासंबंधी कोठे बंधन असल्याचे विधेयकामध्ये दिसत नाही. 12-12 तास काम करावे लागते याचा माननीय मंत्रिमहोदयांनी विचार करावा एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/

श्री. गणेश नाईक (पर्यावरण, उत्पादन शुल्क व कामगार मंत्री ) : सभापती महोदय, मा.सदस्य श्री. मधुकर सरपोतद्दारसाहेबांनी या विधेयकाच्या अनुषंगाने महिलांचे संरक्षण या विषयी गांभीर्याने आपली भूमिका मांडली आहे. त्यांनी राज्यामध्ये महिलांवर होणा-या अत्याचारांचा, बलात्कारांचा उल्लेख केला. सभापती महोदय, कॉल सेंटर हा आयटी अंतर्गत येणारा विषय आहे. केन्द्र सरकारच्या कायद्याप्रमाणे कॉल सेंटरच्या ठिकाणी काम करणा-या सर्व घटकांना मग त्या महिला असोत वा पुरुष असोत त्यांना प्रत्येक दिवसाचे 24 तास या प्रमाणे आठवड्याचे आठ दिवस आणि 12 महिन्याचे 365 दिवस, सूट दिलेली आहे. दुकाने व्यवस्थापन आस्थापना या कायद्यातून त्यांना वगळण्यात आलेले आहे. मा.सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या विधेयकातील आकडेवारीसंबंधी विचारणा केली. मी सांगू इच्छितो की, या नियमांचा जे भंग करतील त्यांना जो दंड करण्यात येईल त्या दंडाच्या रकमा दर्शविलेल्या आहेत. दंडाची रक्कम वाढविलेली आहे. माननीय सदस्य श्री. विलास अवचट यांनी, शासनाची महिलांच्या संरक्षणा विषयीची भूमिका स्पष्ट व्हावी, असे मत व्यक्त केले. मुळात समाजाची मानसिकता बदलण्याची गरज आहे. जसे खेड्यापाड्यांत स्त्रियांवर अत्याचार होतात तसे ते शहरातही होतात, गर्दीच्या ठिकाणी होतात, धावत्या रेल्वेगाड्यांमध्ये होतात. म्हणून कायद्याच्या अंमलबजावणीपेक्षा मानसिकता बदलण्याची गरज आहे. समाजाची मानसिकता बदलण्याच्या संदर्भात आपल्या सारखे जागरुक सन्माननीय सदस्य या सभागृहामध्ये जे विचार मांडतात, जो ऊहापोह येथे होतो त्याची दखल घेऊन प्रशासन त्या त्या सुधारण करीत असते.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक..

सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी नागपूर शहराचा यामध्ये समावेश आहे किंवा नाही असा मुद्दा मांडला. महाराष्ट्रात असलेल्या सर्व कारखान्यांकरिता हे विधेयक आणलेले आहे एवढेच मी या ठिकाणी सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत आणि श्री.अरविंद सावंत यांनी सुरक्षितता आणि कामाचे तास याबाबत आपल्या भाषणात उल्लेख केला . डॉ.दीपक सावंत यांनी जी माहिती दिली ती खरी आहे. आय.टी.मध्ये किंवा कॉल सेंटरमध्ये काम करणा-या महिलांना घरापर्यन्त पोहोचविण्याची जबाबदारी संबंधीत व्यवस्थापनाची आहे. त्या महिलांना संरक्षण देण्याची जबाबदारी देखील त्या त्या व्यवस्थापनाची आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी कामाच्या तासांबाबत येथे उल्लेख केला. कामाच्या ठिकाणी कामाचे तास आठ एवढेच असतील. त्यापेक्षा जास्त असत नाही. आठ तासाच्या वर जर काम केले असेल तर त्या कर्मचा-यास दुप्पट पगार संबंधीत व्यवस्थापनाकडून दिला जातो. म्हणजेच आठ तासानंतर आठ तास ओव्हर टाईम, बारा तासानंतर बारा तास ओव्हर टाईम अशा प्रकारचे त्या ठिकाणी कामाचे व्यवस्थापन असते. कर्मचारी 16-16 तास, 18-18 तास काम करु शकत नाही. एकूण या सर्व बाबींच्या बाबतीत आपण जागरुक आहात...

श्री.विलास अवचट : या ठिकाणी आपण वेळेची मर्यादा काय ठेवली आहे ?

श्री. गणेश नाईक : ग्राहकांना रात्रौ 9.30 नंतर त्या ठिकाणी येणे बंद होणार आहे. तसेच महिला कर्मचा-यांना सुध्दा त्या ठिकाणी मनाई असणार आहे. दुकान बंद करण्यासाठी साधारणत: अर्धा-तास विलंब होऊ शकतो असे ग्राहय धरलेले आहे. परंतु त्या कालावधीत दुकानात महिला कर्मचारी राहू शकत नाही हा त्यामागचा उद्देश आहे...

डॉ. दीपक सावंत : ब-याच शॉपींग मॉल्समध्ये 90 टक्के महिला कर्मचारी काम करीत असतात. मग ते ज्वेलरी शॉप असेल, कपडयाचे दुकान असेल, ब्युटीक असेल, त्या ठिकाणी 90 टक्के महिला कर्मचारी काम करीत असतात. या ठिकाणी मा. मंत्री महोदयांनी जो नियम सांगितला आहे, तो कशा पध्दतीने अवलंबिला जाणार आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री. गणेश नाईक : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, पंचतारांकित हॉटेल्स्ना हा नियम लागू नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जी भावना व्यक्त केली त्या भावनेशी मी सहमत आहे. कायद्याची अंमलबजावणी करणारे घटक त्या ठिकाणी दुर्लक्ष करतात. आपण जे सांगितलेले आहे त्याच्याशी मी असहमत आहे अशातला भाग नाही. सध्या जी कार्यपध्दती सुरु आहे, त्यामध्ये काही बदल व्हावेत म्हणून आपण सदनामध्ये चर्चा करीत असतो. त्या पध्दती बदलण्याच्या अनुषंगाने शासन कटिबद्ध आहे. सदर विधेयक सभागृहाने संमत करावे अशी मी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 10 (दोन्ही संम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. गणेश नाईक : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक-3 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 3 संमत झाले आहे.

------------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी. : नागपूर शहर महानगरपालिका (सुधारणा)विधेयक.**

**L.C. BILL NO. XXIX OF 2004.**

**( A BILL FURTHER TO AMEND THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT,1948.)**

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 29- नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम,1948 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, नागपूर महानगरपालिकेमध्ये अधिनियम 49 च्या विद्यमान तरतुदी आहेत. परंतु एखादा अनधिकृत भोगवटादार असेल तर त्यास काढून टाकण्याची तरतूद यामध्ये नाही. मुंबई महानगरपालिकेचा अधिनियम आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिकेचा अधिनियम या दोन्हीही अधिनियमामध्ये ही तरतूद आहे. परंतु नागपूर महानगरपालिकेच्या अधिनियमात अनधिकृत भोगवटादारास काढून टाकण्याची तरतूद नव्हती. अनधिकृत भोगवटादारास काढून टाकण्यासंबंधीचे अधिकार महापालिका आयुक्तांना देण्यात यावे म्हणून हे विधेयक सभागृहासमोर मांडण्यात आलेले आहे.

यानंतर श्री. उपरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 29 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 29 संमत झाले आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SDU/ KGS/ MAP/

.

**पृ.शी.**: शासकीय सेवेमध्ये विविध गटांतील व्यक्तींना सामावून घेणे.
**मु.शी.**: शासकीय सेवेमध्ये विविध गटांतील व्यक्तींना सामावून घेण्याविषयी प्रा.शरद पाटील यांनी दिलेली अर्धा-तास चर्चा.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित.)

------

**पृ.शी.**: देशी दारु व बेकायदा दारुविरुध्द आलेल्या तक्रारीवर करावयाची कारवाई.
**मु.शी.**: देशी दारु व बेकायदा दारुविरुध्द आलेल्या तक्रारीवर करावयाची कारवाई यासंबंधी प्रा.शरद पाटील यांनी दिलेली अर्धा-तास चर्चा.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित.)

------

**पृ.शी.**: केंद्र शासनाच्या सन 1972 मधील कायद्यातील तरतुदीबाबत.

**मु.शी.**: केंद्र शासनाच्या सन 1972 मधील कायद्यातील तरतुदीसंबंधी डॉ.अशोक मोडक यांनी दिलेली अर्धा-तास चर्चा.

**उप सभापती** : ही अर्धातास चर्चा पुढील आठवड्यात घेण्यात येणार आहे.

डॉ.अशोक मोडक : मी सन्माननीय मंत्री श्री.रविशेट पाटील यांनी पुढील आठवड्यात ही अर्धा-तास चर्चा घेण्यास माझी हरकत नाही असे म्हटले आहे. पण अर्धा-तास चर्चेसाठी आठवड्यातील दोन दिवस असतात. ते दिवस म्हणजे मंगळवार आणि गुरुवार हे होय. मंगळवारी प्रश्नाच्या संदर्भातील अर्धा-तास चर्चा घेण्यात येतात. परंतु माझी अर्धा तास चर्चा प्रश्नाच्या संदर्भात नसली तरी ती मंगळवारी घेण्यात यावी. तसे केले तर मला बरे वाटेल.

**उप सभापती** : तुम्हांला जे आवडेल ते मी करीन. तरी ही अर्धा-तास चर्चा पुढील आठवड्यात घेण्यात येईल.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SDU/ KGS/ MAP/

**पृ.शी.**: विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांना वेळेवर वेतन न मिळणे.

**मु.शी.**: विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांना वेळेवर वेतन न मिळण्यासंबंधी श्री.रामनाथ मोते यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"राज्यातील अनेक विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांना वेळेवर वेतन न मिळणे, तसेच शिक्षकांची नियुक्ती करताना शासनाची मान्यता न घेणे, आपल्या मर्जीप्रमाणे तुकड्या निश्चित करणे, सन 1981 च्या नियमावलीतील तरतुदींचे पालन न करणे, त्यामुळे विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांवर होत असलेला अन्याय, या बाबींकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी शिक्षकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

सभापती महोदय, या ठिकाणी शिक्षण क्षेत्रातील एका महत्वाच्या विषयावर अर्धा-तासाची चर्चा उपस्थित करण्याला मला संधी दिली त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. शिक्षण क्षेत्रातील एका मुलभूत प्रश्नाकडे मी या चर्चेतून शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण विभागामध्ये सध्या तीन प्रकारच्या शाळा कार्यरत आहेत. त्या म्हणजे अनुदानित शाळा, विना अनुदानित शाळा आणि कायम विनाअनुदानित शाळा होय. मी जो विषय मांडणार आहे तो फक्त विना अनुदानित शाळा आणि कायम विना अनुदानित शाळा यासंदर्भातच मी माझे विचार आणि समस्या या ठिकाणी व्यक्त करणार आहे. सगळ्यात महत्वाचा मुद्दा असा आहे की, अनुदानित शाळांना महाराष्ट्र खाजगी शाळा सेवाशर्ती नियमयावली 1981 च्या नियम क्रमांक 9 अन्वये आरक्षणाची तरतुद लागू आहे. विना अनुदानित शाळांना मात्र अशा प्रकारची आरक्षणाची तरतुद लागू असल्याबाबतचे शिक्षण विभागाचे म्हणणे आहे. परंतु कोकण विभाग आयुक्तांच्या कार्यालयातील मागास वर्गीय कक्ष आहे त्यांच्या म्हणण्यानुसार विनाअनुदानित शाळांना रोस्टर लागू नाही, आरक्षण लागू नाही आणि त्यामुळे या शिक्षकांच्या नेमणुका केल्यानंतर शासनाकडून मान्यता घेताना या शिक्षकांच्या मान्यतेबाबत फार गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)**

(यानंतर श्री.गायकवाड)

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते..

त्या संदर्भात शासनाने आपली भूमिका स्पष्ट करणे अत्यंत आवश्यक आहे.अनुदानित शाळांमध्ये शिक्षकाच्या नेमणूका झाल्यानंतर शिक्षण खात्याकडून त्यांना वेतन मिळणार असल्यामुळे त्या शिक्षकांची मान्यता घेणे बंधनकारक केलेले आहे.पण विना अनुदानित शाळांमध्ये नेमणूका झाल्यानंतर मान्यता घेतली जात नाही. 1981 च्या नियमावली मधील नियम तसेच 1977 च्या कायद्यातील तरतुदी अनुदानित आणि विना अनुदानित शाळांना जशाच्या तशा लागू आहेत. परंतु त्याप्रमाणे प्रत्यक्षात होत नाही. आज अनुदानित शाळां मधील शिक्षकांसाठी मान्यता घेतली जाते परंतु विना अनुदानित शाळांमधील शिक्षकांची मान्यता वर्षानुवर्षे घेतली जात नाही.
शिक्षण विभागसुध्दा शिक्षकांना मान्यता देण्याच्या बाबतीत तितकासा सतर्क नाही.अनेक वर्षे या शिक्षकांना मान्यता मिळत नाही. ज्यावेळेस विना अनुदानित शाळा टप्याटप्याने अनुदानावर येतात त्यावेळी मात्र अनेक वर्षे सेवा केलेल्या या शिक्षकांचा गंभीर प्रश्न निर्माण होतो म्हणून या विना अनुदानित शाळांमध्ये काम करणा-या शिक्षकांच्या बाबतीत सुध्दा अनुदानित शाळांप्रमाणे शिक्षणाधिका-यांकडून संच मान्यता घेणे किंवा वैयक्तिक मान्यता घेणे हे कायम स्वरुपी बंधनकारक करणे अत्यंत गरजेचे आहे.विना अनुदानित शाळेमध्ये काम करणा-या शिक्षकांच्या बाबतीत दुसरा एक पी.एफ.च्या बाबतीत प्रश्न निर्माण होत असतो. विना अनुदानित शाळांमध्ये काम करणा-या शिक्षकांच्या पगारातून त्यांची कॉन्ट्रीब्युशन पी.एफ.मध्ये जमा करावी अशा प्रकारचे बंधन रत्नागिरी जिल्हयात घालण्यात आलेले आहे.हे बंधन फक्त रत्नागिरी जिल्हया पुरतेच मर्यादित आहे .अन्य जिल्हयात अशा प्रकारचे बंधन घालण्यात आल्याची तक्रार नाही. काही वर्षे विना अनुदानित असलेली शाळा नंतर अनुदानित झाल्यानंतर आठ वर्षे वा दहा वर्षे त्या शिक्षकांने विना अनुदानित शाळांमध्ये सेवा केलेली आहे.त्या सेवा कालावधीतील त्याचे पी.एफ.चे कॉन्ट्रीब्युशन मॅनेजमेन्टच्या कॉन्ट्रीब्युशनसह शासनाला भरल्या शिवाय त्या शिक्षकाला वेतन मिळत नाही.तेव्हा याबाबतीत सुध्दा शासनाने आपली भूमिका स्पष्ट करणे आवश्यक आहे.सध्या अनुदानित शाळांचे दोन वर्षातून वा चार वर्षातून एकदा कधी तरी तपासणी होत असते परंतु विना अनुदानित शाळांची मात्र वर्षानुवर्षे तपासणी होत नाही.त्यामुळे या शाळांवर वचक राहिलेला नाही.त्यामुळे शिक्षकांची नेमणूका कशाही पध्दतीने केली जाते. शिक्षकांची मान्यता घेण्याच्या बाबतीत शाळासुध्दा प्रयत्न करीत नाही तसेच विभाग सुध्दा दखल घेत नाही. त्यामुळे विना मान्यतेचे शिक्षक वर्षानुवर्षे काम करीत आहेत.त्यामुळे

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते..

या शाळांमध्ये काम करणा-या शिक्षकांना वेतन मिळते काय ? हा खरा महत्वाचा प्रश्न आहे.विना अनुदानित शाळेमध्ये काम करणा-या शिक्षकांना अजिबात वेतन मिळत नाही.1981 च्या नियमावलीच्या नियम क्रमांक 7 मध्ये स्पष्टपणें असे म्हटलेले आहे की,"शाळा अनुदानित असो वा विनाअनुदानित असो, विनाअनुदानित शाळांमध्ये काम करणा-या कर्मचा-यांना शासकीय नियमाप्रमाणे वेतन देणे त्या संस्थेवर बंधनकारक आहे " असे असतांनासुध्दा विना अनुदानित शाळांमधील शिक्षकांना पगार मिळत नाही.उलट पक्षी शिक्षकांना नोकरी देत असतांनाच नोकरी दिल्याबद्दल शिक्षकांकडून लाख दीड लाख रुपये घेतले जातात .याबाबतीत अनेक पुरावे असून त्या संदर्भात अनेक शिक्षकांच्या तक्रारी आहेत.या शिक्षकांना एक तर वेतन मिळत नाही. अशा वेळी हे शिक्षक पी.एफ.चे कॉन्ट्रीब्युशन कसे भरणार ? त्यामुळे अशा प्रकारे विना अनुदानित शाळांची तपासणी शासन करणार आहे काय ? विना अनुदानित शाळांमध्ये काम करणा-या शिक्षकांना शासन संरक्षण देणार आहे काय ? या शिक्षकांना वेतन दिले जाते किंवा नाही याची पहाणी करणार आहे काय ? ही तपासणी करण्यासाठी शासनाने एखादी यंत्रणा उभी केल्याशिवाय व त्या यंत्रणेने तपासणी केल्या शिवाय, या संस्थांवर शासनाचा वचक असल्याशिवाय या शिक्षकांना न्याय मिळणार नाही. शासनाचा जर या संस्थेवर वचक राहिला तर आज या विना अनुदानित शाळांमधील शिक्षकांना जे उपाशी पोटी काम करावे लागते, स्वत:चे पैसे घालून काम करावे लागते ते काम करावे लागणार नाही.तेव्हा या बाबतीत शासन काय करणार आहे? यासबंधी माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा.सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहे. कायम विना अनुदानित शाळेच्या बाबतीत तो मुद्दा आहे.या शाळांवर कोणत्याही प्रकारचे बंधन नाही.अशा पध्दतीने या शाळा चालविल्या जातात . संस्थेला वाटेल त्या पध्दतीने आणि मॅनेजमेन्टला वाटेल त्या पध्दतीने फी वसूल केली जाते परंतु शिक्षकांना मात्र पगार दिला जात नाही.त्यांचे असे म्हणणे आहे की,आमची संस्था कायम विना अनुदानित आहे.शासनाकडून आम्हाला कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळणार नाही.त्यामुळे आमच्या इच्छेप्रमाणे, आमच्या नियमाप्रमाणे आणि आमच्या मर्जीप्रमाणे आम्ही शाळा चालवू. तेव्हा कायम विना अनुदानित शाळा आपल्या मनाप्रमाणे , आपल्या मर्जी नुसारे जर शाळा चालवित असतील तर त्याबाबतीत शासन गांभीर्याने काही भूमिका घेणार आहे की नाही ?कायम विनाअनुदानित शाळांमध्ये शिक्षकांची मान्यता घेतली

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते..

जात नाही.विद्यार्थी संख्येचे बंधन त्यांच्यावर नाही.त्यांना असे वाटते की ,आमची शाळा कायम विना अनुदानावरील आहे आम्हाला शासनाकडून अनुदान मिळणार नाही. विद्यार्थी संख्येच्या निकषाप्रमाणें ज्या काही तुकडया ठेवावयाच्या आहेत किंवा ज्या तुकडया वाढवावयाच्या आहेत ते निकष त्यांना मान्य नाहीत.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MAP/ KGS/ श्री. गायकवाड नंतर --- 15:25

श्री. मोते ....

आम्ही आमच्या मर्जीने शिक्षक नेमणार आहोत. त्यामुळे आमच्या 70 विद्यार्थ्यांमागे एक तुकडी आहे शासनाच्या नियमानुसार 71 विद्यार्थ्यांपर्यंत एक तुकडी आहे आणि 71 च्या पुढे दुसरी तुकडी मिळते. परंतु या कायम विनाअनुदानित शाळेमध्ये मात्र 40-40, 30-30 विद्यार्थ्यांसाठी तुकड्या केल्या जातात, आपल्या मर्जीप्रमाणे शिक्षक नेमले जातात आणि मग त्यांचा पगार देण्याचा जेव्हा प्रश्न निर्माण होतो त्यावेळेस मात्र या शिक्षकांना तुमच्या पदासाठी मान्यता शासनाची नाही म्हणून सांगितले जाते. प्रत्यक्षात त्यांना नेमताना ते लोक शासनाची मान्यता देखील घेत नाहीत आणि मान्यता मिळालेली नसल्यामुळे या कायम विनाअनुदानित शाळांतील शिक्षकांना केव्हाही घरी बसावे लागते. याचे एक उदाहरण मी आपल्याला सांगेन. एचओसी हायस्कूल, रसायनी या शाळेमध्ये ही परिस्थिती आहे. कारण त्यांना शासनाकडून पगार, अनुदान वगैरे काही घ्यायचे नाहीए. सगळा खर्च कंपनी करते आहे. त्या ठिकाणी शाळा व्यवस्थापनाने 30-30 विद्यार्थ्यांच्या तुकड्या केल्या. त्यासाठी शासनाची मान्यता घेतली नाही वा विभागाची मान्यता घेतली नाही. आपल्या मर्जीनुसार शिक्षकांच्या नेमणुका केल्या. शारीरिक शिक्षण शिक्षकांच्या नेमणुका केल्या, योगाभ्यासासाठी, संगीतासाठी शिक्षकांच्या नेमणुका केल्या. याबाबतीतील शासनाचे कोणतेही निकष त्यांनी पाळलेले नाहीत. जेव्हा या शिक्षकांना पूर्ण पगार देण्याची वेळ आली तेव्हा मात्र ... पाचवा वेतन आयोग आला, त्यापूर्वी चौथा वेतन आयोग आला आणि या वेतन आयोगानुसार त्या शिक्षकांना अधिकचे वेतन देण्याची जेव्हा वेळ आली तेव्हा मात्र शाळा व्यवस्थापनाने शासनाच्या नियमानुसार वा निकषानुसार तुकड्या तयार करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आज माझ्या माहितीप्रमाणे 63 शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी हे एचओसी हायस्कूलच्या बाहेर आहेत, विनावेतन बाहेर आहेत. त्यांना पगार मिळत नाही. त्यांची कुटुंबे उघड्यावर पडली आहेत. तर अशा प्रकारे कायम विना-अनुदानित शाळांमध्ये समस्या निर्माण होणार असतील तर विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित शाळांच्या बाबतीत, अनुदानित शाळांसाठी जे नियम व निकष आहेत, 1981 ची नियमावली आहे, 1977 चा कायदा आहे, हे सारे जशाच्या तसे या शाळांनाही लागू करण्याच्या बाबतीत शासन हा विषय गांभीर्याने घेणार आहे का ? अध्यक्ष महाराज, अनुदानित शाळांचे ऑडिट होते आहे. कोणत्या पध्दतीने तेथे फी गोळा केली जाते ? कोणत्या पध्दतीने खर्च होतो आहे या

..... पीपी 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोते ...

बाबतीत शासन विचार करीत आहे. परंतु विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित शाळांमध्ये खरोखरी त्यांचे ऑडिट होते आहे का ? त्या शाळा पालकांकडून किती पैसे जमा करीत आहेत ? याचे काही ऑडिट आहे काय ? आणि ऑडिट होत असेल तर शासन त्याची चौकशी करते का ? आपल्या विभागाचे अधिकारी तेथे जाऊन त्यांचे ऑडिट पाहतात का ? माझ्या माहितीप्रमाणे हे असे काहीही केले जात नाही. असे कोणत्याही प्रकारचे बंधन वा शासनाचा वचक त्यांच्यावर नसल्यामुळे एक प्रकारची बेबंदशाही या शिक्षण क्षेत्रामध्ये .. विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित शाळांच्या मध्ये निर्माण झालेली आहे याचा शासनाने खरोखरी गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे असे माझे मत आहे. म्हणून मी जे काही मुद्दे या ठिकाणी या अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने मांडले आहेत.. मग ते रोस्टरच्या संदर्भातील असो, शिक्षकांच्या मान्यतेसंदर्भात असो, शासनाच्या निकषांनुसार विद्यार्थी संख्येनुसार तुकड्या निर्माण करण्याची बाब असो, फी च्या बाबतीतील असो, शिक्षकांच्या मान्यतेसंबंधात असो वा इतर सर्वच योजनांच्याबाबतीत असो, एकूणच या विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित शाळांच्या बाबतीत जे नियम अनुदानित शाळांना लागू आहेत, 1977 चा कायदा लागू आहे, तो कायदा आणि त्यातील तरतुदी जशाच्या तशा लागू व्हायला हव्यात आणि त्या लागू केल्या जातात की नाही, त्याची अमलबजावणी होते आहे की नाही, मॅनेजमेंटकडून खरोखरी त्या नियमांचे पालन केले जाते आहे किंवा नाही ? हे शासनाने पाहण्याची नितांत गरज आहे. अन्यथा अशा परिस्थितीत काम करणारे विनावेतन काम करणारे शिक्षक सहकारी कसे त्या ठिकाणी शिक्षण देण्याचे काम करू शकतील, किती प्रामाणिकपणे काम करू शकतील हा प्रश्नच आहे. त्यामुळे अशा प्रकारे होत असलेली पिळवणूक शिक्षण क्षेत्रात आज चालू आहे त्याबाबतचा विषय या चर्चेच्या निमित्ताने शासनासमोर मांडण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. शासनाने या विषयाकडे गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता आहे. तरी शासनाने याबाबतीत योग्य तो विचार करून कार्यवाही करावी अशी विनंती आहे. धन्यवाद.

*****

..... पीपी 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथजी मोते यांनी या सदनामध्ये अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने राज्यातील अनुदानित, विना अनुदानित आणि कायम विनाअनुदानित कशाळांतील अनेक प्रश्न उपस्थित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित शाळांच्या बाबतीत त्यांच्या मनामध्ये थोडा राग आहे असे मला जाणवते आहे. राग अशा अर्थाने की, त्या शाळांतील विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे त्याबद्दलची पोटतिडीक त्यामागे आहे. ....

( यानंतर श्री.जागडे ....क्यूक्यू 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ASJ/ KGS/ MAP/ 15:30

श्री. हसन मुश्रीफ...

सभापती महोदय, या राज्यात तीन प्रकारच्या शाळा आहेत. प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा आणि उच्च माध्यमिक शाळा. अनुदानीत तसेच विना अनुदानीत आणि कायम अनुदानीत अशा प्रकारच्या या शाळा आहेत. प्राथमिक शाळांचा विचार केला तर 4500 अनुदानीत, 800 विना अनुदानीत आणि 200 कायम अनुदानीत शाळा राज्यात आहेत. माध्यमिक शाळांचा विचार केला तर 11851 अनुदानीत, 1800 विना अनुदानीत आणि 2783 कायम विना अनुदानीत शाळा आहेत. उच्च माध्यमिक शाळांचा विचार केला तर 3088 अनुदानीत, 503 विना अनुदानीत आणि 423 कायम अनुदानीत शाळा आहेत. या सर्व शाळांमधून 1981 आणि 1977 च्या नियमांचे काटेखोरपणाने अंमलबजावणी होत आहे. वेळोवेळी योग्य प्रकारच्या ऑर्डर्स होत असतात. शिक्षकांना वेळोवेळी मान्यता दिली जाते. शिक्षकांचा पी. एफ. सुध्दा वेळेवर जमा होत आहे. परंतु माननीय सदस्यांनी असे सांगितले आहे की, विना अनुदानीत आणि कायम विना अनुदानीत शाळा या बाबतचे कोणतेही नियम आणि निकष पाळत नाहीत. सभापती महोदय, 77 आणि 81 चे नियम सर्वच शाळांना लागू आहेत. विना अनुदानीत शाळा निकष पाळत नाहीत तर कायम विना अनुदानीत शाळा कोणत्याही प्रकारचे निकष पाळत नाही. अशी माननीय सदस्यांनी समजून करुन घेतल्याचे दिसून येत आहे. परंतु तसे माननीय सदस्यांनी समजू नये. या बाबत योग्य त्या सूचना काढलेल्या आहेत आणि त्या सूचनांची अंमलबजावणी सर्वच शाळांनी करावी, असे आदेशही देण्यात आले आहेत. 77 आणि 81 च्या नियमांची सर्वच शाळांनी अंमलबजावणी कठोरपणाने करावी, अशा प्रकारचे आदेश पुन्हा दिले जातील. सभापती महोदय, विना अनुदानीत शाळा टप्प्याटप्प्याने अनुदानावर येत असतात. विना अनुदानीत शाळा सातव्या वर्षी 60 टक्के आठव्या वर्षी 70 टक्के आणि नवव्या वर्षी 100 टक्के अनुदानावर येत असतात. कायम विना अनुदानीत शाळांना परवानगी देण्यास जेव्हा सुरुवात झाली, तेव्हापासूनच हा प्रश्न गंभीर बनला आहे. शासनाची आर्थिक परिस्थिती बरोबर नसल्यामुळे 2001 साली हा निर्णय घेण्यात आला होता. ज्यांना शाळा पाहिजे असतील त्यांनी त्या कायम विना अनुदान तत्वावर घ्याव्यात. त्यास शासन परवानगी देईल. परंतु याचा परिणाम असा झाला की, शाळा कोठेही निघाल्या. यामुळे शिक्षणाचा दर्जा घसरावयाला लागला. त्यामुळे ही गंभीर समस्या निर्माण झाली. म्हणून आता उच्च न्यायालयाने या बाबतीत असे आदेश दिले की, या बाबतचा बृहत आराखडा तयार करावा. ज्या सुदृढ संस्था असतील , त्यांचा विचार या बाबत करावा. म्हणून आता याबाबत शासन गंभीरपणाने विचार करीत आहे. या बाबतचा बृहत आराखडा शासन तयार करीत

श्री. हसन मुश्रीफ.....

आहे. ज्या प्रमाणे यू .जी. सी. महाविद्यालयांची तपासणी करते. त्याप्रमाणे माध्यमिक शाळांचे मुल्यमापन करण्याची गरज आहे. शिक्षणाचा दर्जा कसा वाढेल हे पाहण्याची गरज आहे.

( यांनतर श्री. सरफरे...

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ....

त्यादृष्टीने शिक्षणाचा दर्जा उंचावला पाहिजे आणि संस्था चालकांना सुध्दा लगाम बसला पाहिजे. आपण सांगितलेले आकडे चुकीचे आहेत. शाळा विना अनुदानित असू द्या नाहीतर अनुदानित असू द्या. अनेक संस्था चालक दोन-तीन लाख नव्हेतर तीन-तीन लाखापर्यंत देणग्या घेण्याचे प्रकार अनेक शाळांमध्ये सुरु आहेत. ही एका अर्थाने सर्वसामान्य माणसांची ते फसवणूक करीत असल्यामुळे त्यादृष्टीने कायदा करण्यात येत आहे. आणि तो कायदा करुन त्यांच्यावर कडक अंकुश ठेवण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. माननीय सदस्यांचे म्हणणे तेच आहे की, विना अनुदानित आणि कायम विना अनुदानित शाळांवर बंधने आली पाहिजेत. त्यामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे नुकसान होता कामा नये. त्या विद्यार्थ्यांना चांगले दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे. त्यादृष्टीने कायदा करतांना जास्तीत जास्त कडक निकष लावून निश्चितपणे या पुढील काळात त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाईल असा विश्वास मी व्यक्त करतो. आणि म्हणून 1977 व 1980 मध्ये केलेल्या कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाईल. त्यासाठी टास्क फोर्स नेमून काटेकोरपणे तपासणी करण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदया, माननीय मंत्रिमहोदयांनी याठिकाणी बृहत आराखडयाचा विषय मांडला. मंत्रिमहोदयांना मी आपणामार्फत विचारु इच्छितो की, ज्या ठिकाणी शाळांची आवश्यकता आहे त्याठिकाणी शाळा दिली पाहिजे असे शासनाचे धोरण होते. त्यादृष्टीने आपण मास्टर प्लॅन तयार केला. त्या मास्टर प्लॅनमध्ये ज्या गावांचा समावेश होता त्या गावातील शाळांना आपण मान्यता दिली आहे. काही ठिकाणी आदिवासी भागातील शाळांना आपण मान्यता दिली.परंतु वर्षानुवर्षे बृहत आराखडयाप्रमाणे ज्या शाळा आदिवासी भागामध्ये सुरु आहेत त्यांना शासनाची मान्यता मिळत नाही. शेवटी जर अनधिकृत शाळा असतीलतर त्यांचेवर पोलीस कारवाई होईल. तेव्हा कायम विना अनुदानित शाळा चालविली पाहिजे असे शासनाने त्यांच्याकडून लिहून घेतले आहे व त्यांनीही लिहून दिले आहे, व त्या शाळा आपल्याला टिकवावयाच्या आहेत. म्हणून बृहत आराखडयाच्या आधारावर आदिवासी भागामध्ये ज्या कायम विना अनुदानित शाळा सुरु आहेत त्या टप्प्याटप्प्याने अनुदानावर आणण्याचा आपण विचार करणार काय?

श्री. हसन मुश्रीफ : उच्च न्यायालयामध्ये काही संस्था चालकांनी एक याचिका दाखल केली की, आमच्यानंतर परवानगी दिलेल्या शाळा विना अनुदानित तत्वावर आणल्या आणि आम्हाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ...

कायम विना अनुदानित तत्वावर चालविण्यास देणे हा आमच्यावर अन्याय आहे. त्याबाबत उच्च न्यायालयाने शासनाचे मत मागितले असता, शासनाने प्रतिज्ञापत्र कोर्टामध्ये दाखल करुन सांगितले की, यावर्षी विना अनुदानित तत्वावर चालविण्यास परवानगी दिलेल्या शाळांचे मूल्यांकन पूर्ण होईल त्या सर्व शाळा अनुदानावर येतील. विना अनुदान तत्वावर शाळा देण्याचा प्रयोग 5 वर्षापूर्वी झाला होता. त्यामध्ये ज्या शाळा निकष पूर्ण करणार नाहीत त्या विना अनुदान तत्वावर रहातील. 1 मार्चपर्यंत विना अनुदान तत्वारील ज्या शाळा आहेत त्या यावर्षी अनुदानावर आणू. आणि पुढे असेही सांगितले की, मागास आदिवासी भागातील शाळांना पहिल्यांदा अनुदान देवू, त्यानंतर भौगोलिक परिस्थिती अवघड आहे त्याठिकाणी असलेल्या शाळांना अनुदान देवू, त्यानंतर अल्पसंख्याकांच्या असलेल्या शाळांना अनुदान देवू. एवढे केल्यानंतरही माननीय सदस्यांनी ज्या शाळांचा उल्लेख केला त्या शाळा निकषात बसत असतील, त्यामध्ये तुमची शाळा सुध्दा निकषात बसत असेल तर त्या शाळांना अनुदान देवू. आणि ज्या शाळा निकषात बसत नसतील तर त्याबाबत पुढील वेळी जरुर विचार करु. आज हायकोर्टामध्ये ती याचिका प्रलंबित असून तिचा निकाल लागलेला नाही. म्हणून जर उच्च न्यायालयाने आदेश दिले तर आपल्याला करावे लागेल. परंतु शासनाने ठरविल्याप्रमाणे टप्प्या टप्प्याने शाळा अनुदानावर आणण्यासाठी शासन प्रयत्न करील.

श्री. रामनाथ मोते : बृहत आराखडयामध्ये समाविष्ट असणाऱ्या आदिवासी भागातील कायम विना अनुदानित असलेल्या शाळा अनुदानावर आणणार काय?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, त्यांनी जी मान्यता घेतलेली आहे, ती कायम विना अनुदानित म्हणून 100 रुपयाच्या स्टॅम्प पेपर घेतली आहे. आता ती कसल्या परिस्थितीत घेतली आहे तो भाग वेगळा आहे. नाईलाजाने किंवा त्यांच्यावर दबाव आणला म्हणून वगैरे हा संशोधनाचा भाग आहे. परंतु या पध्दतीमध्ये बसणारी ती शाळा असेल तर सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे नाव द्यावे. जर ती निकषामध्ये बसत असेल तर बसवू.

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, बहुतेक सर्व मुद्दे सन्माननीय सदस्य श्री.मोतेसरांनी मांडलेले आहेत. पण विनाअनुदानित शाळातील शिक्षकांना सुध्दा बँकेमार्फत पगार देण्यात यावा असा कायदा केला आहे. मात्र प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नाही. तसेच ग्रॅज्युटीचा प्रश्न आहे आणि विनाअनुदानितच्या काही लोकांनी विनाकारण हा मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्यामुळे ग्रॅज्युटीचे ड्राफ्ट तयार असून सुध्दा शिक्षकांना दिले जात नाहीत. त्याचबरोबर तुम्ही कितीही म्हटले तरी सुध्दा शासनाचे विना अनुदानित शाळांवर नियंत्रण नाही. कारण एकतर काही गुन्हा केला तर, शिक्षकांच्याबद्दल आगळीक केली तर वेतनेतर अनुदानात कपात करता येते. पण येथे वेतनेतर अनुदानाचा प्रश्नच येत नाही. त्यामुळे त्यांना काहीही करावयास मोकळीक असते. तर त्यांच्यावर तुम्ही वचक कसा ठेवणार आहात ? दुसरे नेमणुका करण्याच्या बाबतीत सांगावयाचे आहे. काही वर्षांनी ज्या शाळा अनुदानावर येणार आहेत. तर तसे करण्यापूर्वी त्या शाळा पहिल्या वर्षापासून रोष्टर पाळत आहेत की नाहीत हे पहावे. कधी-कधी असे होते की, पाच वर्षानंतर शाळा अनुदानावर येणार आहे, मग अगोदरचे जे शिक्षक आहेत त्यांना नोकरीवरुन काढले जाते आणि आपले बगलबच्चे तेथे ठेवले जातात. तर यासाठी पहिल्या वर्षी जो स्टाफ आहे, तो पाचव्या वर्षी अनुदान देताना तोच स्टाफ आहे का ? हे पहाणार आहात का ? यादृष्टीने विचार करणार का ? मला पुन्हा विनंती करावयाची आहे की, कायम विनाअनुदानाचे जे तत्व आहे, ते अजिबात नाहीसे होऊ दे. तसेच गेल्या वर्षी आपण 1600 शाळांना मान्यता दिली आहे, त्याचा पुनर्विचार करावा आणि ज्या योग्य शाळा असतील, त्यांना अनुदान द्या. बाकीच्या बंद करा.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी तीन-चार प्रश्न उपस्थित केलेले आहेत. त्यांनी सांगितले आहे की, बँकेतर्फे पगार द्यावा अशा प्रकारचा नियम विना अनुदानित शाळांसाठी केलेला आहे, पण तो पाळला जात नाही. हे खरे आहे. जे विनाअनुदानित आहेत, ते कायम विनाअनुदानित आहेत. ते पगार बँकेमध्ये देत नाहीत. पण

. . . .2 एस-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ . . . .

जेव्हा टप्प्याटप्प्याने या शाळा अनुदानावर येतील, तेव्हा शासनच या शाळा अनुदानावर आल्यानंतर बँकेमध्ये पगार देते. पण मी मघाशी सांगितल्याप्रमाणे कायम विना अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून एक टास्क फोर्स नेमून राज्यातील अशा प्रकारच्या संपूर्ण शाळांची तपासणी करण्याची गरज आहे आणि आम्ही ती करणार आहोत. ज्यामुळे त्यांच्यावर बंधन येईल. आज कुणीही उठावे, चलन भरावे आणि शाळा काढावी. मग ती शाळा गोठयामध्ये भरते की रानामध्ये भरते की मोकळया जागेवर भरते याचा कोणालाही पत्ता नाही. पण यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे हे आम्हाला समजले आहे आणि  आम्ही निश्चितपणे जे नियम पाळत नाहीत, अशा शाळा बंद करण्याचे आदेश दिले जातील आणि निकष पाळण्यासाठी त्यांना सक्ती केली जाईल. विना अनुदान तत्वावर शाळा असताना जो शिक्षक नेमला जातो, तोच पाच वर्षे राहील आणि रोष्टर पाळले जात नाही हे खरे आहे. परंतु ज्यावेळी ती शाळा अनुदानावर येते, तेव्हा रोष्टर पाहिल्याशिवाय, बिंदू नामावली पाहिल्याशिवाय शिक्षण अधिकारी त्याला मान्यता देत नाहीत. त्यामुळे पहिल्या वेळी जो शिक्षक नेमलेला आहे, तोच पाच वर्षे राहील आणि त्याला पगार मिळेल याचीही गॅरंटी नाही. कारण तो पगार मिळत नाही, म्हणून तेथे येतच नाही. कोणाला तरी घ्यावयाचे, कोणीतरी ग्रॅज्युएट माणूस आणावयाचा, तो बी.एड. नसतो आणि शाळा सुरु केलेली असते. म्हणून आम्ही असे धोरण ठरविणार आहोत की, जेथे शिक्षक मिळणार नाहीत अशा ठिकाणी ज्या शाळा काढल्या जातात, त्या स्थापनच होऊ नयेत यासाठी याची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे हे राज्याच्या दृष्टीने गरजेचे आहे. शेवटी आम्हाला सुध्दा पोलीटीकल कम्पलशन्स् असतात. कोणत्या तरी पक्षाच्याच या संस्था असतात. तेव्हा सर्वांनीच मिळून कायम विनाअनुदानित शाळांच्या बाबतीत मार्ग काढण्याची गरज आहे आणि त्यांना काटेकोरपणे निकष लावण्याची गरज आहे. त्याची अंमलबजावणी शासन करील असा मला विश्वास आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदया, महाराष्ट्र के इस उच्चतम सदन में जब हम किसी विषय पर चर्चा कर रहे हैं तो एकपक्षीय दृष्टिकोण रखकर चर्चा नहीं होनी चाहिए, ऐसा मैं समझती हूॅं. इसलिए मैं यहां पर बहुत ही महत्वपूर्ण पाइंट उठाना चाहती हूॅं. माननीय मंत्री महोदय ने बिना अनुदानित शालाओं पर निकष लगाने के बारे में यहां पर कहा है. लेकिन हमें यह देखना चाहिए कि शिक्षण प्रक्रिया में जहां विद्यार्थी, पालक और शिक्षक का त्रिकोण है तो सब से ज्यादा फोकस हम किस चीज के ऊपर कर रहे हैं. अगर हम विद्यार्थी के हित पर फोकस कर रहे हैं तो हमें क्वालिटी ऑफ एज्यूकेशन पर सब से अधिक ध्यान देना होगा. मॉडल एज्यूकेशन थ्योरी के हिसाब से 25 विद्यार्थियों के लिए 1 शिक्षक होना चाहिए. शासन द्वारा चलाए जाने वाले कई स्कूलों में 60 या 80 विद्यार्थियों के लिए 1 शिक्षक होता है, लेकिन यह आदर्श स्थिति नहीं है. कई ऐसे स्कूल हैं जहां पर दर्जेदार शिक्षण दिया जा रहा है, कई ऐसी संस्थाएं हैं जहां पर मॉडल एज्यूकेशन दी जाती है, उनको इगनोर करके चलेंगे तो ठीक नहीं होगा. कहीं ऐसा न हो कि आपके नॉर्म्स की वजह से दर्जेदार शिक्षण पर असर पड़े. बड़े शहरों के इंगलिश मीडियम स्कूल्स में बच्चों को ग्लोबल कम्पटीशन के लिए तैयार किया जाता है और हम यह मानकर चलते हैं कि वहां पर टीचर्स का शोषण नहीं होगा. क्वालिटी ऑफ एज्यूकेशन देखने के लिए आप जो टास्क फोर्स अपाइंट कर रहे हैं, उसको स्कूल का रिजल्ट भी देखना चाहिए. कई अनुदानित स्कूल ऐसे हैं जहां पर रिजल्ट शून्य प्रतिशत आता है. शासन उनको पैसा दे रहा है, फिर भी क्वालिटी कुछ नहीं है. दूसरी तरफ ऐसे कई बिना अनुदानित स्कूल हैं जहां पर टीचर्स का शोषण नहीं हो रहा है और बच्चों को अच्छी एज्यूकेशन दी जाती है. इसलिए आपके टास्क फोर्स को स्कूल की क्वालिटी और उसके रिजल्ट पर फोकस करना चाहिए. अगर आप दो तरह के स्कूल्स के लिए दो तरह के नॉर्म्स बनाते हैं तो भी चलेगा, लेकिन अगर आप मेकेनिकल नॉर्म्स बनाएंगे तो यह सोसायटी के एक सेक्शन के साथ ना-इन्साफी होगी, ऐसा मैं समझती हूॅं. इसलिए शासन को बेलेन्स एप्रोच लेने की जरुरत है. मैं शासन से अनुरोध करना चाहती हूॅं कि स्कूल्स की क्वालिटी और रिजल्ट की स्टडी करके एक बेलेन्स एप्रोच लेकर इस बारे में निर्णय लीजिए.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदया, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी आपले काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. सन्माननीय सदस्यांचा काहीतरी गैरसमज होतो आहे. ज्या चांगल्या शाळा आहेत, कायम विना अनुदानावर चालविल्या जातात, त्यांच्यावर अन्याय करणारी चर्चा चालू आहे,असे त्यांना वाटते. परंतु सन्मानीय सदस्यांचा थोडा गैरसमज झालेला आहे. ज्या विना अनुदानित शाळा आहेत, त्या शाळांचे बाजारीकरण करण्यासाठी बसलेल्या आहेत, पैशासाठी शाळा काढलेल्या आहेत. विद्यार्थ्यांचे यामुळे नुकसान करतात त्याबाबत मी सांगितले. सन्माननीय सदस्यांच्या बोलण्यामध्ये इंग्रजी माध्यमाच्या शाळा चालविणाऱ्या संस्था आहेत, त्यांच्याबाबतीत त्यांना अभिप्रेत असावे. मी सांगू इच्छितो की, पन्हाळयामध्ये 'संजीवनी' नावाची पन्हाळा येथे इंग्रजी माध्यमाची शाळा गेल्या पाच-सहा वर्षापासून चालू आहे. श्री.भोसले म्हणून आहेत ती शाळा ते चालवितात. ती निवासी शाळा आहे. ते 50 हजार रुपये फी घेतात. इतर अशा अनेक शाळांमध्ये एक ते दीड लाख रुपये घेतात, त्याबद्दल बोलायचे नाही. या ठिकाणी जी चर्चा चालू आहे, त्यामध्ये सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर आणि सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी भाग घेतला. अशा ज्या शाळा आहेत, त्या विद्यार्थ्यांचे नुकसान करतात. याबाबतचे जे निकष आहेत ते त्या शाळा पाळत नाहीत. मी तर मंत्री महोदयांना विनंती करणार आहे की, ज्या शाळा खरोखरच कायम विनाअनुदानित आहेत, त्या अतिशय दर्जेदार चाललेल्या आहेत. फीच्या संबंधात थोडा वाद होऊ शकतो. त्यांनासुध्दा बक्षिस देण्याची गरज आहे. समाजाचे उत्तरदायित्व म्हणून ज्या संस्था शाळा चालवितात, त्यांचाही गुणगौरव होणे गरजेचे आहे. म्हणून यामध्ये अजिबात भेदभाव केला जाणार नाही. ज्या संस्था चांगल्या शाळा चालवितात, त्यांना शाबासकी देणे आणि ज्या चांगल्या शाळा चालवत नाहीत, त्यांच्यावर कठोरपणाने निर्बंध लादणे हाच या चर्चेचा विषय आहे.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** ( श्रीमती सुधा जोशी ) : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार दिनांक 28 मार्च, 2005 रोजी दुपारी 2.00 वाजता सभागृहाची बैठक पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 50 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 28 मार्च, 2005 च्या दुपारी 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही